

# महाराष्ट्राचे शिल्पकार
## शंकरराव किर्लोस्कर

शांता किर्लोस्कर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई



# उद्योग उत्साहाचे जनक
## श्री. शंकरराव किर्लोस्कर

सदस्य
महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ
दादर, मुंबई ४०० ०१४

शांता किर्लोस्कर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : जून २००२
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. ६

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
प्रमोद भोगटे,
स्नेहंश प्रिंटर्स,
३२०-ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सितारामं जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-१३. (दूरध्वनी : ४९४५६१५)

मुखपृष्ठ : राजा बडसल

किमत : रु. ४०/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असं नाही.

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्वपूर्ण सहभाग आहे अशा व्यक्तींची साधारणतः शंभर ते सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती ''महाराष्ट्राचे शिल्पकार'' या योजने अंतर्गत पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याची मंडळाने योजना आखली असून या चरित्रग्रंथमालेतील ''उद्योग उत्साहाचे जनक श्री. शंकरराव किर्लोस्कर'' हा सहावा चरित्रग्रंथ आहे.

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्या दिवंगत व्यक्तींचं मोलाचं योगदान आहे त्या व्यक्तिंपैकी श्री. शंकरराव किर्लोस्कर हे एक आहेत.

शंकररावांचं व्यक्तिमत्व एखाद्या खळाळत्या प्रवाहाप्रमाणं आहे. ''उद्योग उत्साहाचे जनक'' हे अन्वर्थक नाव लेखिकेनं या चरित्रग्रंथाला दिलेलं आहे.

शंकरराव हे व्यवहारी असूनही ध्येयवादी होते. कलावंत असूनही यंत्रप्रेमी होते. तत्त्वनिष्ठा हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विशेष होता. '' 'किर्लोस्कर' 'स्त्री' आणि 'मनोहर' अशी तीन राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक विचारांची व्यासपीठे निर्माण करणे ही शंकरभाऊंनी मराठी माणसाला दिलेली फार मोठी देणगी आहे... मराठी माणसांचे विचारचक्र गतिमान ठेवण्याच्या कार्यात त्यांचे स्थान मोठे आहे.'' असे त्यांच्या संदर्भात पु. ल. देशपांडे यांनी काढलेले उद्गार अथवा ''किर्लोस्कर नांगर माहित नाही असा शेतकरी आणि किर्लोस्कर मासिक माहित नाही असा साक्षर महाराष्ट्रीय माणूस मुद्दाम शोधायला गेले तरी सापडणे कठीण, अशी आज जी वस्तुस्थिती आहे, तिचे बरेचसे श्रेय आपल्या कर्तबगारीलाच आहे.'' हा त्यांना देण्यात आलेल्या मानपत्रातील मजकूर महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचा किती मोठा वाटा आहे, हे स्पष्ट करणारा आहे.

श्रीमती शांता किर्लोस्कर यांनी या चरित्रग्रंथात शंकरराव किर्लोस्कर यांच्या व्यक्तिमत्वाचे घडविलेले मनोज्ञ दर्शन मराठी वाचकांना आवडेल, प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास आहे.

**रा. रं. बोराडे**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई,

दिनांक : ८ मे, २००२

# मनोगत

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने महाराष्ट्राची जडणघडण करणाऱ्या व्यक्तिंची चरित्र मालिका ''महाराष्ट्राचे शिल्पकार'' या योजनेतून प्रसिद्ध करावयाचे ठरविले, त्यामध्ये श्री. शंकरराव किर्लोस्कर यांचे चरित्र लिहिण्याची संधी मला मिळाली याबद्दल मी मंडळाची आभारी आहे. शंकररावांच्या सहवासात अनेक वर्षे राहिल्यामुळे आणि त्यांनी लिहिलेल्या शंवाकिय, यांत्रिकाची यात्रा या पुस्तकांचा माझ्या लेखनास आधार मिळाला आहे.

किर्लोस्कर उद्योग समुहाची मूळसंस्था किर्लोस्कर ब्रदर्समध्ये शंकरराव संचालकातील एक होते. आणि पुढेही कारखान्याचे मुख्य व्यवस्थापक म्हणून त्यांनी १२ वर्षे काम केले. त्या काळात येऊ घातलेल्या औद्योगिक युगास आवश्यक अशी प्रयत्नवादी, आत्मविश्वासू आणि आधुनिक विज्ञान दृष्टिची माणसे घडविण्यासाठी त्यांनी १९२० मध्ये ''किर्लोस्कर मासिक'' सुरू केले नंतर १९३० मध्ये स्त्रियांनीही आपल्या सामर्थ्याची ओळख करून घेऊन स्वत:ची उन्नती करावी म्हणून ''स्त्री मासिक'' काढले.

शंकरराव स्वत: उत्तम चित्रकार असल्याचा प्रत्यय. मासिकांची मुखपृष्ठे, कथा, लेख यामधील बोलकी चित्रे आणि मार्मिक टीका करणारी व्यंगचित्रे यामधून येतो आणि अशा माध्यमांचा उपयोग करून मासिकाच्या आकर्षक मांडणीचा त्यांनी धडाच घालून दिला. आणि वाचकांच्या मनात सौंदर्यदृष्टीची जाणीव पेरली.

आपला समाज डोळस, निर्भय व लढाऊ होण्यासाठी त्याची वैचारिक ताकद वाढली पाहिजे. नव्या राष्ट्राबरोबर नवी संस्कृती, नवा मानवधर्म उदय पावणार आहे, हे विसरता कामा नये. व्यक्तीला क्षुद्र कस्पटासारखे वागविणे ही मोठी चूक होईल, म्हणून व्यक्तीच्या आणि समाजाच्या विचारशक्तीला आवाहन यांवर त्यांचा भर होता याचे सुंदर बोलके प्रतिक म्हणजे निवृत्त होण्यापूर्वी त्यांनी एका सामान्य शेतकऱ्याचा पुतळा कारखान्याच्या प्रवेशद्वारासमोर उभा केला त्याखाली शब्द होते, ''तुझा विसर न व्हावा''.

या पुस्तकाच्या वाचकानाही हे शब्द पुन्हा पुन्हा आठवावेत.

**-शांता किर्लोस्कर**

# अनुक्रमणिका


प्रारंभ ........................................................ १

लहानपण ........................................................ २

पहिली जाहिरात ................................................ ९

पैशाचे झाड ................................................... १३

चित्रकलेचे प्रेम ................................................. १८

लाहोरचे दिवस ................................................ २३

आईचा आदेश ................................................ २७

नांगर विक्री ते समाजमंदिर ................................... ३१

किर्लोस्कर खबर ............................................... ३८

लंडन कॉलेज ऑफ कॉमर्स .................................... ४३

विक्रीची कौशल्ये ............................................... ४७

पुरोगामी विचाराकडे ........................................... ५१

बुवा बाजीवर हल्ला ............................................ ६६

उत्कर्षाकडे वाटचाल .......................................... ७६

धामधुमीचा काळ आणि ग्रामराज्याची जबाबदारी ............. ७९

दखखनची दौलत ................................................ ८७

निवृत्तीतून वानप्रस्थात ........................................ १०३




# प्रारंभ

आपण बहुतेक सर्व माणसे पोटपुजेपुरते कष्ट करत कालच्यासारखी आजच्या दिवसाची आपल्या जीवनाची होडी वल्हवित राहतो; पण होडी योग्य दिशेने जावी यासाठी सुकाणू धरलेला नाविक सर्वांना सांभाळीत असतो.

'आपण तरला हे नव्हे नवल लोकांशी तारील तोची ज्ञानी।'

या संतवचनाप्रमाणे समाजाचे सुकाणू सांभाळण्याच्या विचाराची माणसे जन्मतात. १९२० मध्ये येणाऱ्या औद्योगिक युगास आवश्यक अशी प्रयत्नवादी, आत्मविश्वासू आणि आधुनिक विज्ञानदृष्टीची माणसे घडविण्यासाठी शंकरराव किर्लोस्करांनी किर्लोस्कर मासिकातून उद्योग, उत्साह, आत्मोन्नती, विचारसरणी महाराष्ट्रास दिली आणि पुढे मोठी औद्योगिक कामगिरी केली. त्यांचे हे चरित्र आजच्या वाचकांनासुद्धा या ध्येयाची प्रेरणा देईल असा विश्वास वाटतो.

# लहानपण

शंकरभाऊंचा जन्म ८ ऑक्टोबर १८९१ रोजी सोलापुरात झाला. त्यांचे वडील-डॉक्टर वासुदेव काशिनाथ किर्लोस्कर यांनी १८८८ मध्ये सोलापुरात वैद्यकीय व्यवसायास सुरुवात केली होती. सोलापुरात तेच पहिले एल. एम. अँड एस. पदवी घेतलेले डॉक्टर. त्यामुळे धंद्यात त्यांचे बस्तान चांगले बसले होते.

पण ते नुसते डॉक्टरच नव्हते, तर त्यांना यंत्रकलेची उपजत आवड असल्यामुळे दवाखान्याशेजारीच-कसबा पेठेत त्यांनी आपला **शिवाजी मेटल वर्क्स** नावाचा छोटा कारखाना सुरू केला होता. महाराष्ट्रातील हा पहिलाच यांत्रिक उद्योग झाला होता.

वडील पेशाने डॉक्टर असले तरी वृत्तीने समाजसुधारक होते. त्याच मताचे त्यांचे इतर स्नेही आगरकरांचे अनुयायी होते. त्याकाळी हरीभाऊ आपटे, आण्णासाहेब कर्वे, रावसाहेब आणि काशीबाई कानिटकर अशी मंडळी डॉक्टरांचे घरी येत असत. जेवणाच्या वेळी त्यांच्या गप्पांमधून समाजातील रूढींवर टीका होत असे; त्याचबरोबर स्त्रीशिक्षण, विधवा विवाह अशा विषयांवर चर्चा देखील होई. लहान वयात शंकरभाऊंना जुन्या गोष्टी टाकून देऊन सुधारणा व्हायला हवी, एवढाच ढोबळ सारांश समजत असणार.

शंकरभाऊंच्या आईनी सोलापुरातील काही स्त्रियांना गोळा करून शिवण, विणकाम, या गोष्टीबरोबर अक्षरओळख करून देण्याची सोय केली होती. तेथे आईबरोबर जाणाऱ्या छोट्या शंकरलाही शिक्षणाचा पहिला धडा मिळाला. समजू लागल्यावर शंकरचे नाव तीन नंबरच्या म्युनिसिपल मराठी शाळेत घालण्यात आले; पण घरातील विविध चर्चा ऐकल्यामुळे त्याची समज खूपच वाढली होती.

रियासतकार सरदेसाई सोलापूरच्या घरी आले म्हणजे इतिहासातील स्फूर्तिदायक गोष्टींची मेजवानीच मिळे. पंडित श्री. दा. सातवळेकर आले म्हणजे शंकरला फार हर्ष होई. कारण, बाबांच्या कारखान्यात जे फराळाचे डबे, गरम झरा अशा वस्तू निर्माण होत, त्याची चित्रे ते भराभर काढून देत आणि संध्याकाळी सिद्धेश्वराचे देऊळ, किल्ला किंवा मोतीबाग येथे जाऊन जलरंगाने सुंदर निसर्ग चित्रे

काढीत. शंकर ते डोळ्यात प्राण आणून पहात असे. सातवळेकरांचे आर्ट स्कूल पाहण्यासाठी ७ वर्षाच्या शंकरला ते एकदा आपल्याबरोबर मुंबईला घेऊन गेले.

मुंबईत आल्यावर घोड्याच्या ट्रॅम्स, गॅसचे दिवे, राणीचा बाग, राजाभाई टॉवर, चौपाटी अशी प्रेक्षणीय स्थळे शंकरने पाहिली, तरी आर्ट स्कूल व त्यातील चित्रे यांचा शंकरच्या मनावरील पगडा केव्हाही पुसट होऊ शकला नाही.

लहानपणी आईबरोबर आजोळी जाण्याची संधी शंकरला मिळे. त्याकाळी कर्नाटकातील बम्मनहळ्ळीला जायचे म्हणजे हुबळीहून पुढचा प्रवास खटारगाडीने दोन टप्प्यांत करावा लागे. आजूबाजूचा भाग डोंगराळ आणि जंगलाचा, त्यात वाघ, रानडुक्करे, चित्ते असे जंगली प्राणी असत; पण आजोळच्या टेंबे घराण्यातील सर्व मामा मोठे धाडसी शिकारी होते. त्यांच्या शिकारीच्या गोष्टी ऐकताना शंकरचे मन थरारून जायचे आणि आपणही अशा काही धाडसाच्या गोष्टी कराव्या अशी त्याला इच्छा व्हायची. जंगलातून येणाऱ्या प्राण्यांच्या विविध आवाजांनी शंकरची घाबरगुंडी उडे; पण मनावर एक जादूही घातली जाई. माणसाला निर्भय बनविण्यास साहसाची आवड निर्माण करणारे लहानपणचे अनुभव बरेच परिणामकारक होत असावेत.

१८९६ साली सोलापुरात व महाराष्ट्र-कर्नाटकाच्या भागात मोठा दुष्काळ पडला. हजारो लोक तडफडून मेले, अशा घरांतील एकाकी मुलींना लक्ष्मीबाईनी सरस्वतीमंदीर या त्यांच्या संस्थेत आणले आणि त्यांच्या अन्नपाण्यासाठी झोळी घेऊन धान्याचे दुकानदार व नागरिकांकडे धान्याचा मुष्टिफंड मागण्याचे काम त्यांनी केले. तेवढ्यात प्लेगची साथ सोलापुरात पसरू लागली. लोक पटापट मरू लागले. गावाबाहेर झोपड्या घालून लोक तिथे राह्यला गेले; पण तेथे चोऱ्या होऊ लागल्या. रात्रभर आरडाओरडा चाले. १८९८ मध्ये शंकरची मुंज व मोठी बहीण कृष्णाचे लग्न सोलापूर नजिक असलेल्या कडबगाव स्टेशनच्या पिछाडीस उरकण्यात आले. किर्लोस्कर व सरदेसाई या दोन्ही घरची मंडळी सुसंस्कृत व उदारमतवादी असल्याने, सर्वांना हा आडबाजूचा समारंभ चांगला वाटला.

त्यावेळी एका सकाळी खग्रास सूर्यग्रहण लागले होते. काही क्षण रात्रीसारखा गडद अंधार पसरला. तारे चमकू लागले. शंकरभाऊंच्या बाबांनी सर्वांना गच्चीवर नेऊन ग्रहण म्हणजे काय? ते कसे लागते? याची शास्त्रोक्त माहिती दिली. पृथ्वी व चंद्र सतत फिरत असतात. पृथ्वी व सूर्याच्या मध्ये चंद्र आला म्हणजे पृथ्वीवरच्या लोकांना सूर्य दिसत नाही; त्याला सूर्यग्रहण म्हणतात. समाजातील अज्ञानामुळे अंधश्रद्धेचा लोकांच्या मनावर किती जबरदस्त पगडा आहे, म्हणूनच सर्वसाधारण जनतेच्या दृष्टीने हा केतू ग्रहाचा प्रभाव आहे असेच त्यांना वाटते हे शंकरच्या लक्षात आले.

बाबांना संगीताची देखील बरीच आवड होती. ते स्वत: सतार वाजवीत. आपल्या घरातील मुलांना सर्व कलांची ओळख व्हावी म्हणून सतार शिकविण्यास अडव्यप्पा या कानडी शिक्षकाची त्यांनी नेमणूक केली होती. त्यांच्या तालमीत ''दा दीडदादा'' करायला व दोन-चार राग ओळखायला शिकल्यावर, शंकरच्या संगीताचा अभ्यास बंद पडला.

लहानपणी असे संस्कार मिळणे ही शंकरच्या दृष्टीने खरोखर मोठी भाग्याची गोष्ट ठरली. वर्गातील इतर मुलांपेक्षा आपण बरेच निराळे आहो, हे शंकरच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. इतर विद्यार्थ्यांना शंकर हा एक विचित्र प्राणी वाटे, तर त्यांचा अडाणीपणा पाहून शंकरला त्यांची कींव येई व त्यांच्या चुकीच्या कल्पना दूर करण्यासाठी त्याची सारखी धडपड असे.

मित्रांच्या अडाणी समजूती दूर करायचे एक काम, तर त्यांच्यात देशभक्तीचे वारे भरायचे दुसरे काम, शंकरला करायचे होते. घरात वडील मंडळींची जी बोलणी चालत त्यावरून परदेशातून आलेले इंग्रज लोक आपल्यावर राज्य करतात हा एक मोठा जुलूम आहे हे शंकरला समजले. म्हणून, इतर मुलांना आपल्या देशाच्या स्थितीची नीट कल्पना यावी, निदान शिवाजी महाराजांची तरी माहिती द्यावी हे अज्ञान दूर करण्याकरिता शंकर स्वत: वाचलेल्या शिवाजीच्या गोष्टी मित्रांना सांगत राही. आपल्या मित्रसेनेला देशभक्तीचे धडे द्यायला सोलापूरचा जुना किल्ला हे एक हवेतसे ठिकाण लाभले होते. तेथे येताच शंकरला इतिहासकाळात शिरल्यासारखे वाटे. शिवाजी महाराज व त्यांचे मावळे यांचा त्यां मुलांच्या अंगात संचार होई. त्या भरात हरहर महादेव अशी गर्जना करीत ते एक-एक बुरूज काबीज करीत असत. देशाचे स्वातंत्र्य कसे मिळवायचे ह्या एकाच विचारामुळे त्या मुलांना वेळेचे भान राहत नसे. पण हे रणक्षेत्र घरात आले-म्हणजे घरातल्या वस्तूंची मोडतोड होऊ लागे. मग त्या मावळ्यांना घरातून बाहेर पिटाळले जाई.

शंकर चौथीत गेल्यावर इंग्लंडच्या व्हिक्टोरिया राणीचा मृत्यू झाला आणि बादशहा सातवे एडवर्ड यांच्या राज्यारोहणाचा समारंभ शाळेतही करण्याचे ठरले. त्यासाठी मास्तरांनी 'भो राजन् धन्य धन्य विबुधमान्य सार्वभौम भूवरा' असे गाणे सर्वांना शाळा चालकांनी म्हणायला सांगितले; पण शंकरला ते गाणे नादानपणाचे लक्षण वाटले. असे म्हटल्यावर त्याला मास्तरांच्या छड्या खाव्या लागल्या. सुट्टीत बोरोटी या खेड्यातील नातलगांकडे शंकरला पाठवण्यात आले. शेतावर पाखरांना हाकायचा उद्योग त्याला मिळाला. गोफणीतून धोंडा मारायची कला तो चांगली शिकला. एका झाडावर फुटक्या मडक्याचे निशाण लावून त्यावर मारा करायची कल्पना त्याला सुचली, पण शंकरच्या गोफणीतून निघालेला एक दगड पाटलाच्या

मुलाला लागल्यावर, त्याची गोफण जप्त झाली.

एकदा सोलापुरात छत्र्यांची सर्कस आली होती. शंकरने ती पाहिली तेव्हां आपणच सर्कस करण्याचा विचार त्याच्या डोक्यात घोळू लागला. त्याने दोन कुत्री, एक शेळी पकडून आणली. सतारीची गवसणी काढून, एका मुलाच्या तोंडाला सोंड म्हणून बांधून त्याला हत्ती बनवला. दोघे कोलांट्या उड्या मारू लागले. आता आपल्या पायावर दुसऱ्या मुलाला उभे करायचे काम फक्त राहिले. ते काम करण्यासाठी शंकर आडवा झाला. घरातील अंबूताईचा दोन-तीन वर्षाचा मुलगा दोन मुलांनी उचलून आणून शंकरच्या पायावर उभा केला; पण दुसऱ्याच क्षणी त्याचा तोल जाऊन, तो जमिनीवर कोसळून त्याने एक जोराची किंकाळी ठोकली.

शंकरवर गहजब करायला हे सर्वांना चांगले निमित्त झाले. शंकरच्या अशा हूडपणाला घरातील सर्व मंडळी कंटाळली. त्याचवेळी बेळगावचे काका रामूअण्णा घरी आले होते. त्यांना बाबा म्हणाले, ''रामूअण्णा! तुला खोडकर मुलांना कसं सुधाराव हे चांगलं माहित आहे, तेव्हा तू शंकरला आपल्याकडे घेऊन जा नि तुझा मुलगा कालिदास याला माझ्याकडे पाठवून दे!''

भाऊ-बहिणी, शाळेतील गल्लीतील सारे दोस्त यांना सोडून जायचे शंकरला अवघड झाले. 'माझी रवानगी कशासाठी? मुलांच्या सुधारणेसाठी मी किती झटतो. त्यांना चांगल्या गोष्टी सांगतो, मी खोटे बोलतो काय? मी वाईट आहे काय?' असे प्रश्न शंकरला सतावू लागले. त्याच गोंधळलेल्या मन:स्थितीत शंकर काकांच्याबरोबर बेळगावला जायला निघाला.

मोठे काका रामुअण्णा यांच्याबरोबर बेळगावला रात्री घरी पोचल्यावर काकूंना नमस्कार करून शंकर गाढ झोपी गेला. सकाळी उठल्यावर बाहेर पाहिले तर सगळीकडे पांढरे फटफटीत धुके पसरलेले शंकरला पहिल्यांदाच दिसले. ते हळूहळू विरळ होत सूर्य वर येऊ लागला. लौकरच स्वच्छ ऊन पडले आणि सगळीकडे पसरलेला दवबिंदूंच्या मोत्यांचा सडा पाहून त्याला गंमत वाटली. सोलापूरला अशी गंमत कधी दिसली नव्हती.

काकांचे घर झोपडीवजा कौलारू होते. काही अंतरावर त्यासारखीच सात-आठ घरे होती. हीच माळावरची वस्ती. घरातील दोन भावंडे त्याच्यापेक्षा लहानच होती. मागे जांभेकरांची व धाकट्या लक्ष्मणकाकांचीही झोपडी होती. काकांच्याकडे एक कुत्र्याचे पिल्लू होते. त्याची शंकरशी गट्टी जमली. संध्याकाळी थोडे हिंडून यावे म्हणून शंकर मोत्याला घेऊन बाहेर पडला. जरा अंतरावर काही खोपटी दिसली. लंगोट्या घातलेली मुले तेथे विटी-दांडू खेळत होती. शंकरने त्यांना विचारले, ''मला घेता का तुमच्याबरोबर खेळायला?'' तो प्रश्न ऐकून ती

आश्चर्याने पाहतच राहिली. त्यातला एक धीट पोरगा म्हणाला, ''आम्ही घेऊ, पण आम्ही न्हाव्याची मुले आहोत, तुम्हाला शिवाशिव नाही का होणार?'' शंकर जरा थांबून म्हणाला, ''ते पुढे पाहू. मला आज तरी खेळायला घ्या.'' आणि दांडू घेऊन तो विटी कोलायला लागला. या खेळात त्याचा हात बसलेला होता. झुलावर झुला चढू लागला ते दिसताच पोरं त्याच्याकडे आदराने पाहू लागली आणि त्यांनी शंकरला फिरून खेळायला यायला सांगितले.

घरी आल्यावर ही हकीगत शंकरने काकांना सांगितली. ते म्हणाले, ''त्या मुलांबरोबर खेळायला तुला हरकत नाही. ही न्हावी मंडळी आपल्यासारखीच प्लेगसाठी या माळावर राह्यला आली आहेत. मात्र खेळून आल्यावर हात-पाय धुवायला विसरू नकोस. तुझ्यासाठी मुकटा आणला आहे. तो जेवताना नेसायचा हे लक्षात ठेव. रात्री जेवण झाल्यावर घरातील सर्व मंडळी रामरक्षा, शिवस्तोत्र, चर्पटपंजरी अशी स्तोत्रे म्हणावयाची. ती पाठ करण्यास शंकरला वेळ लागला नाही. काकांची शिस्त फार. नीटनेटकेपणाची त्यांना फार आवड. प्रत्येक वस्तू जिथल्या तिथे ठेवायला हवी. स्वभावही फार प्रेमळ. लहान मुलावर ते रागावत नसत. त्यांनी खोड्या अथवा दंगा केला, तर ते मुलांच्या वयाला शोभेलसे आहे असे त्यांचे मत.

झोपडीपासून बेळगांवचे सरदार्स हायस्कूल तीन मैल दूर, म्हणून काकांनी शंकरसाठी एक छोटी सायकल आणून दिली. तिच्यावर बसायला येऊ लागताच शंकरला पंख फुटल्यासारखे वाटू लागले. ''शंकर! तुला आणखी काय हवे?'' असे काकांनी विचारल्यावर त्याने रंगपेटी आणि एअरगन अशा दोन गोष्टी सांगितल्या. त्याही काकांनी आणून दिल्यावर शंकरच्या आनंदाला पारावार राहिला नाही.

काकांच्याबरोबर शंकर शाळेत जाऊ लागला. इंग्लिश भाषा शिकवावी तर ती काकांनीच असे त्याला वाटायचे. घरी ते पालक व शाळेत शिक्षक; त्यांच्या मार्गदर्शनाचा शंकरला दुहेरी लाभ झाला. मुलांच्या बौद्धिक व शारीरिक विकासाला योग्य वाव मिळाला, तर ती भलत्या मार्गाला लागणार नाहीत हा काकांचा विश्वास.

एका सणाला काकूंनी जेवायला साखरभात केला. शंकरचा हा आवडता पदार्थ. तो पुन्हा पुन्हा मागू लागला. काकू रागवल्या. त्यावर काका म्हणाले, ''शंकरवर अशी रागावू नकोस. त्याला साखरभात इतका आवडतो, तर रोज त्याच्यापुरता थोडा करीत जा!'' शंकरला वाटले, काका त्याची थट्टा करत आहेत; पण दुसऱ्या दिवशी फिरून पानात साखरभात आल्यावर तो खूष झाला. मात्र पुढे चार-पाच दिवस साखरभातच खाण्याची पाळी आल्यावर तो दृष्टीस नकोसा झाला.

''एखाद्या गोष्टीबद्दल जास्त हावरटपणा करू नये.'' असे काकांनी शंकरला तोंडाने सांगितले नाही; पण त्या अनुभवाने शंकरला जो धडा दिला, तो जन्मभर त्याच्या लक्षात राहिला.

शंकर हायस्कूलला जाऊ लागला. त्याला चित्रे काढायला येतात हे पाहून त्याचे ड्रॉईंग मास्तर हरीभाऊ फडके त्याच्याकडे विशेष लक्ष देऊ लागले आणि त्याची तयारी पुरी होताच त्यांनी शंकरला आर्ट स्कूलच्या थर्ड ग्रेडच्या परीक्षेस बसवले. शंकर ती परीक्षा चांगल्याप्रकारे पास झाला.

झोपड्यांतील पोरांचा शंकर म्होरक्या झाला होता. शाळा सुटली की सायकलवरून तो घरी येई. तेथे बाळू, बिंडू, दादू, विठू असे सारेजण त्याची वाटच पाहत असत. मग खेळाला रंग भरायला काय उशीर? त्यात शंकर आपली एअर गन खांद्यावर घेऊन बाहेर पडला म्हणजे सरडे, खारी, चिमण्या असली कशाची तरी शिकार केल्याशिवाय माघारी परतत नसे. हा त्याचा शिकारीचा छंद सर्वांनाच आवडत असे. एक दिवस डोंगराकडे निघाल्यावर थोड्या अंतरावर एक भला मोठा साप रमत गमत चाललेला दिसला. लहान साप पाहिले होते, पण हे प्रकरण वेगळेच होते. आता काय करायचं? साहसाचा प्रसंग आला तर धैर्याने पुढे झाले पाहिजे म्हणून शंकरने मुलांना थांबवून माळावरचे दगड गोळा करायला सांगितले, तेवढ्यात साप झपाट्याने पुढे निघाला व एका खड्ड्यात दडला. मग साऱ्या जणांनी खड्ड्याच्या काठावरून सापावर दगडांचा मारा सुरू केला. त्यापुढे त्याचा काय निभाव लागणार? सर्वांनी त्याला ठेचून मारून टाकले आणि त्याला एका काठीवर टाकून उत्साहाने घरी आणले. हे पाहून काकांनी शंकरची खूप पाठ थोपटली. त्यामुळे साऱ्या पोरांना अवसान चढले.

शंकरचे धाकटे काका लक्ष्मणराव मुंबईस आपला छोटा कारखाना चालवीत. काकांनी मुंबईच्या व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूटची नोकरी सोडली होती. शिवाय मुंबईसही प्लेगची साथ सुरू झाली, म्हणून त्यांनी आपला उद्योग बेळगावास हलवला होता. तेथे शेतकऱ्यांच्या उपयोगी पडणारी यंत्रे तयार करीत. विहिरीचे पाणी काढण्यासाठी ते पवनचक्क्या करू लागले. तसेच, बैलांना देण्याचा कडबा कापून घातला तर अधिक चांगले हे लक्षात घेऊन त्यांनी कडबा कापण्याचे यंत्र बनविले. त्याचा प्रसार होण्यासाठी परिणामकारक जाहिरात व्हायला पाहिजे असे काकांचे बोलणे ऐकल्यावर शंकरने माळावर जाऊन दोन बैलांचे चित्र काढले. एक रोडका व दुसरा धष्टपुष्ट आणि खाली बैलांचा संवाद 'कारे खंड्याबा, आताशी तुझी चैन दिसते लै! कसा तयार झालास अक्शी? असं तुला खायला तरी काय घालतात?'' ''डफळ्याबा, आताशी किनई लै ब्येस खायला गावतय. अमच्या

धन्यानं बेळगावहून किर्लोस्कर बंधूच कडबा कापण्याच यंत्र आणलयं. ते लै नामी हाय बघ. त्यातून कडबा कसा करारा भुसा होऊन पडतू या. त्यावर जरास मिठाच पाणी मारलं की एवढसं खाल्ला की पोटच भरतय! जिवाला कसं गोड वाटतयं! सांग की, लेका! तुझ्या धन्याला! तसलं एक यंतूर आणायला.'' बारा वर्षांच्या शंकरने केलेली ही जाहिरात पाहून काका शंकरच्या चित्रावर फार खूष झाले आणि त्यांनी त्याला उत्तेजन देण्यासाठी क्लिटो कॅमेरा आणून दिला.

# पहिली जाहिरात

याच सुमारास शंकरला हवा तसा एक सोबती मिळाला- अनंत फळणीकर- त्याच्याच वयाचा. काकूंच्या माहेरी प्लेगच्या साथीत घरातली करती सवरती माणसे दगावली, म्हणून अंतोबाची आई आपली दोन मुले घेऊन मुलीकडे जावईबुवांच्या आश्रयाला आली. अंतोबा फार हुशार आणि शरीराने दणकट. मोठ्या माणसासारखे तो पाणी काढणे, लाकडे फोडणे असली कामे करायचा. शंकरने त्याला सायकलवर बसायला शिकवले आणि अंतोबाने शंकरला पोहायला शिकवले.

शेजारच्या झोपडीत शनिवारी शनिमहात्म्य पोथीचे वाचन व्हायचे. त्यातील भिंतीवरील हार हंसाने गिळणे, कलींगडाची शीरकमळ होणे असले अद्‌भूत प्रकार ऐकून शंकरचा त्यावर विश्वास कसा बसणार? शनि हा एक ग्रह आहे. त्याच्याभोवती असलेले कडे हे त्याचे वैशिष्ट्य आहे, हे तर सोलापूरच्या बाबांनी दुर्बिणीतून दाखवलेच होते ना! लाखो मैल दूर असलेल्या ग्रहाचा आपल्यावर बरा-वाईट कसला संबंध? या भाकडकथांवर मोठी माणसे कशी विश्वास ठेवतात असा शंकरला प्रश्न पडे.

एक दिवस बातमी समजली की, काकांची बढती होऊन त्यांची डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर या पदावर विजापुरास बदली झाली आहे. शंकरच्या डोळ्यांत एकदम पाणी उभे राहिले. त्याची बेळगांवची ३ वर्षे केव्हा गेली हे त्याला कळलेच नाही. काका-काकू, लहान भांवडे, अंतोबा-ठळक वाडीतील न्हाव्याची मुले, शाळेतील मित्रमंडळी, साठे, नरगुंदकर या सर्वांना सोडून परत सोलापुरास जायचे शंकरच्या खरोखर जिवावर आले! पण तशाच जड मनाने सर्वांचा निरोप घेऊन त्याने बेळगांव सोडले.

सोलापूरच्या नॉर्थकोट हायस्कूलच्या चौथ्या इयत्तेतील विद्यार्थी म्हणून १९०४ साली शंकरची सुरुवात झाली. सोलापूर अठरापगड जातींचे गाव, त्यामुळे शंकरच्या मित्रात हिंदु, मुसलमान, पारशी, लिंगायत, जैन असा भरणा असे. सर्वांशी त्याचे सारखेच सख्य.

सोलापुरात येऊन थोडे दिवस झाले नाहीत तोच देशात स्वदेशीच्या चळवळीचा जोर वाढत चालला. ह्या सुमारास लोकमान्य टिळक सोलापुरात येणार असल्याचे समजताच विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे विलक्षण वातावरण पसरले. सिद्धेश्वराच्या देवळापुढील पटांगणात त्यांचे जाहीर व्याख्यान होणार असल्याचे कळले; पण शंकरच्या शाळेचे हेडमास्तर पडले दांडगे राजनिष्ठ पण या व्याख्यानाला काही विद्यार्थी गेलेच व ते दुसऱ्या दिवशी त्याबद्दल एकेक रुपया दंड भरून वर्गात आले; पण या शिक्षेचे उट्टे कसे काढावे हे त्यांचे विचार चालू राहिले. त्यांच्या अंगात स्वदेशीचे वारे चांगले भरले व स्वदेशीची गाणी ते गाऊ लागले.

*परदेशी व्यापारी आमच्या देशास लागल्या जळवा।*
*शोषुनी रक्तची घेती त्यास बहिष्कारसाधने पळवा।।*

स्वदेशीच्या प्रचारासाठी शंकरने एक खास युक्ती काढली. ''सद्गृहस्थ हो! स्वदेशी माल वापरा.'' स्वदेशी माल वापरणारा देशभक्त, न वापरणारा देशद्रोही, 'इंग्रजांची हकालपट्टी करण्यासाठी स्वदेशी वापरा.'' अशा मजकुराच्या पुष्कळ चिट्ठ्या विद्यार्थ्यांनी लिहून काढल्या आणि संध्याकाळ झाल्यावर रस्त्यावरून जाणाऱ्या माणसांच्या हातात त्या गुपचूप देऊ लागले; पण या गडबडीत एक चिठ्ठी मास्तरांच्या हातात पडली, त्यांनी शंकरचे अक्षर ओळखले. त्याचे बक्षिस दुसऱ्या दिवशी वर्गात त्यांच्या हातावर उमटवले.

शंकरचे वडील रिपन हॉल क्लबचे सभासद असल्याने त्यांच्याच नावावर वाचनालयातील चांगली चांगली पुस्तके वाचायला मिळत, त्यामुळे वर्गातल्या पुस्तकांपेक्षा शंकरचे बरेच अवांतर वाचन होई. इंग्रजी चवथीतला मुलगा इंग्रजी मासिके वाचतो ही गोष्ट खरी वाटणार नाही; पण भाषेची पूर्ण ओळख चांगल्या गुरूकडून झाल्यावर भराभर प्रगती करणे सोपे जाते. या वाचनाने जगाविषयी शंकरच्या सर्वसामान्य ज्ञानातही पुष्कळ भर पडली.

यानंतर शंकरच्या शाळेचे गॅदरिंग करायचे ठरले. शंकरला सेक्रेटरीपद मिळाले. सर्वांकडून पाठिंबा असल्याने संमेलन खूप धडाक्याने पार पडले. शेवटचे आकर्षण पुण्याचे प्रसिद्ध नकलाकार भोंडे यांच्या नकला होत्या. त्यांनी प्रथम बावळट विद्यार्थी, रँग्लर परांजपे, अशा काही नकला केल्या. कुजबुज सुरू झाली. तोच पडदा वर गेला आणि लोकमान्य टिळकांची स्वारी सर्वांना दिसली. त्यांचे स्फूर्तिदायक भाषण झाले आणि टाळ्यांचा कडकडाट. पण पुढच्या रांगेतील एक व्यक्ती दोन्ही हाताने डोके धरून खाली पाहत राहिली होती. ते होते शंकर व मित्र यांना दंड करणारे हेडमास्तर.

बेळगावला असताना धाकट्या काकांकडून बक्षिस मिळालेला क्लिटो कॅमेरा

आतापर्यंत तसाच धूळ खात पडला होता. आता कुणाजवळ तरी फोटोग्राफी शिकून त्याचा वापर करावा असे शंकरच्या मनात वरचेवर येऊ लागले. फोटोग्राफी जमली तर लहान-थोरांचे फोटो काढता येतील, प्रवासातील दृश्ये टिपून घेता येतील असे शंकरला वाटले. फोटोग्राफी हा आता पोरखेळ झाला आहे; पण ९० वर्षापूर्वी तिची माहिती असणारे लोक फार थोडे होते आणि तेही आपले ज्ञान लपवून ठेवीत. तरीपण अण्णा टिकेकरांनी सोलापुरातील प्रमुख फोटोग्राफर केशवराव दिवेकर यांची शंकरला ओळख करून दिली.

केशवरावांच्या हाताखाली काम करू लागल्यावर शंकरने फोटोग्राफीची इंग्लिश पुस्तके व मासिकेही वाचण्यास सुरुवात केली व आपल्या क्लिटो कॅमेऱ्याने शंकर फोटो घेऊ लागला हे पाहून केशवरावांनी पट्टशिष्याचे कौतुक केले.

मराठी मासिकांमध्ये व्यंगचित्रे काढायची सुरुवात शंकरराव किर्लोस्कर यांनी केली आणि विनोदांमधूनसुद्धा वाचकाला सुधारण्याची दिशा मिळू शकते




किर्लोस्कर मासिकांचे उद्दिष्ट स्पष्ट करणारे
श्री. शं. वा. कि. यांचे १९२५ सालचे एक चित्र.

# पैशाचे झाड

उन्हाळ्याची सुट्टी आली. शंकरचे तीन काकाही सोलापूरला आले, वर्षातून चार दिवस एकत्र येऊन ते घरगुती गप्पागोष्टी करीत बसत. एक दिवस धाकट्या काकांनी शंकरला तेथे बोलावून घेतले व ते म्हणाले, ''शंकर! तू आता मोठा होत चाललास, तेव्हा आपला पुढचा विचार तुला करायला पाहिजे. समज, या सुट्टीतच काहीतरी काम करून पोटापुरते पैसे मिळवायला आम्ही तुला सांगितले, तर तू काय करशील?''

असल्या विचित्र प्रश्नाला काय उत्तर द्यायचे असा विचार करताना मनात एक कल्पना येऊन शंकर म्हणाला, ''त्यात काय मोठंस! फोटो काढून मला हवे तितके पैसे मिळविता येतील!'' सारेजण त्याच्याकडे पाहून हसू लागले! पण बाबा म्हणाले, ''मग दाखव तू किती पैसे मिळवतोस ते!''

''दाखवीन! पण त्यासाठी सामान लागेल व अंतोबा माझ्या बरोबर पाहिजे.''

ती मंजुरी ताबडतोब मिळाली. सुट्टी होताच त्यांची दुक्कल फोटोच्या सामानाने भरलेल्या ट्रंकेसह हुबळीच्या वाटेला लागली. तिथे शंकरचे मामा होते. त्यांना शंकरचा हेतू समजताच ते म्हणाले, ''शहाणेच दिसता तुम्ही दोघेजण! पैसे असे झाडाला लागलेले असतात अशी तुमची कल्पना आहे काय?''

तो अनुभव दोघांनाही यायला उशीर लागला नाही. अंतोबाच्या गळ्यात कॅमेऱ्याची पिशवी व शंकरच्या हातात कॅमेरा ठेवण्याचे तिपाटणे असे दोघे गिऱ्हाईकांच्या शोधार्थ दिवसभर भटकायचे! पण सगळीकडे नकारार्थी उत्तर. असे आठ-दिवस गेले. दोघांची निराशा वाढत चालली. तितक्यात एक कल्पना शंकरच्या डोक्यात चमकली. तो अंतोबाला म्हणाला, ''उचल कॅमेरा! थोड्याच वेळात दोघे हुबळीतील मराठी शाळेजवळ आले. तिथल्या फाटक नावाच्या मास्तरांशी शंकरची पूर्वीची ओळख होती. त्यांना शंकरने काढलेले, फोटे दाखवले व म्हणाला, ''तुमच्या वर्गातील मुलांना प्रत्येकी दोन पैसे आणायला सांगाल, तर त्यांचा व तुमचा मिळून एक छान फोटो मी काढून देईन!'' ही गोळी बरोबर लागू पडली. त्या फोटोने शाळेत खळबळ उडवून दिली. तो फोटो पाहताच शाळेत जणू

फटाक्याची माळ लागली. त्या शाळेतले सर्व वर्गांचे फोटो काढून झाल्यावर दोघेजण दुसऱ्या शाळेकडे वळले मग ऑर्डरीना तोटा उरला नाही. त्यांच्या धंद्याला एकदम तेजी आली. खिशात पैसे खुळखुळू लागले. ते रोज पुन:पुन्हा मोजून पाह्याचे. सारी रक्कम ऐंशी रुपये झाली तेव्हाचा आनंद काय वर्णावा? पैज जिंकली. हुबळी सोडताना शंकर मामांना म्हणाला, ''तुम्ही आमची थट्टा केलीत; पण आम्हाला सापडलं की नाही पैशाचं झाड?''

त्यांच्या या यशस्वी दौऱ्याचे सर्वांनी अर्थात कौतुक केले; पण त्याचा सर्वांत मोठा फायदा अंतोबाला झाला. त्याचे विशेष शिक्षण वगैरे झालेले नव्हते. त्यामुळे हुबळीत फोटोग्राफीचे शिक्षण घेण्याची जी संधी त्याला मिळाली, तिचा उपयोग करून त्यानेही आजऱ्याला फोटोग्राफी सुरू केली. काकांनी त्याला एकदा नांगराचे फोटो काढून देण्यास सांगितले व त्याची हुशारी पाहिल्यावर त्याची कारखान्यातच फौंड्रीमनच्या जागेवर नेमणूक केली.

मॅट्रिकची परीक्षा जवळ येत चालली तेव्हा शांतपणे अभ्यास करण्यासाठी शंकर हैद्राबादचे काका डॉ. गंगाधरपंत किर्लोस्कर यांच्या घरी गेला. त्यांच्या पत्नी सौ. काशीबाई या शंकरच्या मावशीही होत्या. दुहेरी नात्यानं-म्हणून हैद्राबादला जायला तो एका पायावर तयार असायचा.

काकांनी आपल्या दवाखान्यासाठी-राहण्यासाठी एक मोठी कोठी घेतली होती. तिच्या निम्म्या भागात सुप्रसिद्ध चित्रकार आर. डी. देऊसकर यांचे बिऱ्हाड व स्टुडिओ होता. तेथे त्यांनी काढलेली सुंदर चित्रे लावलेली असत. इटलीत दोन वर्षे राहून ते कलेचे उच्च शिक्षण घेऊन आले होते. फार सरळ मनाचे व सदैव उत्साही असे ते एक कलावंत. त्यांच्या कपाटात चित्रकलेवरची पुस्तके दाटीनं भरलेली होती. देऊसकर चित्रे काढू लागले की शंकर एक खुर्ची घेऊन त्यांच्याजवळ बसायचा. त्याला चित्रकलेची नाद आहे हे माहित असल्यामुळे शंकरबरोबर त्याविषयी त्यांच्या गप्पागोष्टी चालायच्या. अशा वातावरणात रुक्ष अभ्यासाकडे मन कसे लागणार?

शंकरने मॅट्रिक पास होण्याची अपेक्षा सोडून दिली होती; पण रिझल्ट लागला त्यात त्याचे नाव पास झालेल्या यादीत झळकले आणि मोठ्या डौलानं तो पुण्याच्या डेक्कन कॉलेजात दाखल होण्यासाठी निघाला. सन १९०९ च्या सुरुवातीला शंकर पुणे स्टेशनवर ट्रंक, वळकटी व लगेजमधील सायकल घेऊन उतरला. त्या दिवशी टांग्याची तपासणी असल्यामुळे टांगे आले नव्हते. त्याचप्रमाणेच आणखी दोघे विद्यार्थीही स्टेशनवर उतरले. तेही डेक्कन कॉलेजला जाणारेच होते म्हणून एका खटाऱ्यात सर्वांचे सामान घालून तिघेजण रस्त्याला लागले.

पाश्चात्य धर्तीची रचना असलेली डेक्कन कॉलेजची भव्य इमारत पाहून विद्यार्थ्यांच्या मनावर त्याचा एक विशेष परिणाम होत असे. शंकरचा सोलापूरचा जिवलग मित्र विश्वनाथ दाणीही कॉलेजात आला होता. औंधचे राजपुत्र व बेळगांवचे काही जुने मित्रही शंकरला तेथे भेटले.

साताराचे वाग्भट देशपांडे, नाथ घाणेकर, विजापुरचे देसाई बंधू, हुबळीचे गोखले, टेंबे यांचीही नंतर ओळख झाली. थोड्या दिवसांनी गिरसप्पाच्या सहलीसाठी हैद्राबाद, सोलापूर, बेळगांव, मुंबई येथील सर्व नातलग मंडळी निघाली. काकांच्या कडून मिळालेल्या कॅमेऱ्यामुळे एक चांगली कला हस्तगत करण्याची संधी शंकरला मिळाली. त्या सहलीचे फोटो शंकरने नेटकेपणाने घेतले, त्यामुळे सर्व स्थळांचे निसर्गदर्शन सर्वांना फोटोमधून होऊ लागले.

कॉलेजच्या मैदानात क्रिकेटची प्रॅक्टिस सुरू झाली त्याच दिवशी शंकर व दाणीला कॉलेजच्या टीममध्ये घेतले. टेनिसचे सामन्यातही शंकर ज्युनिअर चँपियन ठरला.

क्रिकेटची आवड असणाऱ्यांना पुण्यात एका पर्वणीचा योग आला. या खेळात जगभर नाव मिळवून अजरामर झालेले रणजितसिंह पुण्यात आले. लोकांच्या आग्रहाला मान देऊन एक मॅच खेळण्याचे त्यांनी मान्य केले. वय बरेच झालेले, अंगही सुटलेले, तथापी मैदानात उतरल्यावर त्यांनी अशा लीलेने प्रत्येक चेंडूचा समाचार घ्यायला सुरुवात केली की तो खेळ पाहणारांच्या डोळ्याचे पारणे फिटावे. त्यांच्याविरुद्ध उभी असलेली शंकरची टीम म्हणजे एखाद्या ढाण्या वाघापुढे उभी असलेली उंदाराची पिले.

डेक्कन कॉलेजच्या छोट्या जीवनात शंकरला क्रीडानैपुण्यात वाखाणले गेले; पण वर्गात बसले की रोमन इतिहास शिकताना स्वाऱ्या आणि सीझरची कारकीर्द डोक्यात प्रोफेसर कशाला कोंबताहेत. असे शंकरला वाटे. तीच तऱ्हा इंटिग्रल कॅलक्युलस व बायनॉमिल थिअरमची! पण शेक्सपियरचे मर्चंट ऑफ व्हेनिस हे नाटक किंवा कालिदासाचे वेणीसंहार, रघुवंश, मेघदूत शिकताना त्यातील बहारीची वर्णने वाचताना शंकरला वाटायचे. हा कवी कालीदास होण्याऐवजी चित्रकार झाला असता तर किती बहार आली असती! आणि संस्कृतच्या वर्गात प्रोफेसरांच्या व्याख्यानांची टिपणे घेण्याऐवजी शंकर त्याच्या वहीत स्वयंवराचा देखावा, यक्षपत्नीची विरहावस्था, नारदाची पुष्पमाला, इंदुमतीच्या देहावर पडताना, असे प्रसंग रेखाटीत असे.

शाळेत असताना देशभक्ती म्हणत केलेल्या पोरकटपणाचे शंकरला आता हसू यायचे. तारुण्यात आल्यावर शंकरला देशाच्या स्थितीची व पारतंत्र्याची

खरोखरची कल्पना लक्षात यायला लागली. बंगाल प्रांतात क्रांतीकारकांनी चळवळ सुरू करून काही गोऱ्या अधिकाऱ्यांचे खून केले. त्यासाठी खुदीराम बोससारख्यांना फासावर चढावे लागले, अशा वार्तांनी शंकर व त्याचे मित्र यांच्या अंत:करणात खळबळ उडे; पण त्याचबरोबरच असाही विचार मनात येई, की एखादं दुसऱ्या साहेबाला गोळी घालून देश स्वतंत्र होईल का? खरे पाहता आपण किती दुबळे व अजागळ लोक आहो. स्वातंत्र्य मिळवायचे तर आमची स्वत:चीच सुधारणा आम्ही अगोदर करायला नको का? आपले काय चुकते ते अगोदर तपासून, आपल्या जुनाट चालीरीती आपण बदलल्या पाहिजेत. शंकरला शिवाजी महाराजांबद्दल जसा आदर वाटे, तसाच स्वामी रामदासांबद्दलही, 'यत्न तो देव जाणावा', 'केल्याने होत आहे रे, आधी केलेच पाहिजे.' अशा आवेश चढवणाऱ्या ओजस्वी वचनांनी रामदास यांनी समाजाच्या उत्कर्षाचा राजमार्ग दाखवला, तसेच पंजाबमधील स्वामी रामतीर्थ यांनी वैचारिक क्रांती आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास याचे राष्ट्राला बाळकडू पाजले. त्यांच्या व्याख्यानांचे भाषांतर मराठीत होऊन तो संग्रह प्रकाशित झाला होता. ते पुस्तक शंकरला फार आवडे. क्रांतीकारक चळवळीशी सबंध असलेल्या डेक्कन कॉलेजमधील बापट नावाच्या देशभक्त विद्यार्थ्याने कॉलेजात अशीच खळबळ उडवून दिली. त्याला अटक करायला पोलीस कॉलेजात आले. त्याचा सुगावा लागताच बापट जे तेथून निसटले ते देशांतर करून बऱ्याच वर्षांनी राष्ट्राची सेवा करायला भारतात आले. हेच ते सेनापती पा. म. बापट.

शंकर कॉलेजात असताना त्याला असे समजले की, बेळगाव शहराच्या विस्तारासाठी तेथील किर्लोस्कर कारखान्याची जागा बेळगाव म्युनिसिपालटीने आपल्या ताब्यात घेतली होती आणि त्यामुळे कारखाना बेळगावहून औंध संस्थानात कुंडलरोड स्टेशनजवळ हलवला होता. त्याचा बालमित्र अंतोबा फळणीकर देखील कारखान्यात काम पत्करून कुंडलरोडला आला आहे, म्हणून नवीन ठिकाणी सुरू होणारे काम पाहण्यासाठी दोन दिवस तिकडे जाऊन येण्याचा बेत शंकरने केला.

कुंडल रोड स्टेशनवर तो उतरला तेव्हा रात्रीचे तीन वाजले होते. दुसरा कोणीही उतारू तेथे उतरला नाही. शंकरने स्टेशनवरच्या गड्याला कारखाना कुठे आहे असे विचारल्यावर त्याने पूर्वेकडे बोट केले! गाडी हलताच त्या दिशेने ओसाड माळावरून तो चालू लागला. कुत्र्यांचे जोराजोराने भुंकणे व ''कोन हाय तिकडं?'' असे दरवडावलेल्या स्वरातले शब्द त्याला ऐकू आले. त्या धिप्पाड रखवालदाराला शंकरचे नाव कळताच त्याने नेमक्या झोपडीत त्याला पोचवले. तेथे

अंतोबाची भेट होताच त्या दोघांना आनंदाचे भरते येऊन दिवस उजाडेपर्यंत ते गप्पा मारीत बसले.

दिवस उजाडल्यावर अंतोबाबरोबर तो साऱ्या कारखान्यातून हिंडला. बेळगावहून आलेले जुने कामगार सोडले, तर येथे नव्यानेच घेतलेले कामगार म्हणजे त्यांच्याच वयाची, आजूबाजूच्या खेड्यांतील शेतकऱ्यांची मुलं होती. अंतोबाने त्यांची शंकरला ओळख करून दिली. सगळे खेडवळ साधे; परंतु त्यांच्याबद्दल शंकरला मात्र फार आपलेपणा वाटला. कॉलेजच्या स्वप्नसृष्टीपेक्षा हे जग किती निराळे! स्वतःच्या हाताने निरनिराळी कामे करणाऱ्या या माणसांना लिहिता-वाचता येत नसेल, त्यांची भाषा, वागणे, अडाणी व खेडवळ असले, तरी ज्या उद्योगात ती गुंतली आहेत त्याचे केवढेतरी महत्त्व आहे, असे त्याच्या मनात आले.

☆

# चित्रकलेचे प्रेम

दुसरी टर्म पार पाडल्यावर शंकर परीक्षेसाठी मुंबईस गेला. स्वतःवरील जबाबदारीची जाणीव होऊ लागल्यानं शंकरनं अभ्यासाकडे जास्त लक्ष दिलं होतं. त्याचे पहिले दोन पेपरही चांगले गेले. तिसऱ्या दिवशी मात्र इतिहासाच्या पेपरची त्याला धाकधूक वाटू लागली. परीक्षेच्या मंडपाकडे जाण्यासाठी ग्रँट रोड स्टेशनवर लोकलमध्ये बसून मरिन लाईन्सला उतरायचं; पण काहीतरी निमित्तानं घरातून निघायला उशीर झाला. तथापि धावत धावत ग्रँट रोड स्टेशनमध्ये आलेल्या लोकलमध्ये तो चढला; पण ती गाडी मरिनलाईन्सला न थांबता पुढे कुलाब्याला गेली. भांबावलेला शंकर मरिन लाईन्सला कसा आला, मंडपात जाऊन त्यानं पेपर कसा लिहिला की नाही, याचा पत्ता लागला नाही. तो मुंबईहून सोलापूरला परत आला ते परीक्षेची गाडी चुकली हे पक्कं ओळखूनच.

थोड्याच दिवसात तो पुन्हा हैद्राबादला गेला त्यावेळी देऊसकरांच्याबरोबर सोनबा सातवळेकरही त्याला तेथे भेटले. ते दोघेही स्कूल ऑफ आर्टचे समकालीन विद्यार्थी. अलीकडे सातवळेकर मात्र आर्य समाजाच्या चळवळीत अधिक लक्ष घालू लागले होते. 'वैदिक धर्माची तेजस्विता' या त्यांच्या लेखामुळे ते राजद्रोहाच्या खटल्यात सापडले होते. त्यामुळे त्यांना हैद्राबाद सोडावे लागले. पुढे देऊसकर पेंटिंगचे अधिक शिक्षण घेण्यासाठी इटलीला रवाना झाले.

या दोघा चित्रकारांच्या इतक्या जवळ रहावयाला मिळाल्यावर शंकरच्या कलाप्रेमाला जोराची भरती आल्यास नवल काय? देऊसकरांना हैद्राबादचे राजे निजामसाहेब आणि सर सालारजंग यांची मोठीमोठी चित्रे काढण्याचे काम मिळाले होते. डाव्या हातात रंगाची पॅलेट व उजव्या हातात ब्रश घेऊन त्यांचे चित्रकाम सुरू झाले म्हणजे ते पाहण्यात शंकर तल्लीन होऊन जाई. त्यांच्या उत्तेजनानं शंकरनं काही चित्रे काढून त्यांना दाखवली, त्यांनी त्याचे फार कौतुक करीत म्हटले, ''शंकर! तू इतकी चांगली चित्रे काढतोस, तू आर्टिस्टच (चित्रकारच) का होत नाहीस?''

एखाद्या धरणाचं पाणी दार वर उचलताच मोठ्या वेगानं कालव्यात शिरते

त्याचप्रमाणे देऊसकरांच्या वाक्याने आपण चित्रकारच व्हायचे या एकाच दिशेने शंकरच्या मनाची दौड सुरू झाली. शंकरने बाबांना आपला निश्चय पत्राने कळविला. जगातल्या इतर वडिलधाऱ्या मंडळीप्रमाणेच शंकरचे वडील असते तर मुलाचे असले पत्र वाचून त्यांचे मस्तक फिरले असते आणि आपल्या चिरंजीवांची त्यांनी शेलक्या शब्दात खरडपट्टी काढली असती; पण त्यांचे वडील अत्यंत विचारी व शांत वृत्तीचे गृहस्थ होते. त्यांनी त्याच्या चित्रकलेच्या प्रेमाचे कौतुक केले. एवढेच नव्हे, तर 'माणसाचे आयुष्य सफल व्हायचे असल्यास, एखादी कला त्याला अवश्य यायला हवी.' हे आपले मत त्यांनी शंकरला कळवून त्याच्या विचारांना त्यांनी पाठिंबा दिला. त्यांचे म्हणणे एवढेच होते, "तुला चित्रकला आवडते तर तू तिचा अभ्यास अवश्य करावा; पण चित्रकाराचा धंदा तू पत्करू नये. कलेपासून जो आनंद मिळवायचा तो स्वतःची हौस म्हणून. धंदा करायचा म्हटला की स्वतःची आवड-निवड बाजूस ठेवून, ग्राहकाच्या मर्जीप्रमाणे वागावे लागेल. इतरांच्या तंत्राप्रमाणे वागणे कलावंताला फार जाचक होते!"

बाबांचे मार्गदर्शन अत्यंत योग्य होते; पण देऊसकरांच्या स्टुडिओतील कलामय वातावरणात वावरणाऱ्या शंकरच्या मनावर त्या उपदेशाचा काही परिणाम होऊ शकला नाही. बाबांनी संमती दिली; तरी पण चित्रकलेचे शिक्षण घेण्यासाठी इटलीला पाठवावे हे त्यांनी अमान्य केले. "आधी हिंदुस्थानात थोडा अभ्यास कर, मग पुढचे पाहू." असे बाबा म्हणाले. तेव्हा शंकरला वाटले, आपण लाहोरला सोनबा सातवळेकरांच्याकडे जावे. बाबांनी त्यांना पत्र पाठविले. त्यावर सोनबांनी आनंदाने शंकरला शिकण्यासाठी लाहोरला बोलावले.

त्याकाळात लोक प्रवास फार थोडा करीत. "परमुलुखात जायचे कसे काय?" हा विचार न करता तो तयार झाला, कारण चित्रकला शिकण्यासाठी जगाच्या दुसऱ्या टोकाला जायची सुद्धा त्याची तयारी होती.

सतत अडतीस तासांच्या प्रवासाने शंकर अगदी थकून गेला. त्यात उत्तर हिंदुस्थानच्या थंडीने त्याची पुरती परीक्षा घेतली. लाहोर स्टेशनवर नारायणराव वीरकर त्याला उतरून घ्यायला आले. त्यांच्यासह टमटममधून जाताना महाराष्ट्रापेक्षा तिथला सारा देखावा व वातावरण अगदीच भिन्न होते. सगळीकडे दाढीवाले मुसलमान, बुरखा घेतलेल्या स्त्रिया; पण सर्वांचे हाडपेर मोठे, रंग गोरा, कौलाची घरे नाहीत. घरी पोचले, सोनबांचे बिऱ्हाड माडीवर होते. सोनबा आणि त्यांच्या पत्नी सरस्वतीबाई यांनी शंकरचे हसत मुखाने स्वागत केले. घरची चौकशी केली. व त्याला दूध दिले. शंकरच्या आधी थोडे दिवस वीरकर सोनबांच्याकडे फोटोग्राफी शिकायला आले होते. त्यांच्याच खोलीत आणखी एक चौपाई टाकून

शंकरची सोय लावण्यात आली. तिसऱ्या मजल्यावर फोटो काढण्याचा स्टुडिओ आणि डार्करुम होती.

दुसऱ्या दिवशी शंकरचे शिक्षण रीतसर सुरू झाले. त्याच्याप्रमाणे रुपकिसन व गुरुदत्त असे आणखी दोन विद्यार्थी तळमजल्यावरील वर्गात येत होते. प्रथम चारकोल आणि जलरंगाची चित्रे काढण्याचे धडे शंकर घेऊ लागला. पुढे तैलरंगात (ऑईलकलरमध्ये) निसर्गचित्रे काढण्यासाठी त्याला एक स्केचिंग पेटी घेऊन देण्यात आली. तेव्हा त्याच्या अभ्यासाला खरा हुरुप चढला. कारण चित्रित करायचा देखावा पहात, कुंचल्याचे भराभर तडाखे देऊन ते दृश्य फलकावर उतरवताना जो आनंद वाटे तो खरोखर अवर्णनीय असे. त्यात वेळ कसा जायचा याचा पत्ताही लागायचा नाही. एकदा शहराबाहेर शंकर असे चित्र काढीत असता त्याला वेळेची शुद्ध राहिली नाही, त्यामुळे घरी परतायला फार उशीर झाला, म्हणून सोनबा आणि सरस्वतीबाई मोठ्या काळजीत पडले.

सोनबा म्हणायचे, ''ज्याला उत्कृष्ट चित्रकार व्हायचे असेल त्याने डोळ्याला दिसेल त्या वस्तूचे अगर व्यक्तींचे पेन्सिलीने झटपट चित्र काढायला शिकले पाहिजे.'' त्यांनी कुत्रे, झाडाची फांदी, रस्त्यावरचा ओझेवाला अशी रेखाटने एक-दोन मिनिटात करून दाखविली, म्हणजे त्यांचे विद्यार्थी चकित होत असत.

पंडित सातवळेकर नुसते चित्रकारच नव्हते; तर वैदिक वाङ्मयाचे गाढे अभ्यासू व अभिमानी होते. त्यामुळे ते आर्य समाजाचे मोठेच आधारस्तंभ मानले जात. वैदिक धर्माचा पुरस्कार करणारे अनेक लेख व पुस्तके त्यांनी लिहिली होती.

रात्रीचे जेवण झाल्यावर ते शंकरला उपनिषदाची सूत्रे समजावून सांगत. त्यात गोवलेले विचार मोठे तेजस्वी व स्फूर्तिदायक असत. तथापि हे विचार परमेश्वराच्या मुखातून बाहेर पडले असे मानायला शंकरचे चिकित्सक मन तयार व्हायचे नाही.

स्वामी दयानंद सरस्वतींनी लिहिलेले, 'सत्यार्थ-प्रकाश' हे पुस्तकही शंकरने वाचून पाहिले. त्यांनी परधर्मीयांना सडेतोड उत्तरे दिली होती; पण धर्मग्रंथात किती उदात्त तत्त्वे आहेत यापेक्षा लोक त्या तत्वांचे आचरण प्रत्यक्ष व्यवहारात कसे करतात, यावरूनच त्या धर्माची प्रतिष्ठा ठरणार असते. आपल्या समाजात बोकाळलेला जातीभेद अस्पृश्यता, विधवा स्त्रियांच्या बाबतीत अमानुषपणा व अनिष्ट रूढी ह्या सर्व दूर झाल्याशिवाय धर्माची थोरवी कोणापुढे मिरविणे योग्य होणार नाही असे शंकरला त्याही वयात वाटत असे.

लाहोरमधील मूठभर मराठी मंडळी जमायचे ठिकाण म्हणजे शहराबाहेरचे 'गांधर्व महाविद्यालय' पंडित विष्णु दिगंगर पलुस्करांनी त्या चिमुकल्या जागेत संगीताच्या प्रसारासाठी आपल्या संस्थेची स्थापना केली होती. त्यांचे कार्य लवकरच

लोकप्रिय झाले. पंजाब व उत्तर हिंदुस्थानात त्यांच्या शाखा निघाल्या.

पंडित सातवळेकर रविवारी आर्य समाजात प्रवचनासाठी जात, त्यावेळी फोटो काढून घेण्यासाठी जे ग्राहक स्टुडिओवर येत त्यांच्याशी बोलण्यासवरण्याचे काम शंकरलाच करावे लागे. ग्राहकांशी कसे वागावे ही कला त्यामुळे त्याला स्वाभाविकपणेच जमत गेली. सोनबांची परवानगी घेऊन त्यांच्या फोटोग्राफिक स्टुडिओची जाहिरात तेथल्या ''ट्रिब्युन'' या इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये द्यायला शंकरने सुरुवात केली. पंजाबमध्ये गोषांची चाल असल्याने स्वतःच्या कुटुंबाचे फोटो काढून घेण्यास लोक कचरत. तथापि सातवळेकरांची लाहोरमधील प्रतिष्ठा समाजात मोठी होती. आपले दक्षिणी लोक विश्वासाला पात्र ठरल्यामुळे फोटोग्राफीचा धंदा खूप वाढला.

धोपटमार्गापेक्षा काहीतरी नाविन्य काढण्याच्या शंकरच्या स्वभावामुळे फोटोग्राफीच्या मासिकांतून वाचून शंकरने 'पंजाब कॅमेरा क्लब' सुरू केला हौसेने फोटो काढणाऱ्या मंडळींनी एकत्र यावे, निवडक फोटोंचे प्रदर्शन भरवावे, परस्परांचा परिचय व्हावा, स्नेहसंबंध जुळावे हे त्यांचे उद्दिष्ट होते. ते सातवळेकर स्टुडिओच्या प्रसिद्धीला पोषक होते; पण स्थानिक लोकांत त्याचे स्वागत झाले नाही. मात्र विलायतेच्या फोटोग्राफिक मासिकात ही बातमी आल्यावर इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया अशा दूरच्या देशांतून इतकी पत्रे येऊ लागली, की त्यांना उत्तरे देणेच पंचायतीचे झाले.

ह्या खटाटोपात शंकरला सचदेव हा मेडिकल कॉलेजचा विद्यार्थी मित्र मिळून गेला. तो अॅबाटाबादला राहणारा. एकदा त्याच्या गावी जाऊन सरहद्दीवरील निसर्ग पाहण्याचा आग्रह सचदेव सारखा करीत होता. शेवटी मुष्किलीने सोनबांची परवानगी मिळविली आणि शंकर प्रवासाच्या तयारीला लागला.

लाहोर सोडताच प्रथम रावी नदी व पुढे चिनाब व झेलम नद्या गाडीने ओलांडल्यावर अटक स्टेशन आले. मराठ्यांनी ज्या अटकेपार आपले घोडे नाचवून दिगंत कीर्ती मिळवली, त्या अटकेच्याहीपुढे शंकर निघाला. तिथले स्टेशन म्हणजे गढीसारखे मजबूत. लुटारूंचा तेथे सुळसुळाट फार. ते कुठल्या स्टेशनवर किंवा गाडीवर कोणत्यावेळी हल्ला करतील त्याचा नेम नसे. रावळपिंडी मागे टाकून रात्री ११॥ ला हसन अबदल या स्टेशनवर उतरून पुढे अबाटाबादचा तीस मैलांचा प्रवास टांग्याने करायचा होता. तिकडे जाणारे दोन उतारू भेटले. तिघे टांगा ठरवून रस्त्याला लागले. सगळीकडे गडद अंधार, शुकशुकाट, आकाशात उत्तरेस ध्रुव व भोवती फिरणारे सप्तर्षींचे तारे दिसत होते. प्रवासी गुपचूप बसले होते; पण टांगेवाला गप्प नव्हता. तो हातातल्या चाबकाची काठी निरनिराळ्या

दिशांकडे वळवून, 'परवा इथे पठाणाचा मुडदा पडला.' तिथे अमक्याला लुटलं, तर तमक्याची बायको पळवली'' असे सांगत होता; पण तसल्या भयाण ठिकाणी त्या गोष्टी ऐकताना शंकरच्या छातीचे ठोके जोरजोराने पडू लागले. अखेरीस पूर्वेकडील आकाश उजळू लागल्यावर प्रवाशांच्या जिवात जीव आला. पहिला मुक्काम हरीहर येथे झाला. टांग्याची घोडी तेथे बदलली. पुढे सगळीकडे हिरवीगार शेती. आकाशाला लटकवल्यासारखे सभोवताली पहाड. नवाच्या सुमाराला ॲबाटाबाद आले. शंकरचा मित्र सचदेव व त्याचा भाऊ त्याची वाट पहात होते. त्यांना विलक्षण आनंद झाला.

☆

# लाहोरचे दिवस

या प्रांतातील पाहुणचार म्हणजे मोठा और प्रकार होता. शंकर शिवाजीच्या प्रांतातून आलेला ना! त्यामुळे शंकरची जावयासारखी सरबराई सुरू झाली. तिथली भाषा पुष्तू 'सेनामदि' म्हणजे तुमचे नाव काय, ''नमस्कार'' या शब्दाला 'अश्तड मासे' हा प्रतिशब्द शंकरने काही शब्द व वाक्ये शिकून घेतली. आंघोळीला चष्म्यावर जायचे म्हणजे झऱ्यावर. प्रत्येकाजवळ पिस्तुल, कट्यार किंवा रायफल असायचीच.

भोवतालच्या पर्वतरांगातील एका शिखरावर मरी नावाचे थंड हवेचे ठिकाण होते. इतक्या दूर आल्यावर मरीपर्यंत जाऊन यावे असे शंकरला वाटत होते. सचदेव म्हणाला, ''पहाडातून पंचवीस मैल चढउतार करण्याची तुमची तयारी असेल, तर माझी हरकत नाही.'' दर शंभर पावलावर मुक्काम ठोकीत, मेटाकुटीने तीन-चार पहाड पालथे घातल्यावर, शिखरावरून जो भव्य देखावा नजरेसमोर उभा राहिला त्याने त्यांचा सारा शीण नाहीसा झाला. परतताना एका दुकानात दोघे झोपले. पायाची आग होऊ लागली म्हणून पाहिले, तर पायाला फोड आलेले. तसेच काठी टेकीत एक दिवसाचा पल्ला पार करून ते ॲबाटाबादला पोचले. पायाचे फोड दबताच शंकर पेशावरला जाण्याची घाई करू लागला. सचदेव त्याच्या घरीच राहण्याचा आग्रह करीत होता अखेर सचदेवने विचारलं; ''पेशावरला तुम्ही कोणाकडे जाणार आहात?''

लाहोर ते हसन या प्रवासात शंकरला एक म्हातारा पठाण भेटला होता. धिप्पाड देह, तजेलदार डोळे, पांढरीशुभ्र दाढी असा तो शंकरला लाघवी भाषेत ''पेशावरला आमच्या घरी पाहुणचार घ्यायला या'' ''असे फिरून फिरून म्हणत होता. ही हकीगत ऐकताच सचदेव व त्याचे आप्तेष्ट एकदम दचकले आणि शंकरला हात जोडीत म्हणाले'' ''भले महाराज! तुम्हाला हा प्रश्न विचारण्याची बुद्धी आम्हाला झाली आणि प्रश्नाचे सरळ उत्तर देण्याची बुद्धी तुम्हाला झाली, हे दोघांचे नशिबच म्हणायचं! नाहीतर तुम्ही काही परत येत नव्हता.'' शंकरला त्यांच्या बोलण्याचा अर्थ नीट लागेना. तेव्हा सचदेवने सांगितलं, ''परप्रांतातील लोकांना

गोड बोलून न्यायचे, सरकारच्रे हात पोचत नाहीत अशा ठिकाणी नेऊन त्यांचा जीव घेण्याची धमकी घालून, त्यांच्या घरच्या लोकांकडून खंडणीची मागणी करायची, असा राजरोस धंदा तेथे चालतो. तुमच्यावर असा प्रसंग आला असता, तर आम्हाला तुमच्या वडिलमंडळींना तोंड दाखवायला जागा उरली नसती. नशिब तुमचं म्हणून तुम्ही वाचलात. आता लाहोरला नेऊन तुमच्या वडील मंडळींच्या स्वाधीन केलं की आम्ही सुटलो.''

सचदेवचे उद्‌गार ऐकून आपला पुनर्जन्म झाल्याचा आनंद याची देही याची डोळा शंकरला मिळाला.

लाहोरला परतल्यावर उन्हाळ्यामुळे सकाळ नऊनंतर बाहेर पडायची सोय नसे. आँधी आली म्हणजे धुळीच्या वादळाने १२३ अंश उष्णतामानात सर्वांना पुरेपुरे होऊन जायचे. थंडी आली की तिचाही तडाका जबरदस्तच; शंकर सफाईने हिंदी बोलू लागला आणि त्याला पंजाबीही समजू लागले.

एक दिवस शंकर तळमजल्यावरील वर्गात उद्योगात असताना मध्यम उंचीचे, किंचित जाड आणि काळसर रंगाचे एक गृहस्थ स्टुडिओत आले. पंडीतजींना भेटायची इच्छा व्यक्त केल्यावर शंकरने त्यांना त्यांचे नाव विचारले.

ते उत्तरले ''लजपतराय'', आपण केवढ्या मोठ्या देशभक्तापुढे उभे आहोत याची कल्पना येताच शंकरची मोठी गडबड उडाली. त्यांना बसायला खुर्ची देऊन वर जाऊन तो पंडीतजींना घेऊन आला. पुढच्या खेपेस ते आल्यावर शंकरला त्यांच्याशी थोडे बोलायला मिळाले. पुन्हा भेटल्यावर त्यांनी शंकरला कोण, कुठला, अशी विचारपूस केली. त्यामुळे धीर येऊन शंकरने त्यांना विचारलं, ''आपला एक फोटो काढायला मला परवानगी द्याल का?''

त्यांनी ''बडी खुषीसे'' म्हटल्यावर शंकरने त्याला हवी तशी पोज देवून, कॅमेऱ्याने त्यांचा फोटो घेतला. त्या फोटोचे शंकरला अतिशय भूषण वाटू लागले.

चित्रकलेमध्ये शंकरची जरुरीपुरती प्रगती झाल्यावर दोन वर्षे त्याने मुंबईच्या आर्ट स्कूलमध्ये घालवावी असा सल्ला सोनबांनी दिला. घर सोडून दीड वर्ष झाले होते. हळूहळू घराची आठवण येऊ लागली होती; पण उत्तर हिंदुस्थानातील प्रेक्षणीय ठिकाणे आपण अजून पाहिलीच नाहीत हे मनात आल्यावर दिल्ली, आग्रा, हरिद्वार, लक्ष्मण झुला, ऋषिकेष अशा ठिकाणी जाण्याचे शंकरने ठरविले. शिवाय काकांनी दोन लेन्सचा स्टिरिओ कॅमेरा शंकरसाठी इंग्लंडहून मागवून लाहोरला पोचवला होता. सर्व स्थळांचे फोटो घेतल्यावरच घरी पोचायचे त्याने ठरवले.

इतक्या दूर परप्रांतात राहून शंकर सुखरूप घरी आला याचा आईला अत्यंत

आनंद झाला. शंकरची चित्रकलेतील प्रगती पाहून वडिलांना समाधान झाले. भावंडांनी त्याला गराडा घातल्यावर त्याला प्रेमाचे जे भरते आले ते अवर्णनीय होते. चार दिवस शंकरचे विविध अनुभव ऐकून सर्वांची खूपच करमणूक झाली; पण आर्ट स्कूल सुरू व्हायची वेळ झाल्यामुळे सौलापूरचा मुक्काम आवरून शंकर मुंबईला हजर झाला.

मुंबईच्या आर्ट स्कूलचे त्यावेळचे प्रिन्सिपॉल मि. फर्न नावाचे एक अँग्लोइंडियन गृहस्थ होते. त्यांनी शंकरच्या कामाचे नमुने पाहून त्याला एकदम पेंटिंगच्या वरच्या वर्गात बसायची परवानगी दिली. कोल्हापूरचे दत्तोबा दळवी हेही त्या वर्गात होते. त्याशिवाय नारायणराव सरदेसाई, रावळ, पानवळकर, केतकर, चाफळकर इत्यादी अनेक मित्र आर्ट स्कूलमध्ये शंकरला मिळाले. वासरात लंगडी गाय शहाणी म्हणतात, त्याप्रमाणे शंकरइतके शिक्षण झालेला, इतका प्रवास केलेला, त्यावेळी क्वचितच कोणी आर्टस्कूलमध्ये असेल, त्यामुळे शंकरला थोडा शिष्टपणा मिळाला. वर्गावर येणारे तासकर, धुरंधर, आगासकर अशा शिक्षकांपुढे विद्यार्थी नमून वागत. शंकरला मात्र तसा संकोच वाटत नसे. प्रसंग पडला तर या शिक्षकमंडळीबरोबर तो चित्रकलेबद्दल मोकळेपणाने चर्चा करीत असे.

मुंबईत त्याचे मेहुणे गणपतराव सरदेसाई (आबा) यांच्याकडे शंकर गिरगावात राहू लागला. शंकरची वडील-बहिण कृष्णाबाई क्षयाने दोन वर्षापूर्वी दिवंगत झाली असली, तरी आबांनी त्याच्याविषयीच्या आपुलकीत अंतर पडू दिले नाही. तसे घडणे त्या काळात सहसा होत नसे. तेव्हाचे घराणे म्हणजे कोळ्याचे एकेक जाळे; अशी काही जाळी एकमेकाशी चिकटल्यामुळे एक मोठे जाळे तयार होत असे. त्याप्रमाणे किर्लोस्कर-जांभेकर-टेंबे-टिकेकर-सरदेसाई-पुरोहित-सातवळेकर अशा घराण्यांचे एक विशाल जाळे होते.

आर्ट स्कूलमध्ये, एक गोष्ट शंकरच्या लक्षात आली, ती म्हणजे त्याच्यापेक्षाही चांगला हात चालणारे विद्यार्थी आर्ट स्कूलमध्ये होते; पण समोर मांडलेल्या वस्तूचे किंवा व्यक्तीचे आकर्षक चित्र काढता आले म्हणजे तो उत्कृष्ट चित्रकार होऊ शकेल असे नाही, तर त्याच्या कल्पनाशक्तीचीही वाढ होणे जरूर आहे. तशी वाढ झाली नाही, तर चित्र नेमके कशाचे काढायचे हा प्रश्न त्याला सोडवता येणार नाही. चित्रकलेविषयी शंकरला इतके प्रेम वाटे ते डोळ्यांना आनंद देण्याचे एक साधन म्हणून नव्हे, तर शिक्षणाचा अभाव असलेल्या आपल्या देशात समाजाला जागृत व सुसंस्कृत करण्यासाठी चित्रकला हे मोठे प्रभावी साधन ठरेल, अशी त्याची प्रांजळ भावना होती. म्हणून शंकरच्या परीक्षा झाल्या. शंकरला काही बक्षिसे मिळाली; पण त्यापेक्षा विशेष म्हणजे टाऊन हॉलमध्ये भरणाऱ्या बॉंबे आर्ट

सोसायटीच्या वार्षिक प्रदर्शनात त्याची तीन लॅंडस्केप्स (निसर्गचित्रे) निवडून त्यांना ''कमेंडेड'' असा परीक्षकांचा शेरा मिळाला, त्यामुळे शंकर खूप खूष झाला. चित्रकाराला कोणताही सौंदर्याचा प्रत्यय मनाला भुरळ पाडतो. निसर्गाची अद्भूत करामत पाहून मन थक्क होते. एकीकडे डोळे त्या सौंदर्यावर खिळून राहतात आणि हे सौंदर्य कागदावर कसे उतरविता येईल अशा आतुरतेने चित्रकार अतिशय अस्वस्थ होतो. त्याला दुसरा विकार स्पर्श करत नाही. मुंबईतले शंकरचे वर्ष कलेच्या उपासनेत सरले, त्याबरोबर पुढील शिक्षणासाठी इटलीला जाण्याचे बेत त्याच्या मनात घोळू लागले.

दरम्यान चार वर्षांत कुंडलरोडच्या कारखान्याची बरीच वाढ झाल्यामुळे त्या वस्तीचे रुपांतर आता किर्लोस्कर वाडीत झाले होते. वाडीतल्या झोपड्यांपुढे झाडांची रांग लावली होती. काका लक्ष्मणराव यांना पाहून शंकरला आनंद झाला.

घरी जाताच त्याला बाबांशी आपल्या इटलीच्या बेताबद्दल स्वस्थपणे बोलायचे होते; पण बाबांनीच त्याला बोलावणे पाठविले. ते खोलीत एकटेच होते. ते म्हणाले, ''शंकर! तू आलास हे फार चांगले झाले. तुझी आई सारखी तुझी वाट पाहात होती. ती कशाने आजारी आहे हे तुला कदाचित माहिती नसेल. तिला क्षय झाला आहे!'' ते ऐकून शंकरची छाती धडधडू लागली. त्याने विचारले, ''इथल्या हवेने तिला बरं वाटत नाही का?'' ते म्हणाले, ''छे, आजार सारखा वाढत आहे, त्यामुळे असं दिसतयं, की ती आता थोड्या दिवसांची सोबती आहे!''

# आईचा आदेश

बाबांनी गंभीरपणे उच्चारलेले ते शब्द ऐकून शंकरच्या अंगातून एक विजेचा झटका निघून गेल्यासारखे झाले. खरे सांगायचे तर शंकर आता मोठा झाला होता. तो आता विचार करू लागला. आईचे प्रेम कशाला म्हणतात याची त्याला थोडीफार कल्पना होती. तो काळच फार निराळा. ''आई थोर तुझे उपकार'' ही कविता तो लहानपणी शिकला होता; पण तिचा मूळ नीट अर्थ समजला नव्हता. त्याकाळी वडील माणसे मुलांना फारसे जवळ येऊ देत नसत, त्यामुळे त्यांचेबद्दल भीतीचा पगडा मुलांच्या मनावर असे. आई म्हणजे शाळेला जाताना जेवायला वाढणारी व हट्ट केला, की रागाने कान उपटणारे माणूस यापेक्षा तिच्याकडे पाहण्याची मुलांची निराळी दृष्टी नसे. तशात लहानपणी त्याची बेळगावला रवानगी झालेली; पण वयपरत्वे आता त्यांचे डोळे उघडले होते. त्याला दिसू लागले. आईचा जन्म कर्नाटकातला. दहाव्या वर्षी तिचे लग्न झाले. शंकरचे वडील सुधारक-पुरोगामी विचाराचे. त्यांनी तिला लिहायला-वाचायला शिकवले आणि समाजसेवेची आवड निर्माण केली. त्याच्या आईला घरातच नव्हे, तर बाहेरही सर्वजण इतका आदर, मान का देतात याचा त्याला आता उलगडा होत चालला. ती आपल्याच संसारात गढून न जाता गोरगरीब-अनाथ स्त्रियांना शक्य ते सहाय्य देण्यासाठी झटत असे. सोलापूरच्या स्त्रियांना शिक्षण देणारे सरस्वतीमंदिर तिने सुरू केले होते. बालविधवांची हिंगण्याला सोय लावून देणारी, गरीब बायांचे वेळ पडली तर त्यांच्या घरी जाऊन बाळंतपण करणारी, पुरुषांच्या सभेत भाषण करणारी सोलापुरातील ती पहिली स्त्री होती.

शंकर हायस्कूलमध्ये असताना बायजाबाई नावाची एक महार कीर्तनकार सोलापुरात आली होती. तिला आईने घरी बोलावून तिचा पाहुणचार केला व स्वतः पुढाकार घेऊन ठिक ठिकाणी तिची किर्तने केली होती. ह्या सर्व गोष्टी आठवून- आपली आई केवढ्या योग्यतेची आहे ते जाणून-शंकरच्या मनात तिचेबद्दल फार आदर उत्पन्न झाला.

आणि ही आपली आई लवकरच हे जग सोडून जाणार या कल्पनेने त्याच्या

मनात काहूर उठले. त्याला काही सुचेनासे झाले. त्या भरात बाबांचा निरोप घेऊन शंकर तडक आईच्या खोलीकडे गेला. तिच्यासाठी एक स्वतंत्र झोपडी बांधून दिलेली होती. तेथे त्याने पाऊल ठेवले तेव्हा ती शांतपणे पलंगावर पहुडलेली दिसली. किती नि:स्तेज व फिक्कट झाला होता तिचा चेहरा! त्यांची नजरानजर होताच तिची मुद्रा प्रफुल्लित झाली. तिच्याजवळ एक खुर्ची घेऊन शंकर बसला व तिच्या अंगावरून हलकेच हात फिरवू लागला. जरा वेळाने तिने क्षीण स्वरात विचारले, ''बरा आहेस ना तू शंकर?'' त्याने नुसती मान हलवली. ''तुझ्याबद्दल मला फार काळजी वाटते रे! कुठे कुठे तू फिरतोस! काय काय करतोस! तुझं पुढं होणार काय, काही कळत नाही!'' ''पण आई! आता तुला बरं वाटेल असंच मी वागणार आहे. तू मात्र लवकर बरी हो!'' आईच्या डोळ्यांत एक निराळीच चमक दिसू लागली. ती म्हणाली, ''खरंच का हे? खरंच का तू माझ्या मनासारखं वागणार आहेस? किती बरं होईल असं केलंस तर!''

''तुझ्या इच्छेविरुद्ध काहीही करायचं नाही असं मी ठरवलंय आता.''

''देवाने तुला किती चांगली बुद्धी दिली ही! आता मी सांगते ते नीट ऐक. तुझ्या डोक्यातलं चित्रांचं वेड काढून टाक आणि भावोजींच्या इच्छेप्रमाणे त्यांच्याजवळ इथेच रहा. त्यांना तू हवा आहेस. तुझ्या वडिलांनाही यामुळे समाधान लाभेल. म्हण हो''.... आईच्या शब्दांमुळे शंकर गोंधळलाच. ती असा एखादा विलक्षण पेच त्याच्यापुढे टाकील अशी पुसटही कल्पना त्याला नव्हती. काहीतरी पळवाट काढायची म्हणून तो म्हणाला ''आई, कारखान्यात माझा काय उपयोग? मी इंजिनियर थोडाच आहे? कारखान्याला उगीच एक अडगळ व्हायची?''

''तुझा कसा उपयोग करून घ्यायचा हे सारं भावोजींना माहित आहे. तुला नको ती काळजी!'' तिने शंकरला निरुत्तर केले, ''ठिक आहे, तू सांगतेस त्याला मी तयार आहे.'' शंकर म्हणाला. त्यांचे संभाषण तेथेच संपले. थोड्याच वेळात काका शंकरच्या आईची प्रकृती कशी आहे हे पहायला आले. त्यांना पाहताच आई म्हणाल्या. ''हं, भावोजी! घ्या या शंकरला तुमच्या ताब्यात. यापुढे त्याने तुमच्याजवळ राह्यंच कबूल केलं आहे. सांभाळा तुम्हीच आता त्याला!'' काकांनी नुसते शंकरकडे पाहिलं. त्याची नजर खाली वळली. आईशी इकडच्यातिकडच्या गोष्टी बोलून त्याने तिचा निरोप घेतला.

थोड्या वेळातच काकांचे त्याला बोलावणे आले म्हणून तो ऑफिसात गेला. तिथे कारखान्याचे सारे कामगार व कारकून एक अर्धवर्तुळ करून उभे होते. हा काय प्रकार असावा, असा शंकर विचार करतो आहे, तेवढ्यात काकांनी हाक मारून त्याला सर्वांपुढे उभे केले व भोवतीच्या समुदायाला उद्देशून ते म्हणाले ''हा

माझा पुतण्या शंकर! आजपासून तोही तुमच्याप्रमाणेच कारखान्यात कामाला लागणार आहे हे सांगायला मला फार आनंद वाटतो. पत्रव्यवहार, जाहिराती ही कामे तो पाहिल. त्याचे हस्ताक्षरही फार सुवाच्च वळणदार आहे. इंग्रजीही सुरेख लिहितो. यासाठी मी त्याला ऑफिसात नेमणार आहे. त्याला नव्या नव्या कल्पना काढण्याची आवड आहे, त्यामुळे आपल्या कारखान्याला त्याचा पुष्कळ उपयोग होईल, याचा मला विश्वास वाटतो. आजपासून हा आपला सर्वांचा ''शंकरभाऊ''.

सर्वांनी टाळ्या वाजवून शंकरभाऊंचे सहर्ष स्वागत केल्यावर तो परत आईच्या झोपडीकडे आला. तोपर्यंत बाबाही तेथे आले होते. त्या दोघांनाही ही हकीगत कळल्यावर पराकाष्ठेचा आनंद झाला व त्यांनी मोठ्या प्रेमाने शंकरची पाठ थोपटली.

ही १९१४ च्या मे महिन्यातील गोष्ट. अंतोबा फळणीकरांची व शंकरची पुन्हा जोडी जमली, म्हणून त्या दोघांनाही आनंद झाला. मात्र तो ताबडतोब कामाला लागला नाही.

वाडीतले पुढचे दिवस आईजवळ राहून तिचे जेवढे मनोरंजन करता येईल तेवढे त्याने करावे असे शंकरला वाटे; पण त्याने तिच्याजवळ बसू नये म्हणून ती वरचेवर ताकीद द्यायची पण ते मात्र त्याने ऐकले नाही.

वाडीला राहून गुण येण्याची शक्यता संपल्यावर तिला घेऊन शंकरचे बाबा व शंकर सोलापुरास आले. तिला कळून आले की आपले थोडेच दिवस आता उरले आहेत; पण तिची शांत वृत्ती किंचितही ढळली नाही. अनंत चतुर्दशीच्या सुमारास एका सायंकाळी तिने या नश्वर जगाचा निरोप घेतला. शंकरला आईच्या चिरवियोगाचे फार दु:ख झाले; पण निदान शेवटच्या दिवसांत आईला सुखी करून आपलं कर्तव्य केलं एवढेच समाधान त्याला होते. थोड्याच दिवसांत सोलापूरला सर्वांचा निरोप घेऊन तो किर्लोस्करवाडी येथे दाखल झाला.

सोलापुराहून किर्लोस्करवाडीस येऊन शंकरभाऊ कामावर रुजू झाले त्यावेळी ऑफिसमध्ये जुनी मंडळी बरीच होती. त्यांचे सहकार्य मिळविण्यासाठी आपण एक शिकाऊ उमेदवार आहोत अशी त्यांच्याशी वागण्यातील भूमिका शंकरभाऊ घेत होते. गोड व नम्र भाषेला किंमत पडत नाही, पण तिचा फायदा फार होतो हे शंकरभाऊ जाणून होते.

☆




''झुंजविता हात वेगळाची!'' (जुलै, १९३७)

# नांगर विक्री ते समाजमंदिर

दर मंगळवारच्या ''केसरीत'' किर्लोस्कर नांगरांची जी जाहिरात द्यायची ती जाहिरात नवी असली पाहिजे असा काकांचा कटाक्ष होता; पण केसरीच्या संपादकांना ते पटेना. शेवटी केसरीचे ज्येष्ठ विश्वस्त तात्यासाहेब केळकर यांच्यापर्यंत तक्रार नेल्यावर ती एकदाची दूर झाली. दर आठवड्याला नव्या कल्पना काढायचे काम सोपे नव्हते. विलायती मासिकातून येणाऱ्या जाहिराती पाहूनही शंकरभाऊंना नव्या कल्पना सुचत. नांगरांचा हंगाम ऑक्टोबर ते फेब्रुवारीअखेर, बाकीचे सात महिने कारखान्याला काम काय द्यायचे होते. त्यासाठी बिडाचे नक्षीदार कठडे खलबते लोखंडी खाटा, तवे असा विविध प्रकारचा माल केला जायचा. जाहिरातीसाठी मजेदार ओव्या केल्या होत्या. 'किर्लोस्कर बंधुनी लोखंडाचं चाक केलं, पाणी शेंदायचं सोप झालं.' 'किर्लोस्कर बंधूकडे होतो आंबोळ्याचा तवा, आपल्या घरी एक हवा दादाराया॥'

अशा आकर्षक जाहिरातींचा खूप उपयोग होऊन चौकशीची पत्रे येत. त्या चौकशीचे मागणीमधे रुपांतर करणे हे दुसरे काम. त्यासाठी पत्रव्यवहाराने पाठलाग करणे आवश्यक असे आणि तेही एका पत्राने काम झाले नाही तर दुसरे-तिसरे अशी कधी सात-आठ सुद्धा पत्रे जात. ग्राहकांच्या आळसाने, बेफिकीरपणाने अथवा अविश्वासाने ज्या मागण्या मिळू शकल्या नसत्या त्या सर्वही फिरून हाती येत.

तरी नुसत्या जाहिराती व पत्रव्यवहारानेच धंदा कसा वाढणार? त्यावेळी पिढ्यान् पिढ्या चालत असलेल्या लाकडी नांगराशीच नव्हे, तर सरकारी शेतकी खात्यामार्फत जोराने पुरस्कार केलेल्या विलायती नांगराशीही गाठ होती. यासाठी केव्हा केव्हा परगावी जाऊन किर्लोस्कर नांगर कशी खोलवर नांगरट करतो हे शेतकऱ्यांना नांगर चालवून दाखवावे लागे. ते पाहण्यास एक जत्राच भरत असे. या कामासाठी भाऊराव पाटील यांना नेमण्यात आले होते. गावोगाव जाऊन-तेथे प्रत्यक्ष दाखवून लोखंडी नांगराची उपयुक्तता ते पटवून देत असत. या त्यांच्या फिरतीवर शंकरभाऊही कधी कधी त्यांच्यासोबत जात असत. त्यावेळी खेड्यातील जनतेचे

दारिद्र्य, अज्ञान आणि रूढी सोडून नवा विचार पटणे अवघड ही स्थिती पाहून त्यांचे आपआपसात बोलणे होई. हे भाऊराव म्हणजे मागासलेल्या वर्गांना शिक्षणाची दारे उघडून देणारे सातारचे कर्मवीर भाऊराव पाटील होत!

कारखान्याच्या मालाचा प्रसार होण्यासाठी स्वदेशी उद्योगाची माहिती नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाली, तर लोकांच्या मनावर विशेष प्रभाव पडेल असे शंकरभाऊंना वाटू लागले. एकदां बेळगावचे अण्णासाहेब लठ्ठे यांनी किर्लोस्करवाडीस भेट दिली, तेव्हा कारखान्यासंबंधी त्यांनी एक लेख लिहावा असे त्यांना सुचवून, शंकरभाऊंनी त्यासाठी कारखान्याचे फोटोही काढून दिले. त्या काळातील लोकप्रिय मासिक ''मनोरंजन'' यामध्ये तो लेख प्रसिद्ध होताच शंभर जाहिरातींनी झाली नसती एवढी प्रसिद्धी किर्लोस्कर कारखान्यास मिळाली. पुढे इतरही नामवंत वृत्तपत्रांमध्ये कारखान्याबद्दल गुणग्राहक लेख यावे अशी खटपट शंकरभाऊंनी केली. त्याला फारसे यश आले नाही.

लक्ष्मणराव अमेरिकन कंपन्यांचे कॅटलॉग, माहितीपत्रक तसेच इतर औद्योगिक साहित्य मागवीत असत. ब्रिटिशांची हुकुमत झुगारून अमेरिकेने स्वतंत्रपणे आपल्या उद्योगधंद्याची प्रगती चालविली होती. याचे भारतीय उद्योजकांना त्यावेळी विशेष अगत्य वाटे.

एकेदिवशी अमेरिकेच्या टपालातून ''फोर्ड टाईम्स''चा अंक आला. मोटारी तयार करणाऱ्या फोर्ड कंपनीचे हे प्रकाशन दरमहा प्रसिद्ध होते असे दिसले. ते पाहून आपल्या कारखान्यांची प्रसिद्धीही आपणच का करू नये असा विचार शंकरभाऊंनी लक्ष्मणरावांपुढे मांडला आणि ''किर्लोस्कर खबर'' हे नाव त्यांना सुचविले. स्वावलंबनावर लक्ष्मणरावांची विशेष श्रद्धा असल्याने, ''चांगली आहे. तुझी कल्पना, लागा उद्योगाला!'' असा पाठिंबा त्यांनी दिला.

स्वदेशी उद्योगाचा विकास करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे लक्ष्मणराव आणि समाजमनाची जाण व त्याला प्रभावित करण्याची जाणीव व कौशल्ये ज्यांच्या मनात बालपणीच रुजली होती. असे शंकरभाऊ, या दोघांच्या एकवाक्यतेने 'किर्लोस्कर खबर'चा जन्म झाला. १९१६ चा पहिला अंक दुसऱ्याच्या छापखान्यात छापून घेतला; परंतु आता नियमित मासिक काढायचे तर ते आपणच छापायला हवे, हे त्यांनी पक्के ध्यानात घेतले; पण त्याची वेळ यायला अवकाश होता.

त्या काळात स्थळी, काष्ठी पाषाणी 'किर्लोस्कर नांगर' विकणे इकडेच त्यांचे सारे लक्ष. शंकरभाऊंच्या ऑफिसातून स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर उतरणारी माणसे दिसत. एखादा व्यापारी, शेतकरी कारखान्याच्या दिशेने येऊ लागला की 'या

पाहुणे' असे स्वागत करून शंकरभाऊ पुढे जायचे; पण एक दिवस कोट-रुमाल, उपरणे पेहेरलेले गृहस्थ आले असताना त्यांच्याशी नांगराबद्दल बोलू लागल्यावर ते शंकरभाऊंना म्हणाले, ''मला नांगर नको आहे. कारखान्यात अनंतराव फळणीकर आहेत ना! त्यांना माझी मुलगी दाखविण्यासाठी मी आलो आहे.'' ते ऐकून शंकरभाऊ हादरलेच. कारण त्या दोघांनी ''लग्न करायचं नाही'' असे पक्के ठरवले होते; पण काका-काकींच्याकडे अंतोबा गेला, तो लग्नाची तिथी ठरवूनच आला. किर्लोस्करवाडीतले ते पहिले लग्न थाटात साजरे झाले; पण आता शंकरभाऊंना फारच एकटे एकटे वाटू लागले.

शंकरभाऊंची आई नुकतीच गेली होती, त्यामुळे आता घरात सून आणावी अशी सर्वांना उत्सुकता होती. त्यावेळी शंकरभाऊंच्या बाबांच्याबरोबर मेडिकल कॉलेजात शिकलेले डॉ. लक्ष्मणराव पुरोहित, हे त्यांची कन्या-मुक्ता-हिच्यासाठी स्थळे शोधत होते. डॉ. पुरोहितांच्या बोलवण्यावरून शंकरभाऊ मुंबईस गेले. मुक्ताचे वय १३ वर्षांचे होते. नाक-डोळे ठसठशीत, गोरा रंग, शिक्षण मराठी तिसरीपर्यंत. मुंबईस भेटल्यावर मुक्ताने गाणे म्हणून दाखविले. त्याला शंकरभाऊंनी पेटीवर साथ केली. त्या प्रसंगाने त्यांचीही उत्सुकता वाढली. तडकाफडकी मुहूर्त ठरून मुंबईतच लग्न झाले. मुक्ताची पार्वतीबाई झाली.

किर्लोस्करवाडीत काकांनी शंकरभाऊंच्या संसारासाठी आवडीप्रमाणे वाडीतील सर्वांत उंच जागेवर एक चिमुकले घर बांधून ठेवले होते. तेथे बाहेरच्या ओसरीवर उभे राहिले की कृष्णा खोऱ्याचा मोठा टापू दिसत असे. घरात दोघेच राहणार होते. जरुरीपुरते सामानही लागले होते. भिंतीवर शंकरभाऊंनी काढलेली दोन-चार चित्रेही लावली होती. एक ग्रामोफोन, बाजाची पेटी असे व्यवस्थित मांडलेले होते. बाहेरच्या अंगास ''शांती निवास'' या नावाची छोटी पाटीही लावली होती.

एके दिवशी ऑफिसात आल्यावर काकांचे बेळगावपासूनचे हरकामी सहाय्यक के. के. कुलकर्णी बोलताना सहज म्हणाले, ''या भूमीत येऊन पाच वर्षे झाली आपल्याला.'' शंकरभाऊंनी विचारले, ''कोणता दिवस होता?'' ''के के म्हणाले, ''अहो, ४ दिवसांनी येणारा धूलिवंदनाचा दिवस! बघा दिवस कसे भरभर गेले.'' एकीकडे हे सारे ऐकताना शंकरभाऊंच्या मनात आले, 'धुलवडीच्या दिवशी लोक घाणेरडेपणा करतात; पण आपल्या कारखान्याच्या या स्थापनादिनाच्या निमित्ताने आपण उत्सव का करू नये?' केकेना, हा विचार सांगताच त्याला काकांची परवानगी घेण्यासाठी दोघे काकांना भेटायला गेले. कोणतीही चांगली कल्पना काकांना सांगितली व त्यामध्ये आपल्या कामगारांची सुधारणा होईल अशा

कामास ते नेहमीच उत्तेजन देणार हे ठरलेले. मग मंडळी कार्यक्रम ठरवू लागली. या निमित्ताने ''शिमगा स्पोर्ट्स'' म्हणून कामगार व नागरिकांच्या साठी कुस्ती व रस्सीखेचपासून काही खेळांच्या स्पर्धा ठेवण्यात आल्या. त्यामध्ये स्त्रियांनी डोक्यावर भरली घागर घेऊन पळण्याची शर्यतही ठरली. ही एक छोटी सामाजिक क्रांतीच होती. डोळे बांधून गाढवाला शेपूट लावण्याचे हसवणारे खेळही घेतले आणि दोन दिवस मजेत गेले आणि १९१५ पासून हा उपक्रम दरवर्षीच करायचे ठरले.

१९१७ मध्ये इनफ्ल्युएन्झाच्या साथीने साऱ्या देशांत हा:हा:कार उडवला होता. ही साथ पसरत चालली आणि आठ-दहा दिवसांत तिने किर्लोस्करवाडीला घेरले. एकामागून एक ऐंशी कामगार तापाने फणफणून गेले. वाडीत घरोघरी आजाऱ्यांची अंथरूणे पसरली. त्यावेळी लक्ष्मणराव, अंतोबा, शंभोराव यापैकी कोणीच वाडीत नव्हते. होता होता पॅटर्न खात्यातील संतू सुतार उन्माद चढून बडबडू लागला. शंकरभाऊ त्याला आवरायला गेले पण त्याच्या नाडीला हात लावताच ती बंद आहे असे आढळले. श्वासही बंद झाला. वाडीतला हा पहिला मृत्यू. त्याची पुढील व्यवस्था कशी करायची याचा विचार आजवर झालाच नव्हता. पण आता वाडीपासून थोडे लांब, रेल्वे पुलाच्या पलीकडील जागेत, शेते तुडवीत निवडुंगातून चालत जाऊन तेथे त्याला अग्नी दिला. एकाला पोचवून यावे तर तेवढ्यात दुसरे प्रेत तयार, असा प्रकार ८-१० दिवस चालला.

एव्हाना पहिले महायुद्ध सुरू होऊन तीन वर्षे झाली होती. भारतातले खडे सैन्य परदेशात पाठवता पाठवता अशी वेळ आली, की भारतावरच परचक्र आले तर त्याला तोंड द्यायला लष्करी सामर्थ्यच येथे उरले नाही. हा आणीबाणीचा प्रश्न सोडवायचा असेल, तर तातडीने जादा सैन्य उभे करायला हवे होते. या गंभीर प्रसंगात लोकमान्य टिळकांनी महाराष्ट्रातल्या तरूणांना सैन्यात दाखल होण्यासाठी कळकळीचे आवाहन केले. ''केसरी''तील त्यांच्या स्फूर्तिदायक लेखाने वाडीतील चाळीस कामगारांनी प्रादेशिक फौजेत दाखल होण्यासाठी नावे नोंदवली; पण सातान्यास वैद्यकीय तपासणीतून फक्त सातजणांची निवड झाली. शंकरभाऊ, अंतोबा, शंभोराव जांभेकर, करजगीकर, मंगेशराव रेगे, मडूरकर, पागे ही मंडळी १९१८ साली फेब्रुवारी १५ला घोरपडी स्टेशनवर उतरली आणि कँपच्या राहुट्यांत त्यांनी बिस्तारा ठेवला. लष्करी शिस्तीत सकाळ-संध्याकाळ तीन तास घामाघूम करणारे ड्रिल; दुपारी उन्हात तासभर मार्चिंग; फायरिंगची सवय करताना खांदा निखळायचा. त्यांच्याबरोबर शिक्षणाधिकारी, वकील, इंजिनियर असे सारे जण लाज सोडून सर्व कामे आपली आपण करण्यासाठी तयार झाले. या मंडळींचा काटकपणा खूप वाढला आणि कुठलेही काम संघटितपणे कसे पार पाडावे, याची

शिस्त शिकायला मिळाली. तेवढ्यात युद्धच संपले.

आणि वाडीची मंडळी परत कारखान्यात येऊन पोचली, तेव्हा आपल्या सर्व कामगारांना ड्रिलची शिस्त लावण्याचा विचार त्यांचे मनात आला. कामावर येताच परस्परांना ''गुडमॉर्निंग'' म्हणायचे येथपासून, उभे कसे राहावे, चालतांना पावले कशी टाकावी, यासाठी ७५० कामगारांची परेड दर आठवड्यास घेण्याचे काम शंकरभाऊंवर सोपवले गेले. त्यातूनच वाडीच्या संरक्षणासाठी रात्री गस्त घालण्याचे काम नागरिकांच्या पाळ्या लावून आठवड्यातून एकदा रात्री १० ते पहाटे ४ करण्याची पद्धत सुरू झाली.

या साऱ्या व्यापात शंकरभाऊ मनापासून गुंग झाले आणि किर्लोस्कर मासिकाचे काम थोडे विस्कळीत झाले.

ऑफीसच्या कामातून थोडी सवड मिळाली की शंकरभाऊ कारखान्यातून एखादी चक्कर टाकीत. त्यामुळे काम करणाऱ्यांची आपुलकी वाढत जाई. एकदा बोलतांना विलायतेतील कामगार नुसतच चांगलं काम करीत नाहीत, तर भरपूरही काम करतात. आपणही तीच दृष्टि ठेवायला हवी, तरच परदेशी मालाशी टक्कर देणे आपल्याला सोपे होईल असे शंकरभाऊंनी सांगितले. एवढे ऐकून दादू न्हावी, विठू माने व त्यांचे दोघे मदतनीस यांनी आठ तासांत दोनशे मोल्ड घालून त्यांत रस ओतून नांगराचे भाग तयार करून दाखविले. हा त्यांचा पराक्रम पाहण्याला लक्ष्मणरावापासून सारे कामगार व घरातली मंडळीही येऊन गेली. लक्ष्मणरावानी त्यांना योग्य ते पारितोषिक दिले. थोड्या दिवसांनी मोगलाईतील एक ग्राहक मुल्ला नजफअल्ली कमरुद्दीन कारखान्यात आले. शंकरभाऊ त्यांना म्हणाले ''आपण आलात त्याबद्दल आम्हाला आनंद आहे. पण आम्हाला ऑर्डर दिल्याशिवाय आपण जावे हे ठीक वाटत नाही.'' ते खोखो हसत म्हणाले ''आप सच कहते है लेकिन आपके पास नांगर है कहाँ?''

त्यांचे म्हणणे खरे होते तेवढ्यात कारखाना सुटल्याची घंटा झाली व कामगार नेहमीचे कपडे घालून बाहेर पडू लागले होते. शंकरभाऊ म्हणाले, ''आपण ऑर्डर तर द्या. आम्ही माल दिला नाही तर आमची आपोआप परीक्षा होईल.'' ''ठीक आहे घ्या माझी पन्नास नांगरांची ऑर्डर.'' शंकरभाऊ चटकन घंटेकडे गेले व ती वाजवायला सुरूवात केली. कामगारांना हा काय घोटाळा ते समजेना. ते पुन्हा कारखान्याच्या दारांत जमले तेव्हा शंकरभाऊ म्हणाले, ''आपले आजचे काम संपले आहे. पण हे गिऱ्हाईक मोगलाईतून आले आहे. त्यांना पन्नास नांगर हवेत. पण ते आजच्या आज मिळाले पाहिजेत अशी त्यांची अट आहे. तेंव्हा आपण काय करायचं हे विचारायला घंटा देऊन मी तुम्हाला बोलावले आहे''; कामगारांनी

त्यांचे उत्तर कृतीनेच दिले. आपले कपडे उतरून कामगार पुन्हा कामाला लागले. खाते प्रमुख खात्यातून हिंडून त्यांना हुरूप देत होते. साच्यांची माती काढणे, भट्टी लिंपणे, कोळसा व लोखंड भट्टीत भरणे, अशी कामे वेगाने होऊ लागली. नांगराच्या फाळाची कास्टिंग्ज बाहेर पडून एमरीकडे निघाली. नांगर जोडून रंग देण्याचे काम सुरू झाले. ते तपासल्यावर मार्क घालून स्टेशनला रवाना करण्यासाठी वॅगनमध्ये भरून रेल्वे रिसिट काढायला के. के. कुलकर्णी तयार होतेच. मुल्लासाहेबांनी कंदिलाच्या उजेडांत आपली हुंडी लिहून दिली व शेवटी सर्व कामगारांना शाबासकी दिली. दुसऱ्या दिवशी त्या कामगारांना सुट्टी दिल्याचे सांगून शंकरभाऊही घराकडे परतले. ते मनांत म्हणत, ''केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे।'' एका रात्री पन्नास नांगर हा एक धडा आहे.

किर्लोस्करवाडी हे आता एक चिमुकले गाव झाले होते, त्यातील वस्ती व कारखान्यांतील कामगार या सर्वांचे मिळून एक विशाल कुटुंब होत जाणे स्वाभाविक होते. त्यांचे परस्परसंबंध एकोप्याचे व गोडीगुलाबीचे असणे अर्थात आवश्यक होते. काका नुसते कारखानदार नव्हते; तर एक सुधारकही होते. त्यामुळे वाडीमध्ये अस्पृश्यता पाळणे व दारू यावर कडक बंदी होती. पण कोणतेही चांगले काम सर्वांनी मिळून करण्यास त्यांचे जोरदार प्रोत्साहन असे.

दिवसभर कामानंतर सुट्टीचा वेळ आनंदात जावा यासाठी माळावर फुटबॉल खेळायला सुरुवात झाली. भरपूर व्यायाम देणारा, खेळायला सोपा. खेळ सुरु झाला कि गावातील माणसे खेळ बघायला यायची. संध्याकाळी खेळताना छान रंग भरायचा. कोण वरिष्ठ-कोण कारकून याची कुणाला शुद्ध राहणार? काही दिवस जाताच औंधच्या युवराजांकडून क्रिकेट मॅचसाठी आमंत्रण आले. कारखान्यात क्रिकेटची बॅट हातात धरलेले इनमिनतीनच खेळाडू होते. इतरांना क्रिकेट कशाशी खातात हेही माहीत नव्हते. तरी टीम बनवून औंधला गेली. तेथे व्हायचे तेच झाले; पण तरुण मंडळींनी मनावर घेऊन वाडीस परतल्यावर क्रिकेटचा खेळ शिकण्यास सुरुवात केली.

पुढे गणपती उत्सव आल्यावर सामुदायिकरीत्या घडवून आणलेले कार्यक्रम यशस्वी होतात व सर्वांना आवडतात हे दिसून आले. वाडीकरांपैकी कोणीही कधी-नाटकात काम केले नव्हते, तरी तात्यासाहेब केळकरांचे ''तोतयाचे बंड'' हे गाजलेले नाटक करायचे ठरवले. त्यांनी पुस्तकाची एक प्रत व प्रयोग करण्याची परवानगी दिल्याचे कार्ड पाठवले होते. स्त्री पात्रांची कामे अंतोबा, शंकरराव ओगले यांनी पत्करली.

नाटक करण्यासाठी मोल्डिंग शेडमधील वाळू बाजूस करून थिएटर तयार

केले. भाऊरावांनी गावोगाव पत्रके वाटली. शिवाय औंधहून राजेसाहेब, कोल्हापूरहून भास्करराव जाधव अशी बडी मंडळी नाटक पाहायला आली. नवख्यांचे नाटक असूनही नाटक रंगले. खूप टाळ्या मिळाल्या. श्रीमंतांनी व काकांनी सर्वांच्या पाठीवर थाप मारून शाबासकी दिली.

पुढील एका वर्षी धुंडीराज फाळके त्यांचे चित्रपट घेऊन गणपती उत्सवाचेवेळी वाडीस आले. 'राम-रावणाचे युद्ध', मारुतीचे उड्डाण असे पाहून लोक देहभान विसरले.

मनोरंजनाचे असे कार्यक्रम मोल्डिग शेडमध्ये करण्याने कामाचा खोळंबा होतो हे खरेच होते. तेव्हा सर्वांनी एकमत करून इमारतीच्या सामानाची तरतूद कारखान्याने केली तर आम्ही श्रमदानाने थिएटर बांधू अशी कल्पना काढली'' ही सूचना काकांनी लगोलग मान्य केली.

कुणाला खरे वाटो - न वाटो, अस्तन्या सावरून दीड-दोनशे मंडळी कामाला लागली आणि वीस दिवसांत वाडीत समाजमंदिर उभे राहिले. कोल्हापूरच्या बाबुराव पेंटरांनी पडदे, विंगा, दर्शनी चौकटी करण्यास मदत केली. त्याचे उद्‌घाटन थोरल्या जांभेकर आत्याबाईच्या हस्ते झाले. पुढे बालगंधर्वापासून अनेक प्रमुख नाटककंपन्यांची नाटके किर्लोस्करवाडीमध्ये याच समाजमंदिरात झाली. प्रत्येकजण समाजमंदिरातील स्टेजची तोंड - भरून प्रशंसा करीत असे. वाडीच्या सर्व कार्यक्रमांना याच समाजमंदिराचा उपयोग होऊ लागला.

युद्ध संपल्यानंतर बदललेल्या परिस्थितीत किर्लोस्कर कारखान्याला भागभांडवलाची जोड मिळाली, तर अधिक विकासाची संधी होती, म्हणून कंपनी लिमिटेड करायचे ठरले. त्यासाठी बरीच स्टेशनरी छापावी लागणार म्हणून मुंबईस जाऊन छपाईसाठी चँडलर कंपनीचे एक ट्रेडल व अक्षरांचे खिळे वगैरे सामुग्री आणली. छपाईच्या कामात कारखान्यातील गणपतराव विजापुरे यांची शंकरभाऊंना मदत मिळाली. या निमित्ताने छापण्याची सोय झाल्यावर नियमित मासिक काढणे खूपच सुलभ झाले. शंकरभाऊंना वाटे, मासिकामुळे आपल्या कारखान्याला प्रसिद्धी तर मिळेलच; पण त्याच्या सहाय्याने आपणास थोडी सामाजिक जागृतीही करता येईल.

☆

# किर्लोस्कर खबर

त्यावेळच्या आपल्या समाजात पाहावे तो आळस, निरुत्साह, स्वत:विषयी औदासीन्य या अवगुणांची वाढ झालेली आढळत होती. तेथे वाचकांच्या मनात स्वावलंबन, आत्मविश्वास, महत्त्वाकांक्षा व साहस इत्यादी गुणांचे बीजारोपण करण्याचे कार्य पद्धतशीरपणे करता येईल आणि त्यामुळे जीवन यशस्वी व सुखी करण्यास हे मासिक मदत करील असे शंकरभाऊंना वाटू लागले.

१९२० च्या जानेवारीत पुन्हा पहिला चार पानी अंक तयार झाला. त्या दुपारी शंकरभाऊ आणि गणपतराव यांनी पत्राप्रमाणे पाकिटात घालून आप्त-मित्र-ग्राहकबंधू अशा ३०० मंडळींना हा अंक पाठविला. या अंकाच्या शिरोभागी

**आळस अवघाची दवडावा । यत्न उदंड करावा ।**
**शब्द मत्सर न करावा । कोणा एकाचा ।।**

असे रामदासांचे वचन छापले होते. अंकामध्ये '' किर्लोस्कर खबर हे एक छोटेखानी वर्तमानपत्र असून, त्यामधून कारखान्याचे ग्राहक, मित्र व चाहते यांना कारखान्याच्या उद्योगाची व प्रगतीची नियमित माहिती देऊ. वाचकांनीही त्यांचे अनुभव व माहिती कळवून 'किर्लोस्कर खबर'ची उपयुक्तता वाढवावी'' अशी संपादक या नात्यांनी विनंती केली होती. प्रत्येक महिन्याच्या १तारखेला अंक बिनचूक प्रसिद्ध होईल, मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक लेखाला ऐपतीप्रमाणे मोबदला दिला जाईल असे सुरुवातीपासून धोरण ठेवले होते.,

याच अंकात ''एफिशिएन्सी'' या मासिकावरून अनुवादित केलेली एक गोष्ट दिली होती. वर्तमानपत्र टाकणारा एक मुलगा बर्फाच्या वादळात सापडून अपंग झाला; पण अनाथाश्रमात राहण्याचे नाकारून, भीक न मागता, आपली बुद्धी चालवून-शिक्षण घेऊन नंतर तो बँकिंग असोसिएशनचा अध्यक्ष झाला. त्याची स्फर्तिदायक हकिगत दिली होती. दुसरा लेख 'युद्धोत्तर साम्राज्याचा व्यापार' या इंग्रजी पुस्तकावरून लिहिलेला होता. 'शांतता झाल्यावर सर्वच राष्ट्रे हिंदुस्थानावर बुभुक्षिताप्रमाणे तुटून पडण्याची तयारी करीत आहेत.' हे सांगून, 'जोपर्यंत आमच्या

देशबांधवांना स्वदेशी धंद्याबद्दल प्रेम व स्वाभिमान वाटत नाही, तोवर कुणी घरही धुवून नेले तरी तक्रार करायला काय जागा आहे?' असे उपरोधाचे उद्गारही नमूद केले होते. शंकरभाऊंची देशी उद्योगाबद्दलची कळकळ हे उद्‌गार उत्तम प्रकारे दाखवितात. या अंकात दूत मासिक, सोलापूर हँडलूम विव्हींग कंपनी, ओगले यांचे काचसामान अशा जाहिराती आहेत.

यापुढील अंकातून उजव्या अंगास संपादकीय व डाव्या अंगास सुभाषिते, उदाहरणार्थ 'आळसाला आजचा दिवस दिला की उद्याचा त्याने चोरलाच म्हणून समजा!'' अशी कार्यप्रवृत्तीपर सुभाषिते आहेत. चौथ्या अंकापासून शंकरभाऊंनी 'यशस्वी धंद्याचे मार्ग' ही लेखमाला लिहिणे सुरू केले. 'इहवृत्त' सदरात कारखाना आणि वाडीमधील घटना, परिवारातील यशस्वी विद्यार्थी इ. बातमी स्वरूपाची माहिती देत. पत्रकारितेच्या सर्व अंगांना स्पर्श करणारी शंकरभाऊंची व्यापक दृष्टी सुरुवातीपासूनच नजरेस पडते.

क्रिकेट असो नाहीतर नाटक असो, साऱ्या नादामागे कारखान्याच्या उत्कर्षाची, लोकप्रियतेत भर घालण्याची शंकरभाऊंची कळकळीची इच्छा होती. त्यांच्या अमर्याद भक्तीने आणि बाबुराव पेंटर यांच्या सहाय्याने कारखान्याची व किर्लोस्कर नांगराची एक फिल्म करून घेतली. १९१८ च्या सुमारास महाराष्ट्रात ही पहिली औद्योगिक फिल्म काही दिवस चित्रपटगृहात दाखवली जाई.

किर्लोस्कर खबर मासिकासाठी गणपतराव विजापुरे हा आदर्श जोडीदार शंकरभाऊंना मिळाला. दोघेही मुद्रणकलेत नवखेच; पण गणपतरावांची कल्पकता व यंत्रशास्त्रात जन्मापासून गती. कोणतेही काम हाती घेतले म्हणजे ते पुरे केल्याशिवाय राह्यचे नाही ही त्यांची वृत्ती. हिशेबात तर त्यांचा हातखंडा. प्रत्येक काम आरशासारखे स्वच्छ असायचे.

चित्रांचे ठसे करण्यासाठी प्रोसेस कॅमेरा नव्हता; पण साध्या कॅमेऱ्यात उलटी काच घालून काम चालवण्यात येऊ लागले. एक दिवस भट्टीत टाकायच्या लोखंडाच्या मोडीत काकांना एक फुटका हँडप्रेस दिसला आणि त्यांनी तो दुरुस्त करून शंकरभाऊंना दिला. तेव्हा नव्या उत्साहाने ते कामास लागले. छपाई आणि व्यवस्थापनाची सोय झाली; पण मासिकाच्या संपादनाचे काम शंकरभाऊंना एकट्याने कसे निभवायचे, म्हणून एखादा उत्साही लेखक ते शोधू लागले. त्यावेळी 'व्यायाम' मासिकांतील ना. ह. आपटे हे लेखक अगदी त्यांच्या थेट विचारांत बसणारे वाटले. म्हणून त्यांना पत्र टाकल्यावर १९२१ पासून सहसंपादक म्हणून ते काम करू लागले.

१९२० सालापासून वाचकांच्या मनाची पकड घेणारे इतर विषय देखील

किर्लोस्कर मधून येऊ लागले. त्यामध्ये साहस, एकाग्रता, सामर्थ्य, आत्मविश्वास अशा गुणांबद्दल येणारे विवेचन अतिशय प्रभावी असे, पाचव्या अंकापासून खबरला मोठ्या टाईपात छापलेले चित्रमय मुखपृष्ठ लाभले आणि उद्योग, उत्साह, आत्मोन्नती असा शिरोलेख पुढे प्रत्येक अंकावर येऊ लागला. जानेवारी २१ पासून ''मी यशस्वी कसा झालो?'' यासंबंधी स्वतःचे अनुभव लिहून पाठविण्यासाठी वाचकांना आवाहन करण्यात आले.

त्यामध्ये स्वतःच्या चुका समजून त्या टाळता कशा येतील याचे मार्गदर्शन व्हावे असा या उपक्रमाचा हेतू होता. परदेशात गेलेल्या मित्रांकडून शंकरभाऊंनी हेन्री फोर्ड, वेस्टिंग हाऊस, कोडॅक, इस्टमन अशा खडतर परिस्थितीतून यशस्वी झालेल्या परिश्रमी आत्मविश्वासू लोकांचे परिचय लिहून घेतले. 'एक होता कार्व्हर' या पुस्तकाने अलीकडे उजेडात आलेल्या कार्व्हर आणि बुकर टी वॉशिंग्टन यांचे परिचय १९२२ मध्ये खबरने वाचकांना करून दिले. डॉ. आनंदीबाई जोशी, पारिचारिका सीताबाई खोत यांचे परिचय १९२३ मध्ये लिहिले गेले.१९२० मध्ये अंकाची पाने आठऐवजी बारा करण्यात आली. वार्षिक वर्गणी मात्र एक रुपयाच राहिली. 'किर्लोस्कर खबर' हे कारखान्याच्या प्रगतीची माहिती देणारे आणि समाजातील स्वदेशी उद्योगाविषयी प्रेम व आस्था वाढविणारे पत्र तर होतेच; पण त्याशिवाय त्यातील माहिती कंटाळवाणी होऊ नये म्हणून ईतर मासिकांत जे येत नाही असे नवे काही साहित्य देण्याची धडपड असे. प्रत्येक अंकात कला व कलावंत, आद्य नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर, गायक बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, बालगंधर्व, शिल्पकार कोल्हटकर गोरेगांवकर चित्रकार असे परिचय येत होते. कवितांच्या संदर्भात 'बहु असोत सुंदर संपन्न की महा प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा!' हे महाराष्ट्रगीत फार चांगले उतरले होते. ते सुरावर म्हणण्याची सोय व्हावी म्हणून श्री. गेसरे यांनी दिलेल्या नोटेशनसह ते दिवाळी अंकात प्रसिद्ध झाले. लोकमान्य टिळकांच्या निधनवार्तेबरोबर किर्लोस्कर कारखान्यास आलेल्या टिळकांच्या हस्तक्षरातील पत्रांचा ठसा देऊन 'हिंदी उद्योगधंद्याचा कैवारी गेला' असा शोकलेखही लिहिला होता. सायंकाळी गणपतराव विजापुरे, फोटोग्राफर देसाई आणि शंकरभाऊ असे मिळून फिरायला गेले म्हणजे नवे लेख-सदरे कोणती द्यायची त्याची चर्चा होत असे. जुलै १९२२ मध्ये अंकाची पाने १२ ची १६ झाली आणि वर्गणी सव्वा रुपया झाली. या वर्षात ११ चरित्रे, पाच गोष्टी, अठ्ठावीस कविता आणि ४५ निबंध असा ३४० पानांचा मजकुर मासिकाने दिला, असा आढावाही घेण्यात आला. त्यावर एक वाचक कळवितात की, 'तुमच्या मासिकात उपयोगाच्या मानाने तुमची वर्गणी फार थोडी

आहे. ती पाच रुपये असण्यास हरकत नाही.' वाचकांच्या प्रतिसादावरून दर २-४ महिन्यानी मासिकाची पाने वाढवायला लागली. या मासिकात काल्पनिक गोष्टी न देण्याचे धोरण ठेवूनही वाचक त्याकडे आकर्षित झाले, याचे कारण शंकरभाऊंनी पुढीलप्रमाणे नमूद केले आहे.

''आमच्या राष्ट्राला घेरलेल्या कुंभकर्णी झोपेतून त्याला जागे करावयाचे काम किती प्रचंड! त्याला खबरसारख्या चिमुकल्या मासिकाचे अल्प प्रयत्न कितीसे पुरे पडणार? तथापि खबरमुळे समाजामध्ये एक नवचैतन्य हळुहळू निर्माण होत आहे. त्याचा प्रभाव शेकडो वाचकांच्या आयुष्यक्रमात दिसू लागला आहे.''

खबरच्या लोकप्रियतेमुळे यशवंत, काव्यशेखर, दि. धों कर्वे, श्री. गोसावी ही मंडळी आपण होऊन लेख/कथा, कविता मासिकाकडे पाठवू लागली. मासिकाला मिळालेला सरकारी नोंदणी क्रमांक १४७५ अंकावर छापला जाऊ लागला. १९२१ च्या दिवाळी अंकावर कोल्हापूरमध्ये करून घेतलेले दोन रंगी चित्र प्रथमच प्रसिद्ध झाले. त्या अंकात के. सी. ठाकरे यांचा 'पावनखिंडीचा संदेश' हा लेख, जपानमधील दिवाळी असे माहितीपर लेख आणि 'अपशकुनांचा सावळागोंधळ' असे लोकभ्रम दूर करणारे लेखही वाचकांना आवडले.

हा काळ गुरुवर्य अण्णासाहेब कर्वे यांच्या अनाथ महिलाश्रमाच्या विकासाचा होता. त्यासंस्थेविषयी समाजात माहिती देणे, निधी जमविणे या कामात गुंतलेल्या पार्वतीबाई आठवले, वेणूताई नामजोशी, सीताबाई अण्णेगिरी अशा कार्यकर्त्यांविषयी खबरमध्ये माहिती देण्यात आली.

१९२० मध्ये खबर सुरू झाली तेव्हा शंकरभाऊंच्या संपादकीय कार्याशी असलेला नवखेपणा त्यांना वरचेवर बिचकवी; पण सदिच्छेने आणि निश्चयाने केलेले कार्य यशस्वी झालेच पाहिजे असे त्यांना वाटत असे. एकेक पाऊल पुढे टाकल्यावर खबर अधिक लोकांच्या पसंतीस पडू लागली आणि ३०० अंकांनी सुरू केलेल्या खबरचे १९२४ मध्ये ७ हजार वर्णगीदार झाले. तीन माणसांनी सुरू केलेल्या किर्लोस्कर प्रेसमध्ये ३५ माणसे काम करू लागली.

संपादक शंकरभाऊ सांगतात, ''खबरच्या लोकप्रियतेचे कारण मराठीत निघणाऱ्या इतर मासिकांहून आमचा उद्देश भिन्न होता. केवळ मनोरंजन करणाऱ्या गोष्टी न देता उद्योग, उत्साह, आत्मोन्नती हे आमचे ब्रीदवाक्य पटून आणि खबरच्या ठसकेबाज भाषेची चमक वाचकांस पसंत पडून भराभर आश्रय मिळत गेला आणि चांगल्या लेखक व कवींच्या सहकार्याने तो लवकरच दृढ झाला.''

१९२४ च्या काळातील मराठी वाचकांच्या जगाची थोडी कल्पना आली तरच या विधानाचे महत्त्व कळण्याजोगे आहे. वतनदारी शेतीच्या सरंजामी संस्कृतीमध्ये

पिढ्यान्‌पिढ्या वाढलेल्या समाजामध्ये वतनदारीचे उत्पन्न अपुरे पडत हळुहळू संपुष्टात येऊ लागले होते. ''धरचे खाऊन सुखी'' ही कल्पना फोल ठरली होती. इंग्रजांनी आणलेल्या शिक्षणाचा परिचय नुकताच कोठे झाला होता. तोही शहरातल्या चाकरमाने होऊ पाहणाऱ्या थोड्यांना. इतरांच्या मनावर दैववादाची सुस्ती पसरलेली होती. ब्राह्मणांत पुरुषही जेमतेस सात बुके झालेले. स्त्रियांना शिकविण्याची सुधारकांनी थोडी सुरुवात केली तेवढीच. पुराण-कीर्तन हीच लोकशिक्षण व रंजनाची साधने होती. नियती, दैववाद, अंधश्रद्धा, चमत्कार याच कल्पनांचा प्रभाव जनमानसावर पडत असे. त्यामधून अल्पसंतुष्टतेचे मिळणारे विचार कोंडी करणारे, कालबाह्य वाटत होते. प्रत्येकाने स्वत:ची प्रगती स्वत: प्रयत्न करून केली पाहिजे, हे दरमहा सतत विविधप्रकारे सांगणाऱ्या 'किर्लोस्कर खबरने' 'ठोठावा म्हणजे उघडेल' अशी प्रयत्नवादाची नवी वाट दाखविण्याचे जे काम चालविले होते त्यामुळे धीर येऊन ही लोकप्रियता मासिकाला मिळाली हे नि:संशय!

हा काळ गुरुवर्य अण्णासाहेब कर्वे यांच्या अनाथमहिलाश्रमाच्या विकासाचा होता. गरजू विधवा, मुली यांच्या शिक्षणाची संस्थेत सोय करण्यासाठी महिला कार्यकर्त्या प्रयत्न करीत होत्या.

गावोगाव जाऊन, संस्थेची माहिती समाजास सांगून या कार्यकर्त्या निधी जमवित होत्या. त्यानंतर काही दिवसांनी कर्वे यांच्या संस्थेला मिळणारी बरीच मोठी देणगी देणगीदाराने काही गैरसमजुतीने थांबविली. त्यामुळे संस्था अडचणीत आली होती. त्यासाठी अण्णासाहेब कर्वे व बाया किर्लोस्करवाडीस आले. ती हकीगत ऐकल्यावर किर्लोस्करवाडीमधून नागरिकांनी काही मदत जमवलीच; पण त्याबरोबरच अण्णासाहेब कर्वे यांची समाजसेवा किती अमोलिक आहे व त्यांच्यावर ओढवलेला प्रसंग किती बिकट आहे याची किर्लोस्कर खबरने वाचकांना कल्पना दिली. त्याबरोबरच या अवघड प्रसंगी संस्थेला शक्य ते सहाय्य करण्याची एका खास सचित्र लेखाद्वारे वाचकांना विनंती केली. अंक प्रसिद्ध होताच चेक व मनीऑर्डर यांच्या रुपाने मासिकाकडे देणग्यांची एकच गर्दी उडाली. त्यांची पोच मासिकात दिली जाई व या रकमा हिंगण्याला संस्थेकडे पाठविल्या जात.

किर्लोस्कर ब्रदर्स ही कंपनी लिमिटेड झाल्यावर तिच्या डायरेक्टर बोर्डामध्ये औंधचे राजेसाहेब, कोल्हापूरचे भास्करराव जाधव, साताऱ्याचे रावबहाद्दूर काळे व वडिलधारे कुटुंबीय असे नियोजित झाले. त्यांनी मॅनेजिंग एजन्सीमधील तरुण मंडळीपैकी माधवराव व शंतनुराव किर्लोस्कर यांना इंजिनियरिंगच्या शिक्षणासाठी अमेरिकेत पाठवावे आणि शंभोराव जांभेकर आणि विष्णुपंत किर्लोस्कर यांना जर्मनीमध्ये पाठवावे असे ठरविले.

# लंडन कॉलेज ऑफ कॉमर्स

लंडनच्या कॉलेज ऑफ कॉमर्स येथे शिकण्यासाठी शंकरभाऊंना इंग्लंडला जाण्यासही कंपनीने संमती दिली.

शंकरभाऊंच्या मनात विक्रयशास्त्र आणि व्यावसायिक संघटना यांचे शास्त्रोक्त शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला जाण्याचा विचार घोळत होता. त्यांनी सहा-सात वर्षात ऑफिसच्या व्यवस्थेपासून वाडीतल्या सामाजिक जीवनात खेळापासून संरक्षण व्यवस्थेपर्यंत बरीच कामे केली होती. धंद्याचे आधुनिक शास्त्र व तंत्र यांची पुस्तके त्यांनी वाचली होती; पण गुरुमुखातून मिळालेल्या ज्ञानाची सर पुस्तकी ज्ञानाला नसते, म्हणून 'किर्लोस्कर खबर' चा ५० वा अंक प्रकाशित करून शंकरभाऊ व्यावसायिक व्यवस्थापन आणि विक्रीकला यांच्या शास्त्रोक्त शिक्षणासाठी इंग्लंडला गेले.

२० मार्च १९२४ ला मुंबई बंदरात उभ्या राहिलेल्या सिटी ऑफ जिनोआ या बोटीवर शंकरभाऊ भारावलेल्या मनाने चढले. निरोप देण्यास बरीच मंडळी आली होती. भोंगा झाला. धक्क्यापासून बोट दूर होऊ लागली. पार्वतीबाईच्या कडेवर ६ महिन्याची मालती होती आणि तीन वर्षाच्या मुकुंदाने आईचे बोट धरले होते. त्यांच्याकडे पाहताना शंकरभाऊंच्या डोळ्यात पाणी भरले. त्यामुळे क्षणभर त्यांना काही दिसेनासे झाले.

मुंबईचा किनारा सोडल्यावर समुद्रातील प्रवासात डेकवर बसले की वरती आकाश व खाली पाणी दिसे. वारा नसला तर समुद्र शांत काचेसारखा वाटे आणि डोंगराएवढ्या लाटा येऊ लागल्या की समुद्र भयानक अवतार धारण करी.

प्रवासाच्या २५ दिवसांत पाश्चात्य पद्धतीचे जेवण व शिष्टाचार अंगवळणी पडले, त्यामुळे इंग्लंडला पोचल्यावर आपली सोय लागेल असा विश्वास शंकरभाऊंना आला.

प्लिमथ बंदरावरून लंडनला पोचेपर्यंत तेथील गोऱ्या पोलिसांनी ते प्रथमच येत आहेत हे ओळखून-इंडियन होस्टेलमध्ये पोचेपर्यंत त्यांची तत्परतेने व्यवस्था केली. लंडनचे पोलीस कर्तव्यदक्ष म्हणून त्यांची जगभर ख्याती आहे. ती खरीच याचा

प्रत्यय आला. दुसऱ्या दिवशी 'लंडन कॉलेज ऑफ कॉमर्स' मध्ये जाऊन शंकरभाऊ प्रिन्सिपॉल अॅट्वुड यांना भेटले तेव्हा त्यांनी शंकरभाऊंच्या हिंदुस्थानातील कामाची माहिती विचारली. ती समजल्यावर ते म्हणाले, ''तुम्ही अनुभवाने व स्वतःच्या प्रयत्नाने विक्रयशास्त्राचे तंत्र बरेचसे जाणता आहात. तेव्हा इथल्या तुमच्या वेळेचा व पैशाचा रास्त उपयोग होण्यासाठी तुम्हाला अधिक शास्त्रोक्त ज्ञान आवश्यक आहे, अशा प्रकारचा कोर्स आखून देतो.''

संघटनाशास्त्र व व्यवस्था, विक्रयशास्त्र व कला यात मानसशास्त्राचा भाग असतोच. अशा विषयांचे रीतसर शिक्षण सुरू झाले. आठवड्यातून एक दिवस प्रात्यक्षिके करून शंकानिरसन होत असे. प्रसिद्धी हा धंद्याचा प्राण, तुमच्या मालाचे नाव बहुजन समाजाला माहीत झाले पाहिजे. त्यासाठी जाहिराती करण्याची अनेक साधने कशी याचे शेकडो नमुने, कल्पना आणि वस्तू यांचा विचार होऊ लागला. ''संस्थेचे व्यवस्थापन'' म्हणजे नेमलेल्या अनेक माणसांना संस्थेचे धोरण व कार्यपद्धती शिकविणे, प्रत्येकास त्याची जबाबदारी व अधिकार यांच्या वापराची स्पष्ट कल्पना देऊन मदतनिसांचे कर्तव्य व स्थान त्यांना समजावले पाहिजे. तिरसटपणा, अरेरावी, भेकड किंवा क्षुद्र स्वभाव हे व्यवस्थापनात वर्ज्य आहेत. हाताखालच्या माणसांकडून योग्य प्रमाणात योग्य प्रतीचे काम करवून घेता येणे फारसे अवघड नाही. त्या सहकारी माणसांबद्दल सहानुभूती, गुणग्राहकता व उत्तेजन याने जे काम होते ते हुकूम सोडण्याने होत नाही. प्रत्येकाच्या मनात एक मोठी शक्ती असते. तिचा उपयोग योग्य दिशेने केला, तरच यश, सुख व समाधान मिळते हे लक्षात ठेवले पाहिजे! असे विचार पुनः पुन्हा पटवले जात.

लंडनच्या मुक्कामात वेंब्ले येथे ब्रिटिश साम्राज्यातील सर्व देशांच्या मालांचे अजस्त्र प्रदर्शन भरले होते. शेतकी विभागात आपला किर्लोस्कर नांगर पाहून शंकरभाऊंना फार आश्चर्य वाटले.

लंडनच्या सभोवतालची प्रेक्षणीय स्थळे पाहताना त्यांना खूपच मराठी मंडळी भेटत होती, त्यामुळे ओळखी वाढत होत्या. तसेच जेथे जागतिक जाहिरातदारांची परिषद होती. त्यामध्ये शंकरभाऊ सामील झाले. निरनिराळ्या राष्ट्रांत द्वेष व बेबनाव वाढण्यास वृत्तपत्रे कारणीभूत असतात. त्यांच्या निषेधाच्या ठरावावर शंकरभाऊंनी प्रभावी भाषण केले. त्यांना ब्रिटिश पार्लमेंटकडून जेवणाचे बोलावणे आले. भोजनानंतर तीन वक्त्यांची भाषणासाठी निवड झाली, त्यात शंकरभाऊंचे नाव आले. त्यावेळी ते म्हणाले, ''जाहिरात देणे म्हणजे चांगल्या गुणांचे वर्णन करणे. तिचा उपयोग फक्त व्यापाराची वाढ करणे एवढाच नाही. मित्राला मदत करायची तर आपण त्याची तारीफ करतो. त्याला उत्तेजन मिळून तो सद्गुण वाढवीत जातो.

जसे व्यक्तीला तसेच समाजाला व देशालासुद्धा आवश्यक आहे. याच्या उलट माझ्याच देशाबद्दल जगात वाईट जाहिरात होते असे मला दिलगिरीने सांगावेसे वाटते, म्हणून आपण सर्व जमलेली मित्रमंडळी इतरांची अप्रतिष्ठा होईल अशा कंड्या पिकविण्याची काम करायचे नाही असा निर्धार करू या. याच्यामुळे देशांत शांती व स्वास्थ वाढून जगाचे कल्याण होईल.'' असे म्हणून त्यांनी आपले भाषण संपविले.

शंकरभाऊंचा अभ्यासक्रम पूर्ण होऊन डिप्लोमा तर मिळालाच; पण इंग्लंडमधील सेल्स मॅनेजर्स असोसिएशनचे सभासदत्व शंकरभाऊंना विधिपूर्वक देऊन प्रिं. ॲटवूड यांनी त्यांचा गौरव केला. यानंतर इंग्लंड व जर्मनीची धावती सफर करून त्यांनी इटलीतील चित्रकलेच्या प्रदर्शनाला गाठले. मगच ते हिंदुस्थानाला जाणाऱ्या बोटीत चढले. मुंबईस काही मंडळी बंदरावर आली होती. पुढे सकाळच्या गाडीने ते ५ मे १९२५ ला किर्लोस्करवाडीस दाखल झाले. त्यांच्यासाठी एक-दोन मजली नवे घर बांधले होते.

ऑफिसात गेल्यावर स्वत:च्या कामाचा विचार पुढे आला. त्यामध्ये साताऱ्याच्या कोर्टात 'किर्लोस्कर ब्रदर्स विरुद्ध कूपर कारखाना' असा एक महत्त्वाच खटला चालू आहे हे शंकरभाऊंना समजले. किर्लोस्कर कारखान्यासाठी सुमारे ४५ हजार रुपये किंमतीचे लोखंड मुंबईहून मागवले होते, ते वाटेतच पाडळीच्या स्टेशनवर कूपरनी उतरवून घेतले होते. ते त्यांनी वापरूनही टाकले होते. किर्लोस्कर कारखान्याच्या संचालकापैकी श्री. गुर्जर वकीलच असल्याने कारखान्याच्या बाजूचा ११९ साक्षीदारांचा कडेकोट पुरावा होता, पण साक्षीची लांबड टाळून शंकरभाऊंनी न्यायाधिशांना योग्य मुद्दे दाखवून धनजीशा कूपर यांचेकडून आपल्या कारखान्याची नुकसान भरपाई मिळवली.

म्हणून कारखान्याच्या व्यवस्थापनेत नव्या कल्पना आणून सुधारणा करणे आवश्यक होते. एव्हाना कारखान्याचे बाल्य संपले होते. पूर्णपणे एकतंत्री कारभार, निर्भेळ मालकशाही, मालकांनी सांगितले की सर्वसाधारण ऐकायचे अशीच कामगारांची निमूटपणे पद्धत होती. हे मालक त्यांच्या कामगारांची परोपरीने काळजी घेत म्हणून त्यांच्या मुलाप्रमाणेच कामगार लक्ष्मणरावाना पप्पा व राधाबाईना मम्मा म्हणत, ते योग्यच होते. पण आता कामगारांची संख्या सात-आठशेवर गेली होती. साऱ्या कामाची पद्धतशीर खातेवाटणी करून खातेप्रमुखाचे अधिकार, कामगारांचे वेतनमान, त्यांना मिळणाऱ्या सवलती यांचे काही नियम होणे आवश्यक होते. शंकरभाऊंनी त्यासाठी काही तक्ते तयार करून काकांच्या पुढे ठेवले. तर ते म्हणाले, 'तुझा विचार चुकीचा नाही; पण आपले कामगार धाक असला तरच

कामाकडे लक्ष देतील. लाड कराल तर कारखाना चालणार नाही. आपली चाललेली व्यवस्था उत्तम आहे. त्यात बदल नको.''

किर्लोस्कर व कूपर कारखान्यांचा सर्वांत जास्त खपणारा माल म्हणजे नांगर. नांगराच्या विक्रीवर कारखान्याची सारी मदार असे. दोन्ही कारखान्यांचा माल तंतोतंत सारखा. किर्लोस्कर कारखान्यातील माणसे नेऊन तोच माल तयार करून कूपरसाहेबांनी किर्लोस्करांबरोबर स्पर्धा सुरू केली ही गोष्ट काकांना झोंबली होती. म्हणून त्यांनी किर्लोस्कर नांगराच्या किमती उतरवून कूपर कारखान्याला शह दिला.

यावर कूपरही जिद्दीला पेटले. त्यांनी किर्लोस्कर कारखान्यापेक्षा किंमती कमी केल्या. ही चढाओढ थांबली नाही, तर दोन्ही कारखाने डबघाईला येणार असे दुश्चिन्ह दिसू लागले. लंडनमध्ये शंकरभाऊंनी एकाच प्रकारचा माल करणारे अनेक कारखाने असले, तरी व्यवसायबंधू या नात्याने ते एकमेकांशी सहकार्याने वागतात हे पाहिले होतेच. प्रत्यक्ष कूपर स्वतः किर्लोस्करवाडीस आले. दोघांनी तयार केलेल्या मालाच्या रास्त किंमती, कमिशनचे दर ठरवून एकाच भावाने आपला माल विकावा हे कूपर व काका दोघांनाही मान्य झाले. जाताना कूपर थांबून म्हणाले, ''लक्ष्मणराव तुम्ही शंकरसारखी माणसं सांभाळली आहेत हा तुमचा खरोखर फार मोठा गुण आहे. त्यांची नीट काळजी घ्या. शंकरभाऊंची पहिली सूचना विचार फेटाळली गेली तरी त्यांच्या दुसऱ्या कल्पनेला काकांनी विरोध केला नाही. नंतर सिंहावलोकन केल्यावर असे दिसले की, एकाच नव्हे तर दोन्हीही कारखान्यांचे त्या कल्पनेने हित साधले.

☆

# विक्रीची कौशल्ये

विक्री व्यवस्थापक श्री. गुर्जर फिरतीवर गेले की ऑफिसचे सर्व काम शंकरभाऊंनाच करावे लागे; पण समाजाचे प्रेम व कलेची दृष्टी या दोन गोष्टी कुठल्याही कामाला लावल्या की यश मिळायचेच हे ठरलेले. त्या सुमारास परदेशी मालावर बहिष्काराची लाट बाहेरच्या जगात उठली होती. एके दिवशी कपडे चढवून शंकरभाऊ बाहेर पडणार तोच दोन कामगार भेटण्यासाठी हॉलमध्ये उभे राहिलेले त्यांना दिसले. ते म्हणाले, ''आम्हाला तुमची हॅट पाहिजे!'' ''कशाला?'' त्यांनी चकित होऊन विचारलं. त्यांनी उद्दामपणे उत्तर दिले, ''विलायती कपड्यांच्या होळीत टाकायला! तुमच्यासाठी आम्ही एक गांधी टोपी आणली आहे.''

शंकरभाऊंचे मन म्हणाले गांधीटोपी हे नुसते डोक्याचे आच्छादन नव्हते. ते एका संप्रदायाचे चिन्ह होते. शंकरभाऊ कुठल्याही संप्रदायापासून अलिप्त राहणारे स्वतंत्रमार्गी. ''ठीक आहे. उद्या परेडच्या वेळेला घालतो.'' असे सांगितल्यावर ते बरे म्हणाले. दुसऱ्या दिवशी ड्रील संपल्यावर शंकरभाऊ म्हणाले, ''अजून थोडे काम आपल्याला उरकायचे आहे. आपल्या देशभक्तीबद्दल मी सर्वांचे अभिनंदन करून शाबासकी देणार आहे. आपण सारे देशभक्त मागे १९१७ साली लोकमान्य टिळकांनी आदेश दिल्यावर, जीवाची तमा न बाळगता देशाच्या संरक्षणासाठी सैन्यात गेलो हे तुम्हाला माहित आहेच. महात्मा गांधीसारखे थोर नेते आपल्याला लाभले आहेत. त्यांच्या सत्य, अहिंसा, खादी या मार्गाने आपण चाललो आहोत; पण देशभक्ती ही कपड्यात नसते. ती अंत:करणात असते. 'अस्पृश्यता पाळता कामा नये.'' हा महात्माजींचा उपदेश आपण लक्षात घेत नाही. तुमच्यासारखी मी गांधी टोपी घालणार तर माझ्याप्रमाणे तुम्हीही अस्पृश्यता सोडली पाहिजे.'' एवढे बोलून त्यांनी दिलेली टोपी एका हाताने डोक्यावर घालून जवळ उभ्या असलेल्या गुंडामहाराच्या हातातील पाण्याचा पेला सर्वांसमक्ष पिऊन टाकला.

विलयतेहून परत आल्यावर कारखान्याच्या मालाचा प्रसार व विक्री यांच्या निमित्ताने शंकरभाऊंचा शेतकरी ग्राहकांशी नेहमी संबंध येई. त्यांच्याशी अत्यंत

सौजन्याने, आदराने व कळकळीने वागायचे अशी त्यांची पद्धत होती. त्यांचे इतके अगत्य पाहून शेतकरी जरा भांबावून जात. कारण शिक्षित पांढरपेशा माणसांशी त्यांचा संबंध यायचा तो मामलेदार, फौजदार, स्टेशनमास्तर अशा व्यक्तींशी. ही माणसे त्यांच्यावर सारखी अरेरावी करीत. शंकरभाऊ त्यांना 'अहो-जाहो' म्हणून आदबीने त्यांच्याशी बोलू लागले किंवा त्यांना बसायला खुर्ची देऊ लागले तरी तिच्यावर न बसता जमिनीवर ते आसन ठोकीत. तथापी त्यांचा संकोच दूर होऊन एकदा त्यांच्याशी स्नेह जमला, म्हणजे त्यांनी माल खरेदी करावा यासाठी वेगळे श्रम करावे लागत नसत.

भारतामधला शेतकरीवर्ग फार मागासलेला, जुनी चाकोरी सोडून जाण्याचे त्याला धैर्य नाही आणि त्यातून आर्थिक स्थिती खालावलेली. तेव्हा नवनवे प्रयोग करण्यास त्यांना धीर व्हावा तरी कसा? सुधारलेल्या औतांचे फायदे त्याला नुसत्या शब्दांनी पटवून देणे फार अवघड. त्याला जेव्हा दिसेल की त्याचा कोणी शेजारी वा नातलग एखादे नवे साधन वापरीत आहे, तेव्हाच ते घेण्याचा तो विचार करणार. थोडक्यात सांगायचे, तर शेतकऱ्यांचा बहुतेक व्यवहार विश्वासाच्या आधारावर चालल्याचे दिसते.

या संबंधात आलेला एक अनुभव येथे सांगण्यासारखा आहे. उसाचा रस गाळण्यासाठी कारखान्याने तीन लाटीचा एक नवा चरक बनवला. 'कमाल चरक' असे त्याचे नाव ठेवले. शेतकरी वापरत असलेल्या परांपरागत चरकापेक्षा त्याची कार्यक्षमता खूपच अधिक होती; पण गिऱ्हाईकांना हे पटवून देणे ही वेगळीच समस्या होती. एके दिवशी औंधाच्या रस्त्यावरील एक म्हातारा शेतकरी ऑफिसात चरक घ्यायला आला. सुधारलेल्या कमाल चरकाचे फायदे शंकरभाऊ त्याला तऱ्हातऱ्हांनी समजावून सांगत होते; पण ते त्याला पटत नव्हते. शेवटी त्याच्या इच्छेप्रमाणे जुन्या पद्धतीचा नं. ५ चा चरक त्याने घेतला व पैसे दैऊन बैलगाडीत चरक घालून तो निघून गेला. तेव्हा इतकावेळ डोळ्याच्या कोपऱ्यातून पाहात शंकरभाऊंचा सेल्सटॉक ऐकणारे काका म्हणाले, ''काय शंकरभाऊ! तुझं सगळं प्रवचन वाया गेलं!'' पण शंकरभाऊ खट्टू न होता म्हणाले, ''या जगात चांगल्या हेतूने बोललेला शब्द कधी फुकट जात नाही. त्याचा लगेच नाही, तरी सावकाशीने परिणाम झाल्याशिवाय राहत नाही.'' त्या संवादांत इतरही मंडळी थोडावेळ सामील झाली. अशात अर्धा तास लोटला नसेल, इतक्यात तो म्हातारा गाडी घेऊन पुन्हा दारात आला, ते पाहून सर्वांचे कुतूहल जागृत झाले. तो पुढे येऊन शंकरभाऊंना म्हणाला, ''रस्त्याला लागलो खर पण पुना म्हटलं तुम्ही इतक सांगताय तर नव्या चरकाची परिचिती घेऊन पहावी. म्हणून बदलून न्यायला आलोय.'' शंकरभाऊंना

साहजिकच अवसान आले आणि त्याचा चरक बदलून देऊन नव्या चरकाची पावती तर करविलीच; पण दुसऱ्या दिवस त्याच्या गावी कारखान्याचा फिटर पाठवून, चरक जोडून, कामास सुरुवात करून देण्याची व्यवस्था केली. नव्या कमाल चरकाचं काम पाह्यला तेथे जमलेल्या अनेक शेतकऱ्यांनी अधिक रस काढणाऱ्या चरकाची कार्यक्षमता पाहिली. त्यांनाही मग नवे चरक घेण्याची इच्छा झाल्यास नवल कसले? या कामामुळे त्या मंडळींचा शंकरभाऊंवर जो विश्वास बसला त्याचा परिणाम फारच बोध देणारा आहे. काही दिवसांनी म्हातारा मृत्यू पावला, मरताना त्याने मुलाना सांगितले होते, ''शंकरभाऊंची साक्ष घेऊन शेताची वाटणी करा.''

१९२५ च्या मे महिन्यात शंकरभाऊ इंग्लंडहून परत आले. आपल्या परदेशातील वास्तव्यात त्यांच्या शोधक दृष्टीने तेथील विविध प्रकारची नियतकालिके त्यांनी समक्ष पारखली होती. त्यामधून संपादनामागील ध्येयदृष्टी आणि व्यावसायिक समतोल याबद्दलचे त्यांचे विचार संस्कारित झाले होते. ब्रिटिश पत्रसृष्टीचे शिल्पकार लॉर्ड नॉर्थक्लिफ यांच्या धोरणाप्रमाणे राष्ट्राच्या उन्नतीला पोषक असे सामाजिक, शास्त्रीय, औद्योगिक विषय पण सोप्या भाषेत सामान्य माणसापर्यंत पोचविण्याच्या अनेक कल्पना त्यांच्या मनात उड्या मारीत होत्या. तथापि ती दोन वर्षे जागतिक मंदी आणि अवर्षण यामुळे थोडी सबुरीची दृष्टी त्याना ठेवावी लागली होती.

☆




अशाने कुठे भरतीची पिछेहाट होईल काय? (जानेवारी १९३२)

# पुरोगामी विचाराकडे

युरोपातील औद्योगिक जगाच्या प्रत्यक्ष दर्शनाने सत्ता व संपत्ती ही दैवायत्त असण्याचे कारण नाही, तर माणसाच्या कर्तृत्वाने ती मिळविता येते, त्यासाठी व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला मात्र संधी मिळाली पाहिजे हे पायाभूत तत्त्व त्यांच्या मनात पक्के रुजले होते. युरोप-इंग्लंडमधील समाजजीवनातील मोकळेपण, बौद्धिक चर्चेची पातळी, स्त्री-पुरुष संवादिता या गोष्टी म्हणजे नवविचारजागृती (रेनेसान्स्) बुद्धिप्रामाण्य, जातीनिर्मूलन, शिक्षण प्रसार आणि कार्यक्षमता विकास या स्वरुपाचे सुधारकांचे विचार आचारात उमटले पाहिजेत हे त्यांना जाणवलं.

''अमर्याद संतति'' हा डॉ. र. धों. कर्वे यांचा लेख ऑगस्ट २५ च्या खबरमध्ये प्रसिद्ध झाला. देशाची लोकसंख्या वाढते पण जमीन वाढत नाही. संपत्तीच्या मानाने फाजील संतती होते. त्यांचे हाल ''लेकुरे उदंड जाहली, तोते लक्ष्मी निघोनी गेली'' अशा रामदासांच्या वाणीने सांगितले. आपत्तीचे मूळ जे दारिद्र्य ते दूर करण्याचा हाच मुख्य उपाय आहे. महात्मा गांधींच्या फक्त संततीसाठीच समागम करावा व एरवी ब्रह्मचर्य पाळावे हे मत अनैसर्गिक आहे अशी टीकाही कर्वे यांनी केली होती. या लेखातील विचाराबद्दल-मुंबईतल्या बड्या धेंडांनी मासिकाविरुद्ध उठाव केला. जणू मधमाशांचे पोळेच उठले. ''पुरुषार्थ'' मासिकातून सातवळेकर यांनी सडकून टीका केली. त्यामुळे औंधाच्या राजेसाहेबांचे मत कलुषित होऊन शंकरभाऊंना जाब विचारण्यात आला. त्यावेळी ''या लेखापासून समाजाचे अहित होण्याचा संभव नसून, अशा माहितीचा प्रसार होणे हे एक आवश्यक समाजकार्य आहे, असे माझे मत आहे.'' असे उत्तर शंकरभाऊंनी दिले.

जुलै २६ पासून खबरमध्ये ''स्त्रियांचे पान'' हे सदर सौ. गंगाबाई जांभेकर लिहू लागल्या. त्यामध्ये विवाह जुळविण्याची पद्धत बदलणे, स्वदेशीचा प्रसार, स्त्रियांची आत्मरक्षणाची तयारी असे विषय येऊ लागले.

मे १९२७ मध्ये 'शिवजयंतीउत्सव' अंकात शिवरायांचे कार्य याविषयी बाळासाहेब पंत प्रतिनिधी, रियासतकार सरदेसाई, पंडित सातवळेकर यांचे लेख

होते. त्यासाठी शिवाजीच्या जीवनावरील चित्रपटातील छायाचित्रे घालून अंक अतिशय आकर्षक बनवला होता. यावर्षी अंकाचा आकार वाढविण्यात आला व तो मासिकांच्या जगात प्रमाणित झाला. 'किर्लोस्कर' आकाराची पाने असे प्रमाण नियतकालिकांच्या माध्यमात कायम झाले.

आकारबदलाबरोबर मांडणीमध्ये विविधता व चित्तवेधकता आली. धाडसी सर्कसवाले पाटील यांचा परिचय, मजूरवर्गाच्या साक्षरतेचा प्रश्न हा लेख, ना. ह. आपटे यांची 'ऐरणीवरील हिरा' ही कादंबरी व 'गृहसौख्य' ही लेखमाला. किर्लोस्कर खबरमधून येणाऱ्या व्यक्तींच्या परिचयाने व लेखामुळे निरनिराळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्यांना नवे अवसान कसे चढले आणि त्यांनी स्वतःचा उत्कर्ष कसा करून घेतला, याबद्दल अनेकांची पत्रे येत. ती वाचून शंकरभाऊंना फार समाधान व आनंद होत असे. आशावादी विचारांचा पाठपुरावा करणारी 'आत्मप्रभाव' ही लेखमालाही सुरू झाली. मासिकाच्या वाढत्या व्यापात असतानाही कारखान्याच्या कामाकडे शंकरभाऊंचे दुर्लक्ष कधी झाले नाही. उद्योगधंद्याच्या प्रचारासाठी चित्रपट तयार करण्याची कल्पना तोपर्यंत कोणाला नव्हती; पण आपल्या कारखान्यात तयार होणाऱ्या औतांचे काम कसे चालते याचे चलत्‌चित्र (फिल्म) तयार करता यावे म्हणून काकांना विचारून ३५ एमएमचा जर्मन कॅमेरा त्यांनी मागवला. त्याच्या साह्याने शंकरभाऊंनी तयार केलेली फिल्म चांगली निघाली. तिच्या डेव्हलपींग प्रिंटींगची सोय कोल्हापूरात छान झाली. अशा रीतीने १९२५ मध्ये किर्लोस्कर कारखान्याचा पहिलाच चित्रपट महाराष्ट्रात तयार झाला.

या चित्रपटाचा किती मोलाचा उपयोग होतो याचा पुरावा लवकरच मिळाला. पुण्याच्या आर्यन थिएटरात चित्रपट दाखविण्यात आला. पुणेकरांनी उत्साहाने त्याचे स्वागत केले. पुढे २६ डिसेंबरला बेंगलोर येथे मोठे औद्योगिक प्रदर्शन भरले, त्यावेळीही शंकरभाऊंनी त्या चित्रपटाचा उपयोग केला. म्हैसूर संस्थानचे दिवाण सर मिर्झा इस्माईल यांनी किर्लोस्कर कंपनीच्या स्टॉलला भेट दिली तेव्हा ते आणि त्यांच्या बरोबरची अधिकारी मंडळी यांना तो चित्रपट पाहण्याची विनंती केली. चित्रपट बिनबोलका होता, म्हणून तो सुरू करण्यापूर्वी शंकरभाऊंनी प्रेक्षकांपुढे थोडे निवेदन केले. म्हैसूर संस्थानशी आपला कसबाचा संबंध व भ्रद्रावतीच्या बिडाचा नांगर-चरकासाठी होणारा उपयोग याचा उल्लेख करण्यास शंकरभाऊ विसरले नाहीत. दुसऱ्या दिवशी दिवाण साहेबांनी निरोप पाठवून शंकरभाऊंना बंगल्यावर बोलावून घेतले व असे कारखाने आमच्या संस्थानातही असावेत अशी इच्छा प्रदर्शित केली. पुढच्या काळात बेंगलोरात किर्लोस्करांचा इलेक्ट्रिकल मोटर्सचा व हरिहर येथे मशिनटूल्सचा असे कारखाने म्हैसूर संस्थानातच निघाले.

मुलांच्या भावी उत्कर्षासाठी शंकरभाऊंनी हायस्कूलच्या शिक्षणासाठी मालतीस हिंगण्याला व मुकुंदास सोलापूरला पाठवले.

शंकरभाऊंना विरंगुळ्याचा एक विषय होता, तो म्हणजे क्रिकेट. उन्हाळा संपला व पावसाळ्याची सुरुवात झाली म्हणजे वाडीतले क्रिकेटचे सामान बाहेर निघायचे आणि प्रॅक्टिसला उत्साहाने आरंभ व्हायचा. टीममध्ये शंकरभाऊंसारखे पाच-सहा जुने खेळाडू होते. शिवाय यंत्रकला शिकायला आलेले टिळक महाविद्यालयाचे पदवीधर खरे, हरोळीकर, गोगटे आणि वाडीतच लहानाचे मोठे झालेले सदु व संभु चाबुकस्वार, पांडू मोहिते यांसारखे खेळाडूही सामन्यात आपली चमक दाखविल्याशिवाय राहिले नाहीत.

कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजची टीम फार नामांकित होती. तथापी वाडीच्या टीमशी खेळताना कोठे तरी माशी शिंकायची आणि कोल्हापूरला हार खायची पाळी यायची. १९२७ सालच्या सप्टेंबरमध्ये प्रो. ना. सी. फडके राजाराम कॉलेजच्या टीमचे कप्तान म्हणून वाडीला आले व त्यांची आणि शंकरभाऊंची भेट क्रिकेटच्या मैदानावर झाली.

किर्लोस्करवाडीच्या दोन दिवसांच्या वास्तव्यात त्या दोघांची बरीच दोस्ती झाली. कोल्हापूरच्या मंडळींना कारखाना दाखवला, त्याचबरोबर किर्लोस्कर खबरचे ऑफिसही श्री. फडक्यांना दाखविण्यास शंकरभाऊ विसरले नाहीत. 'तुमचे लेखनाचे सहकार्य मिळाले तर फार आनंद वाटेल.' अशी सूचनाही त्यांनी केली. पुढे दोघांची दोस्ती वाढतच गेली. ना. सी. फडके यांनी 'मानसमंदिर' या लेखमालेत माणसाचे प्रकट आणि अप्रकट मन यांचे सुलभ विवेचन करून विचार, विकार व संकल्प यांच्या शक्ती व त्यावर माणसाचा ताबा कसा राहील याची मानसशास्त्रीय चर्चा केली. 'बाबा वाक्य प्रमाणंनुसार' पूर्वापार चालत आली म्हणून कोणतीही गोष्ट आम्ही मानणार नाही. विसावे शतक हे नव्या शास्त्रीय ज्ञानाच्या प्रकाशात जुन्या संगतीची तपासणी करण्याचे आहे. त्यासाठी फडक्यांनी तरुण पिढीने कोणत्या श्रद्धांमधून आपली शांती, समाधान व विसावा मिळवावा यासंबंधी जगविख्यात झालेल्या विल ड्युरांटच्या पुस्तकाचा रसाळ परिचय 'आधुनिक गीता' या नावाने केला. पुढच्या काळात लेख, कथा, कादंबरी अशा विविध प्रकारांमधून किर्लोस्कर, मनोहर मासिकामध्ये त्यांनी अनेक वर्षे लिखाण केले.

किर्लोस्कर खबरला थोर लेखक, विचारवंत आणि सामान्य वाचकांनीही दिलेल्या प्रोत्साहनामुळे आपण योग्य दिशेने चालतो आहोत असा आत्मविश्वास येऊन किर्लोस्कर खबरची वाटचाल अधिक जोमाने होऊ लागली. या कामात आधुनिक विचारांचे आणि प्राज्ञ पाठशाळेत अध्ययन केलेले पुरोगामी लेखक

महादेवशास्त्री दिवेकर यांची कामगिरी फार मोलाची झाली. 'हिंदू समाजाची उन्नती का होत नाही?' याचे कारण आपल्यात भिनलेला फाजील दैववाद; विटाळ चांडाळाच्या कल्पना असे टीकास्त्र सोडून, शास्त्रीबुवांनी आपल्या जहाल विचारांचा सुरुंग लावून वाचकांच्या मनाला हादरवून सोडले. देव पावसाप्रमाणे सहाय्य करतो; पण नांगरणी-पेरणीचे प्रयत्न माणसांनीच केले पाहिजेत. दैव म्हणून जगात काही नाही, उद्योग करणे न करणे यामुळेच माणूस आपले दैव ओढवून घेतो, असे म्हणून अपशकुन, फलज्योतिष असल्या कल्पनांची त्यांनी भंबेरी उडवली. कर्त्या व्यक्तींचे अवतार बनविण्याची हिंदू समाजाची मानसिक गुलामगिरी त्यांनी भेदकपणे उघडकीस आणली. शिवाजी, टिळक यांना अवतार समजून, त्यांचे पुतळे उभे केले म्हणजे आरती आणि भजन करण्यापलीकडे आपण स्वत: देशाद्धाराचे काही कार्य करावयास नको अशा समजुतीवर त्यांनी परखड टीका केली. त्यामुळे पुढच्या अंकात शास्त्री बुवांचा सणसणीत लेख कोणत्या विषयावर येणार याची वाचक वाट पाहू लागले.

वाचकांचे आत्मसामर्थ्य वाढवावे यादृष्टीने शंकरभाऊंनी 'उत्कर्ष मंडळाची' कल्पना काढली. खबरच्या वर्गणीदारापैकी ज्यांना आज आपण आहोत त्या जागेपासून आणखी प्रगती करून घ्यायची आहे व जे यश मिळवू इच्छितात अशा मंडळींनी 'उद्धरेत आत्मनात्मानं' हे ब्रीदवाक्य ठेवून १) स्वत: प्रयत्न करणे २) मन आनंदी, उत्साही ठेवणे (उद्धरावा स्वयें आत्मा) ३) मनात सामर्थ्यवान विचार करणे ४) प्रामाणिकपणा व नीती न सोडणे ५) एकमेकांस सहाय्य करणे ६) वेळेचा सदुपयोग करणे ७) उद्योग करताना स्वत:बरोबर समाजाची सेवा घडण्याकडे लक्ष ठेवणे अशा वर्तनाची प्रतिज्ञा घेऊन तसे वर्तन करायचे असे 'उत्कर्ष मंडळाचे' नियम होते.

अशा उत्कर्षप्रेरित व्यक्तींच्यासाठी विशेष श्रेय मिळविणारास चांदीचा 'उत्कर्ष पेला' देण्याची योजनाही जाहीर करण्यात आली. खबरचा वाचकवर्ग प्रयत्नवादी, उद्यमशील असल्याने आपण कसकसा प्रयत्न करून स्वत:चा उत्कर्ष केला, याबद्दलची हकीगत लिहून पाठवावी असे वाचकांना आवाहन करण्यात आले. त्यात ४९ जणांचे लेख आले, त्यामध्ये नाशिकचे किसनलाल चक्रपाणी यांना 'उत्कर्ष पेला' देण्यात आला. याखेरीज दहा मंडळींचे विशेष अभिनंदन करण्यात आले. अशा उपक्रमातून वाचकांशी साक्षात व्यक्तिगत संपर्क होत असल्यामुळे, बंधुत्वाच्या स्नेहभावनेची परिणती खबर व त्याचे वाचक यांचा एक परिवार बनण्यात झाली.

मे मध्ये खबरचा १०० वा महोत्सव-अंक प्रसिद्ध झाला. त्यामध्ये या परिवाराचा

व्याप व परस्पर लोभ यांची चांगलीच कल्पना आली. त्रिचनापल्ली, हैद्राबाद, म्हैसूर, मद्रास अशा दूरदूरच्या वाचकांपासून इंग्लंड, युरोप, आफ्रिका, ब्रह्मदेश अशा परदेशांतील वाचकांचेही फोटो या विशेषांकात छापले होते. 'मनोरंजन' च्या संपादिका मालती मित्र म्हणतात, ''खबरने उत्साहरहित तरुणात नवी उमेद, नवे धैर्य निर्माण केले व उत्साहाची वाट दाखवली. स्मरणपूर्वक 'स्त्रियांचे पान' राखून ठेवले याबद्दल कौतुक वाटते.'' पंडित सातवळेकर, देवदत्त टिळक, वा. म. जोशी. न. चि. केळकर, धों. के. कर्वे, रा. ब. धुरंधर, बाबूराव पेंटर, ना. सी. फडके या सर्वांनी खबरने मराठी माणसांना धैर्य व उत्साहाची वाट दाखविली या मुद्याचा पुन: पुन्हा उल्लेख केला होता.

१९२८ मध्ये खबरची पाने २४ होऊन वर्गणी सव्वा रुपयावरून २ रुपये झाली. १९२१ पासून सहसंपादक म्हणून काम करणारे ना. ह. आपटे स्वत:च्या 'मधुकर' मासिकाकडे अधिक लक्ष देण्यासाठी जुलै २८ मध्ये निवृत्त झाले. आपट्यांचा विचार लक्षात आल्यावर संपादनात कोणाचे सहाय्य होईल यासाठी बोलताना विजापुरे यांनी इचलकरंजीचे ना. धों. ताम्हनकर यांचे नाव सुचवले. त्यांनी नाटके लिहिली होती. गणपतरावांमुळे ताम्हनकरांना खबरची माहिती होतीच. 'किर्लोस्कर' मध्ये त्यांच्या कविता व शंकरभाऊंच्या सांगण्यावरून कर्तबगार पुरुषांचे परिचय-लेखही त्यांनी लिहिले होते. तेव्हा शंकरभाऊ व गणपतराव यांच्या निमंत्रणाप्रमाणे ताम्हनकर किर्लोस्करला येऊन मिळाले. उद्योग, उत्साह, आत्मोन्नती या खबरच्या ब्रीदाला शोभतील अशा कल्पना इंग्रजी व अमेरिकन मासिकांत सापडत. त्यांना मराठी पेहराव चढविण्याचे बरेचसे काम प्रथम ताम्हनकरांनी केले. पुढे मुलाखती, परिचय इ. मासिकाच्या गरजेप्रमाणे अनेक प्रकारचे लेखन केले. त्या सुमारास १९२५ ते ३० या काळातल्या मंदीचा परिणाम सर्वत्र पसरत होता. नोकऱ्या कमी होऊ लागल्या, म्हणून विक्रीच्या व दुकानदारीच्या क्षेत्राकडे तरुणांचे लक्ष वेधणे आवश्यक होते. तरुणांनी स्वत:चा आत्मप्रभाव वाढवून, यशस्वी उद्योजकतेचा मार्ग व्यापाराचे योग्य व्याकरण वापरून, आणि विक्रीची हमखास सूत्रे राबवून कसा चोखाळावा याबाबतीत शंकरभाऊंनी जे मार्गदर्शन केले आहे, ते आजच्या पिढीलाही लागू पडेल असेच आहे.

स्वत:चा आत्मप्रभाव वाढवून होणारा व्यक्तिविकास ही यशस्वी उद्योजकतेकडे नेणारी पहिली पायरी होय. या विषयी शंकर भाऊ म्हणतात, ''नुसते पुस्तकी ज्ञान अगर हुषारी घेऊन काय करायची? मनुष्याच्या अंगात पाणी असेल तरच त्याची मातब्बरी'' असे कुणीतरी बोललेले तुम्ही ऐकले असेलच. हे अंगातले पाणी किंवा त्याची प्रभावशक्ती ही काय चीज आहे, हे आत्मसामर्थ्य उत्कट इच्छा

आणि त्या दिशेने खटपट करणाऱ्यास साध्य होण्यासारखे आहे. आपला आयुष्यक्रम अधिक यशस्वी, सुखसंपन्न व परोपकारी करण्यास या अभ्यासाचा उपयोग होईल.'' अशी प्रस्तावना करुन आत्मप्रभाव कसा वाढविता येईल यासंबंधी शंकरभाऊ लिहीतात 'मनुष्याच्या मनात वाईट वासना, मत्सर, द्वेष भय असे ऋणविचार आणि धैर्य, उत्साह, प्रेम असे धनविचार असतात. त्यांना योग्यप्रकारे वळण देऊन आपला प्रभाव वाढविता येतो. या कामात भीति हा माणसाचा सर्वात दुष्ट शत्रू आहे. आपण डरलो की आपली बाजू घसरलीच. म्हणून निर्भय वृत्ती वाढविण्याची गरज ते सांगतात, कोणतीही गोष्ट करताना चारी बाजूची माहिती गोळा करणे, इतरांचा अनुभव ऐकणे हे महत्त्वाचे असले तरी कोणते काम करावयाचे याचा निर्णय व ते करण्याचा दृढनिश्चय ही यक्षिणीची कांडीच आहे. भोवतीच्या अनेक यशस्वी माणसांची नक्कल करण्यापेक्षा आपले स्वत:चे विशिष्ठपण प्रगट करण्याचा प्रयत्न असला पाहिजे. आपल्या मनाची, शरीराची व इतर साधनांची सर्व शक्ति त्या कामी लावावी.

कोणतेही काम करावयाचे ते केव्हा व कसे करायचे याचा पूर्ण विचार आणि पद्धतशीरपणा व शिस्त पाहिजे. आळस व चालढकल न करता प्रत्येक गोष्ट प्रमाणशीर वेळेतच पूर्ण करण्याची दक्षता पाहिजे. काम करणाऱ्याला अडचणी व निराशा यांना तोंड द्यावे लागते. परंतु रागाच्या भरात कार्यनाश न करता, विवेकाने व धीराने प्रत्येक गोष्टीचा विचार केला पाहिजे. निंदेने खचून जाणे किंवा स्तुतीने फुगून जाणे दोन्हीही चुकीचेच.

कामासाठी अनेक माणसांशी आपला संबंध येतो. प्रत्येकाबरोबर काय बोलावे व कसे बोलावे याबद्दल काळजी घेतली पाहिजे. मनुष्याच्या वाट्याला जे क्लेश व त्रास येतात. त्यांचा उगम शोधण्यास निघालोच तर बहुधा तो त्याच्या जीभेतच सापडेल. भाषण चातुर्य हा गुण सर्व काळी व सर्वस्थळी उपयोगात येतो व त्यामुळे माणसांची भरभराट विशेष झपाट्याने होऊ शकते. मात्र श्रोत्याबद्दल सहानभूती व कळकळ असावी लागते.

उत्तम आरोग्य, स्वच्छ व व्यवस्थित पोशाख, व्यसनापासून दूर राहणे, सभ्यतेची वागणूक या गोष्टी साध्या असल्यातरी आत्मप्रभावाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

जगात पैसा ही मोठी शक्ति आहे आणि पौरुष दाखवून श्रीमंत होण्यास प्रत्येकास मुभा आहे. आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी सांपत्तिक पाठबळ आवश्यक असते. पण पैसा हे साध्य नाही, साधन आहे. तो मिळविताना त्याच्या विनियोगाकडेही लक्ष पुरविले पाहिजे. गरिबीशी टक्कर देऊन एकेक पाऊल पुढे

जाण्याचा काळ माणसाला जसे समाधान देतो ते पैशाच्या ढिगावर बसून मिळत नाही. पोकळ मोठेपणा, मित्रांची भीड, व्यसने ही पैशाच्या धुरातूनच वाढतात. त्यापासून सांभाळावे. आपण जेथे आहोत तेथूनच उन्नतीला पोचणाऱ्या पायऱ्या सुरू होतात. आपला प्रभाव वाढवित तुम्ही त्या सहज चढून जाल.

स्वत:चा धंदा यशस्वी करण्यासाठी अनेक चढउतारातून आणि खाचखळग्यातून वाटचाल करावी लागते. यशस्वी उद्योगासंबंधी शंकरभाऊंनी मांडलेले हे विचार म्हणजे जणू या अवघड वाटेवर भेटलेला वाटाड्याच. ते म्हणतात-

''कोणताही व्यापार, उद्योग अगर व्यवसाय करणाऱ्या मनुष्याला उच्च प्रकारचे यश मिळावे अशी महत्त्वाकांक्षा असणे अगदी स्वाभाविक आहे; परंतु धंदा यशस्वी करणे हे सुद्धा एक शास्त्र आहे व त्याच्या नियमांच्या पायावरच यशाची इमारत उभी राहू शकते.''

याप्रमाणे विषय प्रवेश करून, यश मिळविण्यास लागणारे धोका पत्करण्याचे साहस, कष्ट करण्याचे सामर्थ्य, हाती घेऊ ते तडीस नेऊ हा आत्मविश्वास आणि कामावर लक्ष स्थिर करण्याची एकाग्रता या चार गुणांचे महत्त्व ते सांगतात.

''यश म्हणजे स्पृहणीय परंतु दु:साध्य अशी एखादी गोष्ट आपल्या गुणांच्या जोरावर साध्य करणे. त्यासाठी आपले ज्ञान, अवलोकन व कर्तृत्वशक्ती यामध्ये प्रत्येक दिवशी काही ना काही भर टाकण्याची गरज सांगितली आहे. आपल्या कामात मनोवृत्ती बावरण्याचे अनेक प्रसंग येतात. त्यावेळी धीर न सोडता खंबीरपणे मनाचा तोल जाऊ न देण्याची खबरदारी घेतली पाहिजे. यश मिळवायचे असेल तर आपले निश्चित उद्दीष्ट एकच असले पाहिजे. काम आपण करू शकू असा विश्वास मनात असला की त्या कामास जरूर असा बुद्धीचा, शक्तीचा प्रवाह आपल्यामध्ये सुरू होतो. तुमच्या कामावर तुमचे प्रेम असले म्हणजे चैनीचा वा इतर आवडत्या गोष्टींचा त्याग सहज करता येतो. कालच्या पेक्षा आज अधिक चांगले काम करीत गेल्यास, अधिक जबाबदारीची कामे अंगावर घेऊन ती पार पाडण्याची पात्रता येत जाते. वाढत्या धंद्याबरोबर स्वत:ची पात्रताही वाढविण्याची जागरुकता ठेवली पाहिजे. कामाच्या नव्या पद्धती व सुधारणा अवलंबिल्या पाहिजेत. आपले काम म्हणजे आपल्यावरील बोजा नसून, ती आपल्याला मिळालेली एक उत्कृष्ट संधी आहे, आपल्या उपजिविकेचे साधन, कर्तृत्व शक्तिचा विकास करण्याचे साहित्य व मित्र मिळविण्याचा मार्ग आहे असे समजले पाहिजे.

आपण धंद्याचे मालक असल्यावर चिकाटीने व हुषारीने यश मिळविणे, सातत्याने ते टिकविणे व नवनव्या अडचणी दूर करून व्यवसाय वाढवित नेणे

अशा जबाबदाऱ्या येतात. त्यामध्ये उत्तम व्यवस्थापनासाठी दुसऱ्याचे मत ऐकून घेणे, सहकाऱ्यांच्या गुणांना दाद देऊन माणसे तयार करणे इत्यादी गोष्टी येतात. कुठल्याही अडचणींनी गोंधळून न जाता त्या अडचणींवर मात करणे, ही एक महत्त्वाची गोष्ट आहे.

व्यापारधंद्यातील यश म्हणजे पैसा मिळविणे, स्वत:ची चैन व बडेजाव वाढविणे नव्हे, तर समाजाची सेवा करण्याचे ते एक साधन आहे हे समजणे. ही सेवा तुम्ही जितक्या उत्कृष्टतेने व तत्परतेने पार पाडाल तितक्या मानाने तुमचे सौख्य व यश वाढत जाईल.

जी गोष्ट उद्योगाची तीच व्यापार उदीमाची कुठलाही उद्योग, मग ती कारखानदारी असो वा व्यापार, तो यशस्वी होण्यासाठी शास्त्रशुद्ध अभ्यासाचा पाया मजबूत असणे अतिशय आवश्यक आहे. शंकरभाऊंच्या मते-

''केवळ वरकरणी माहितीने चालविलेल्या उद्योगात वारंवार ठेचा लागण्याचा फार संभव असतो. नवीन भाषा शिकताना आपण तिच्या व्याकरणाचा अभ्यास करतो. तीच गोष्ट व्यापाराची. मनुष्याची सुखसंपत्ती वाढविण्यासाठी व देशाची स्थिती सुधारण्यासाठी आपला व्यापार वाढविणे हा एक तरुणोपाय आहे. पण सशास्त्र ज्ञानाच्या अभावी केलेल्या व्यापाराची स्थिती सुकाणू नसलेल्या जहाजासारखी होते. यासाठी या व्यापार शास्त्राच्या सिद्धांताची माहिती करून घेतली पाहिजे.

व्यापाराला दोन किंवा अधिक व्यक्ति लागतात. वस्तु निर्माण करणाऱ्यांची जशी एक बाजू असते, तशीच ती वस्तु खरेदी करणाराची व वापरणाराचीही बाजू असते. म्हणून व्यापाऱ्याने गिऱ्हाईकांच्या दृष्टीकोनातून पाहण्यास शिकण्याचा सराव केला पाहिजे. 'गिऱ्हाईकाचे म्हणणे नेहमी बरोबर असते.' असे मार्शल फिल्ड या अमेरिकेतील मोठ्या व्यापाऱ्याचे वाक्य प्रसिद्ध आहे. ग्राहकाची गरज व सोय याचा विचार करणारा व्यापारी व कारखानदार नेहमी यशस्वी होतो.

कोणताही कारखाना यशस्वीरितीने चालण्यास भांडवल देणारा माल तयार करणारा आणि विक्री करणारा या तिघांची गरज असते. ही तीनही माणसे भिन्न प्रकृतीची व गुणांची असतात. भांडवलवाल्याचा आत येणारा व बाहेर जाणारा पैसा यामधून होणारा फायदा यावर सारखी नजर पाहिजे. माल तयार करणाऱ्याने कामगारांना सांभाळून शक्य तितक्या कमी श्रमात व कमी खर्चात उत्तम माल तयार करावा. विक्री करणाऱ्याने लोकांचा लोभ संपादन करून, आपला माल घ्यावा अशी दुसऱ्याच्या मनात इच्छा उत्पन्न होईल यासाठी दुकानांची मांडणी व जाहिरात चित्ताकर्षक व परिणामकारक केली पाहिजे. प्रत्येक कामासाठी योग्य गुणांच्या

तिघांनी एकमेकांच्या गुणाबद्दल आदर ठेवून एकत्रित धंदा करायला हवा.

व्यापारात किंमतीचा प्रश्न सर्वात महत्त्वाचा असतो. एकूण खर्चाची बेरीज अधिक नफा मिळून किंमत होते. तेव्हा एकूण एक खर्चाची नोंद करणे व त्यावर रास्त नफा आकारणे आवश्यक असते. हा फायदा व्यापाराची जीवनधारा असतो.

मालाच्या टंचाईमुळे महागाई होते व भरपूर पुरवठ्यामुळे स्वस्ताई येते. यासाठी मालाची मागणी वाढती ठेवण्याचे काम विक्रय कलेचे आहे. स्वत:च्या पैशापेक्षा मालाची जरूरी ज्याला विशेष असते तोच ग्राहक असतो. त्याला आपल्या मालाची खात्री पटविणे आणि त्याच्या मनात नव्या गरजा निर्माण करणे, त्याचे मन वळविणे यासाठी विक्रेता हरतऱ्हेने प्रयत्न करत असतो. कोणतेही काम तुम्ही जितक्या जलद रितीने कराल तेवढा खर्च कमी होतो. म्हणून वेळ हा पैसा आहे हे व्यापाऱ्याने जाणून तो मुळीच वाया घालविता कामा नये.

व्यापार म्हणजे नुसती धावपळ नव्हे. मालाच्या व माणसांच्या हालचालीने खर्च वाढतो ही दृष्टी हवी. यंत्रांची मांडणी, विक्रेत्यांचा अनाठायी प्रवास या सर्व बाबतीत दक्ष राहिले पाहिजे. श्री. शंकररावांच्या मते कुठल्याही व्यापार, उद्योगाच्या बरकतीसाठी त्या उद्योगाचा विक्रीकलेचा कणा मजबूत असणे अतिशय गरजेचे आहे. व्यापार, उद्योगाचे अर्थकारण हे सर्वस्वी त्या उद्योगाच्या समर्थ विक्रीकरणावर अवलंबून आहे असे ते समजत असत. ते म्हणत-

''आपल्या देशातील उद्योगधंदे उर्जितावस्थेस येण्यास विक्रीच्या कलेचा आपण उत्तरोत्तर अधिक अभ्यास केलाच पाहिजे. विक्रीची तत्त्वे लहान मोठ्य सर्वच व्यवहारात पदोपदी उपयोगी पडणारी असल्याने, समाजात याविषयी जितके ज्ञान वाढेल तितके समाजाच्या प्रगतीचे पाऊल अधिक झपाट्याने पुढे पडत जाईल यात शंका नको.

सध्या तर असे दिवस आलेत की सर्वांना चढाओढीने सतावून सोडले आहे. ग्राहकाला आपल्याकडे ओढून घेण्यासाठी सर्वत्र झगडा चालू आहे. आमचे नवीन निघणारे बरेच धंदे अल्पायुषी का होतात? अथवा जीव धरून राहिले तरी त्यांची जोमाने वाढ का होत नाही? याचे एक मोठे कारण, विक्री कशी करावी याबाबतीत आपले ज्ञान फार कच्चे व अपुरे असते, असेच आढळून येईल. स्वदेशी उद्योग करताना केवळ विलायतच्या तोंडीचा माल काढूनच आपला निभाव लागणार नाही, तर त्यांच्याप्रमाणेच रोज नव्या युक्त्या व नवे प्रकार लढवून गिऱ्हाईके काबीज करण्याच्या उपायांची आपल्या मालाला जोड दिली पाहिजे. ग्राहकांशी समक्ष देवघेव करण्याचा प्रसंग असो, वर्तमानपत्रात जाहिरात देण्याचे, कॅटलॉग तयार करण्याचे अथवा पत्रव्यवहाराने धंदा करण्याचे, कोणतेही काम असो ते ग्राहक

दृष्टीसमोर ठेवून केल्यानेच तुमचा अधिक फायदा होईल. 'आम्ही' हे सर्वनाम विशेष न वापरता 'तुम्ही' या सर्वनामाचा शक्य तितका अधिक उपयोग करण्यास शिकले पाहिजे. तुमचा माल वापरल्यापासून गिऱ्हाईकांची किती सोय अथवा फायदा होणार असेल, ते ठळक रितीने त्यांच्यापुढे मांडा.

आपला माल कोणत्या वर्गाला उपयोगी पडणारा आहे हे लक्षात घेऊन त्या



ग्राहकांच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्याचे वैशिष्ट्य आपल्या मालात आहे हे पटवून द्या. गिऱ्हाईक राखील त्यालाच धंद्यात तेजी येते. तुमच्या मालाविषयी विश्वास पटलेली माणसे तुमची कायम गिऱ्हाईके होतात. अशा ग्राहकांचा अभिप्राय नेहमी विचारात घ्यावा.

विक्री करणाऱ्या माणसाला उत्साह हवा. आपल्या कामाविषयी आदर व आवड पाहिजे. आपला व्यवसाय नेकीचा आणि माल उत्कृष्ट अशी अगोदर स्वत:ची पूर्ण खात्री असली पाहिजे.

माल खपविण्यासाठी किंमत उतरविणे हा उपाय अनर्थकारक आहे. कारण त्यामुळे मालाच्या दर्जाबद्दल गिऱ्हाईक साशंक होते. गिऱ्हाईक भेटल्यापासून १)मालाविषयी परिचय २) आकर्षण ३) तल्लीनता व ४) समाधान या चार पायऱ्यानंतरचच विक्रीचा व्यवहार कसा होतो हे कळते.

व्यापारात पुढे येण्यास जाहिरात हे सर्वोत्तम साधन आहे. मालाचा उठाव जलद करण्यास, ग्राहकांची संख्या वाढविण्यास वर्तमानपत्रात, भिंतीवर लावण्याच्या जाहिराती अशा अनेक प्रकारांनी प्रसिद्धी करता येते. काळाप्रमाणे प्रसिद्धीची साधने वाढत जातात. त्यांचा उपयोग अवश्य केला पाहिजे. जाहिरातीची भाषा, त्यातील चित्रे, मुद्रण यांचा विचार करणे एक शास्त्रच आहे. जाहिरातीबरोबरच कॅटलॉग, प्रसारपत्रिका, कॅलेंडर्स अशा नाना तऱ्हेच्या साधनांचा उपयोग केल्याने मालाचा प्रसार वाढतो.

ग्राहकांची मागणी पुरी करण्यास विस्मरण आणि नजरचुकीमुळे कोणत्याही क्षुल्लक चुकांमुळे नुकसान होते यांची यादी करून या गोष्टी टाळल्या पाहिजेत. चोख काम करणारे हस्तक तयार करणे व्यापारात आवश्यक आहे आणि त्यांच्या श्रमांचे चीज करणे हेही महत्त्वाचे आहे.

समाजाच्या उपयोगी पडण्यासाठी आपण श्रम करतो. त्याद्वारे आपली उपजिविका होत असली तरी आपल्या जीविताचे सार्थक करण्याची संधि मिळत असल्याने व्यापार ही समाजाची सेवाच होय.

शंकरभाऊ म्हणत 'राष्ट्रामध्ये अलौकिक स्वार्थत्यागाचे काही पुढारी असल्याने देश पुढे येऊ शकणार नाही. सर्वसाधारण समाजामध्ये सामान्य मनुष्यालासुद्धा आपली जबाबदारी व कर्तव्य ओळखता येईल. इतकी त्याची तयारी करून सरासरीच्या न्यायानेच देशाची प्रगती होईल; तरच खरी आणि टिकून राहणारी उन्नती होईल.

'विक्रीची बारा सूत्रे' ही लेखमाला शंकरभाऊंनी २९-३० सालात लिहिली. यशस्वी दुकानदारांच्या मुलाखती छापल्या. गिऱ्हाईकाचे मन वळविण्याचे कौशल्य फार सोप्या व समर्पक शब्दात सांगितले. व्यक्तिवादाच्या उद्याची नांदी म्हणून

'तरुण स्त्री पुरुष व त्यांच्यापुढील प्रश्न' ही प्रा. ना. सी. फडके यांची लेखमाला म्हणून विशेष गाजली. सर्वगामी अभिरुची, शालीनता, अशा गुणाबद्दल लिहून स्वतःचे मत बनविण्यासाठी तरुण स्त्री-पुरुषांनी 'आपल्या समाजाचा उद्धार व राष्ट्राचा अभ्युद्दय कशाने होईल? अशा प्रश्नावर आपसांत विचार केला पाहिजे' असे सांगितले.

त्याकाळात तरुणांना साहसासाठी स्फूर्ती देणारे एखादे उदाहरण शंकरभाऊ शोधत होते. एक दिवस त्यांचे काम चालू असताना त्यांना भेटायला दोन तरुण आले. त्यांच्या नावाच्या कार्डावरून नाथ गोडबोले व शाम चित्रे अशी त्यांची नावे समजली. त्यांच्या नावाच्या कार्डावर जगप्रवासी असा शब्द पाहून शंकरभाऊंनी अधिक चौकशी केली. त्यावरून त्या दोघांनी हिंदुस्थान ते इंग्लंड हा प्रवास सायकलवरून केला होता हे समजले.

त्यांचा पासपोर्ट शंकरभाऊंनी पाहावयास मागितला त्यावरून खात्री झाली. ही कर्तबगारी फार दांडगी होती. शंकरभाऊंनी त्यांना आपल्या अपूर्व प्रवासाचे वर्णन लिहिण्याची विनंती केली. त्यांची 'चाकावरून जगाची चक्कर' ही लेखमाला किर्लोस्कर मासिकातून दोन वर्षे येऊ लागताच त्यावर वाचकांच्या उड्या पडू लागल्या. नाथ गोडबोले यांना ठिकठिकाणाहून आमंत्रणे येऊ लागली. जातील तेथे तेथे ते आपल्या व्यक्तिमत्वाने सर्वांना भारून टाकीत. या प्रवासपर लेखमालेचा किती प्रभाव पडला हेही शंकरभाऊंना पाह्यला मिळाले. त्यावर्षी तरुणांच्या वीस-पंचवीस टोळ्यांनी सायकलवरून किर्लोस्करवाडीला भेटी दिल्या. काहीजण तर वऱ्हाडमधून आले होते. आपल्या समाजापुढे एखादे उज्वल उदाहरण ठेवल्यास त्याचे अनुकरण किती उत्साहाने होते हे त्यामुळे लक्षात आले.

२९ साली किर्लोस्कर मासिकाचा 'महिला विशेषांक' निघाला. त्यामध्ये शांताबाई नाशिककर, कृष्णाबाई मोटे, सुलोचनाबाई हुदलीकर अशा त्यावेळच्या प्रसिद्ध लेखिकांचे लेख होते. 'माझा संसार मी कसा केला' या विषयावर लेखांची स्पर्धा झाली आणि 'आदर्श संसार पेला' यवतमाळच्या यशोदाबाई बापट यांनी मिळविला.

१९२९ सालापासून सावरकरांच्या सूचनेवरून मासिकाच्या नावातील 'खबर' हा शब्द वगळण्यात आला. कारखान्याची माहिती वाचकांना देण्यासाठी वास्तविक किर्लोस्कर खबरचा जन्म झाला. पण त्यातील विचारांना जागे करणारे लेख, आकर्षक कथा, कविता, विविध व्यक्ती आणि संस्थांचे परिचय यामुळे ते झपाट्याने लोकप्रिय होऊ लागले. त्याच्या नावामधील खबर शब्द गळून पडला तरी 'कारखान्याचे पान' हे चटकदार सदर प्रत्येक अंकात वाचण्यास वाचक उत्सुक

असत. कारण कारखाना पाहण्यास येणाऱ्या मोठ्या पाहुण्यांचे फोटो, कारखान्याची सभा, प्रगतीचा अहवाल, कोणत्या प्रदर्शनात कोणत्या उत्पादनानी बक्षिसे मिळविली याची माहिती त्यामध्ये असे. एकूण किर्लोस्करवाडी या उद्योगनगरीची हकिगत ही मोठी आकर्षक वाटे. तेथे होणारी कीर्तने, सर्कशीचे प्रयोग, आर्यन किंवा प्रभात फिल्म कंपन्यांचे चित्रपट महाराष्ट्र किंवा समर्थ नाटक मंडळीचे नाट्यप्रयोग, यांची रसभरित वर्णने असत. किर्लोस्करवाडीत खेळले जाणारे क्रिकटचे सामने, रामभाऊ भिरंगी किंवा संभू चाबुकस्वारने काढलेली धावसंख्या व सामन्यातील चुरशीची वर्णने ही फार नवलाची गोष्ट होती. आज रेडिओ किंवा टीव्हीवर क्रिकेटचा धावत्या वर्णनाचा आनंद घेणारांना या प्रकारच्या क्रीडापरिचयाचा हा जन्मकाळ समजून आजही नवल वाटेल.

ज्या सामाजिक सुधारणांचा, स्त्री-पुरुष समानतेचा, जाती उच्चाटनाचा पुरस्कार 'किर्लोस्कर' मासिकामधून वैचारिक पातळीवर होई, त्या विचारांचे जणू प्रात्यक्षिकच किर्लोस्करवाडीच्या जीवनामधील घटनातून दिसत असे. गणपतीच्यावेळी महिला मंडळाच्या स्त्रिया ताम्हनकरांनी लिहिलेली नाटके करीत, प्रदर्शने भरवीत हे सारे वाचणाऱ्या १९३० च्या काळातील वाचकांना किर्लोस्करवाडी ही एक स्वप्ननगरीच आहे की काय असे वाटल्यास नवल ते काय?

विचारजागृतीच्या कामात विनोदाचा, विडंबनाचा फार चांगला उपयोग होऊ शकतो, म्हणून सुरुवातीच्या काळात शंकरभाऊ जी व्यंगचित्रे काढीत त्यामध्ये अंगरखा-पगडी घालणारे म्हातारे सनातनी आणि आधुनिक युवक यांच्यातील दोन वेगळ्या कृती दाखवून ते नवमतवादाचे समर्थन करीत असत.

मध्यमवर्गातील माणसे परंपरेच्या चाकोरीप्रमाणे जीवन जगत असतात. त्यातील काही आचार अथवा रूढी मनाला खटकल्या तरी सुधारायच्या कशा हे मात्र त्यांना सुचत नाही. आचार बदलण्याचे धाडस करणारा एखादा माणूस निघाला आणि तो विक्षिप्त वाटला तरीसुद्धा लोकांना आवडतो. त्याच्या वर्तनातून हास्यास्पद विनोदाचे दर्शन होते, अशा गप्पा सायंकाळी फिरायला जाताना ताम्हनकर-विजापुरे आणि शंकरभाऊ यांच्यामध्ये चालत. एक दिवस शंकरभाऊ ताम्हनकरांना म्हणाले, ''असे एका विक्षिप्त विचारी माणसाचे व्यक्तिचित्र तुम्ही लिहाल तर मी त्याच्यासाठी छान चित्र काढीन.'' त्यावर थट्टामस्करी झाली; पण दोघेही आपल्या कामाला लागले. त्याचे नाव 'दाजी' ठरले व ठेंगणा, ठुसका, ग्रंथप्रेमी, मिस्किल, वेधक नजरेचा, आधुनिक सदरा-कोट-धोतर पण टोपी न वापरणारा दाजी १९३२ च्या सप्टेंबरमध्ये मासिकांत प्रथम प्रगट झाला. त्याच्या सरळ पण प्रामाणिक कल्पनांनी वाचकांना पोटभर हसवले. सवाष्णीसाठी ठेवलेले लुगडे मोलकरणीला

देणारा अभ्यंगस्नानाच्या दिवशी पूर्ण स्वच्छतेसाठी एरंडेल व फिनेल आणणारा दाजी, व्याख्यानमालेच्या समारोपाच्यावेळी शुभेच्छा व्यक्त करताना शीघ्रकाव्य रचून म्हणतो-

**'असेच चालो ज्ञानसत्र हे सालेंच्या साले ।**
**अध्यक्षासह श्रोते वक्ते मरून जरी गेले ।।**

अशा या दाजीचा संचार लग्नमंडपापासून साहित्य संमेलनापर्यंत, भूकंपापासून परदेशाच्या प्रवासापर्यंत होऊ लागला. त्याच्या भेटीची वाचक वाट पाहू लागले. शंकरभाऊंच्या वाचनात अमेरिकेतील एक पुस्तक आले. त्यावरून स्त्रियांसाठी सामाजिक जीवनाचा विकास घडवून आणण्यासाठी निरनिराळ्या प्रकारे कसे प्रयत्न केले याचा चित्तवेधक व स्फूर्तिदायक वृत्तांत दिला होता. त्यावरून त्यांना स्पष्ट जाणवले की स्त्रियांचे जग अगदि स्वतंत्र, वेगळे आहे. त्यांच्या प्रश्नांचा उहापोह करणारे, त्यांच्या आवडत्या विषयाविषयी माहिती देणारे आणि त्यांचे मनोरंजन करणारे मासिक महिलांसाठी काढल्यास नक्की यशस्वी होईल. त्याचे नाव 'स्त्री' हेच त्यांना सुटसुटीत वाटले. किर्लोस्करवाडीत लेखक-लेखिकांचे संमेलन ऑगस्ट ३० मध्ये भरविले होते. त्यामध्ये १५ ऑगस्टला 'स्त्रीचा' पहिला अंक प्रसिद्ध झाला.

त्या अंकाच्या संपादकीयात

'स्त्रियांची घटकाभर करमणूक करण्यापेक्षा त्यांच्या विचाराला चालना देऊन, स्वत:ची उन्नती घडवून आणण्याच्या त्यांच्या प्रयत्नाला हातभार लावणे या गोष्टीकडेच 'स्त्री' मासिक लक्ष देईल' हे अभिवचन पहिल्या अंकानेच पुरेपूर सिद्ध केले. स्त्री मासिकाला आनंदीबाई शिर्के, सरलाबाई नाईक, चंद्रकला हाटे, गीता साने, बाळूताई खरे, कृष्णाबाई मोटे, कमलाबाई टिळक अशा सक्षम लेखिकांचे सतत सहाय्य लाभत राहिले. प्रत्येक अंकात स्त्रियांच्या आरोग्यप्रश्नावर डॉ. के. बी. साठे यांनी उपयुक्त माहिती दिली. स्त्रियांच्या कायदेशीर हक्काबद्दल बडोद्याचे राजरत्न वा. वि. जोशी लेख लिहित. स्त्रिया व सहशिक्षण, विवाहपद्धती, सुशिक्षित स्त्रीचा मनोभंग असे विषय येत. स्त्रियांनी लिहिलेली प्रवासवर्णने, कथा, कविता घरगुती व कौटुंबिक व्यवहाराबद्दल सुधारणा यासारख्या विषयांचा समावेश असे.

समाजाच्या उन्नतीमध्ये एक मोठा प्रश्न अस्पृश्यतेचा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या विद्वान आणि अभ्यासू व्यक्तीच्या नेतृत्वाखाली नाशिकच्या काळ्या राममंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहाचा सविस्तर व चित्रदर्शी वृत्तांत 'किर्लोस्कर' मासिकात देवदत्त ना. टिळक यांनी लिहिला. १९३३ मध्ये 'किर्लोस्कर' ने 'अस्पृश्यता उच्चाटण' विशेषांक काढला.

१९३४ पासून आलेले बॅरिस्टर सावरकरांचे लेख ही किर्लोस्करच्या वैचारिक

जागृतीच्या मोहिमेतील पुढची पायरी होती. त्यापूर्वीचे लेख नवमतवादाचा तात्विक पुरस्कार किंवा लहान मोठ्या सुधारणा सुचविणारे होते; पण सावरकरांनी सामान्य माणसाच्या जीवनांतील दैनंदिन आचार-विचारांना, रूढी-परंपरांना, समजुती-संस्कारांना बुद्धिनिष्ठ कसोटी लावून दाखवली व त्यामधील तत्वशून्यता, हानिकारकता आणि अडाणीपणा रोखठोक शब्दात वाचकांपुढे ठेवला. सृष्टिनियम आणि वैज्ञानिक सत्य हेच सनातनधर्म आहेत; त्यातही संशोधनानंतर उद्या बदल करावाच लागेल. मनुष्याचा व्यवहार व आचार हा परिवर्तनीय आहे. कुत्र्या-मांजरांचा स्पर्श चालतो; पण आपणासाठी कष्ट करणाऱ्या अस्पृश्याचा चालत नाही. गाय हा उपयुक्त पशू आहे; पण तिला देवता समजून तिचे शेण-मूत पवित्र म्हणून पिणे ही निर्बुद्धतेची कमाल झाली असे सावरकरांनी सांगितले. नेमकी भाषा, धारदार शब्दरचना, उपहास करणारी टीका, समाजाला जागे करून नव्या विचारांनी चालण्याचे धैर्य देऊ लागली.

☆

# बुवा बाजीवर हल्ला

आपल्या समाजात अंधश्रद्धा व दैववाद अशाप्रकारे सगळीकडे बोकाळल्यावर त्यांचा फायदा घेणारी भोंदूगिरीही सर्वत्र फैलावली. 'किर्लोस्कर' मासिकांनी सामाजिक ढोंगावर टाकलेला आणखी एक बॉम्ब म्हणजे बुवाबाजीवर टाकलेला प्रखर प्रकाश, लोकांच्या भोळेपणाचा फायदा घेऊन धर्माच्या नावाखाली 'मूर्खांचा पैसा म्हणजे लुच्च्यांचा खुराक' या न्यायाने भोंदू-लबाड माणसे कसा फायदा करून घेतात त्याची अनेक उदाहरणे महादेवशास्त्री दिवेकरांनी आपल्या लेखात मांडली. बुवांना आपल्या मुली किंवा बायका अनुग्रहासाठी अर्पण करणारे भक्त म्हणजे मूर्खपणाचा अतिरेक झाला. अंगठ्यातून पाणी काढणारे महाराज गावातून पाणी काढून लोकांना का देत नाहीत, पाणी शिंपडून जो अन्न तयार करतो त्याने उपाशी मरणाराला का वाचवू नये? हे प्रकार म्हणजे दृष्टिभ्रमाचेच चमत्कार असतात. मुले होतील का? पैसे मिळतील का? असे विचारत अडाणी माणसे या बुवांच्या मागे लागतात आणि चमत्काराचे थोतांड माजवून; शिष्याची बुद्धी गहाण ठेवून आपल्या नादी लावतात व स्वत: गलेलठ्ठपणे फुकट ऐतखाऊचे जिणे जगतात-

समाजाची विचारशक्ती आणि कर्तृत्वशक्ती खच्ची करणारा बुवाबाजी हा गुप्तरोगच आहे. बुवांनी नाडलेल्या लोकांना आपल्या तक्रारी नोंदण्यासाठी 'बुवाशाही विध्वंसक संघ' सुरू करून त्याचे वृत्त किर्लोस्करच्या अंकात प्रसिद्ध होऊ लागले.

त्यावेळी उपासनीबुवा, नारायण महाराज अशा धेंडावरच शास्त्रीबुवांनी हल्ले केले. या सर्वांस रंगत चढली ती उपासनींच्या भक्ताने 'किर्लोस्कर' मासिक व दिवेकरशास्त्री यांच्यावर खटले भरल्यामुळे. कोर्टापुढील जबानीत बुवांनी अनेक गोष्टी कबूल केल्या. ''हातात बाळकृष्ण घेऊन त्याच्याशी मुलींची लग्ने लावली, मी धर्मशास्त्र वाचले नाही. मी सांगेन ते धर्मशास्त्र, भक्त माझी पूजा करतात. माझ्या पायाखान्याचीही पूजा करतात. पुरुषांना लुगडे नेसवणे, बांगड्या घालणेही मी करतो. लोक मला मुली अर्पण करतात. अशा पाच मुली माझ्याकडे आहेत. त्यांना मी पिंजऱ्यात ठेवतो'' तर याहूनही जास्त बीभत्स गोष्टी जबानीतून बाहेर आल्या.

हजारो रुपयांची जमवलेली मालमत्ता उजेडात आली आणि बुवांच्या पूर्वचारित्र्यांत मनुष्यवधाबद्दल त्यांना झालेल्या तुरुंगवासाचा प्रश्न निघताच हे अनंतकोटी ब्रह्मांडनायक काकुळतीला आले!

किर्लोस्कर मासिकावरील या खटल्याच्या बातम्या महाराष्ट्रात व इतर वृत्तपत्रातून फोटोसह प्रसिद्ध झाल्यावर बुवाबाजीची फजिती आणखी दूरवर पसरली.

'बुवाबाजी' हा भोळ्या अंधश्रद्ध, लोकांची फसवणूक करून लुबाडणारा एक धंदाच आहे. लोकांची बौद्धिक गुलामगिरी व परमार्थाबद्दल वेडगळ कल्पना यावर चढविलेल्या या हल्ल्याने 'किर्लोस्कर मासिक म्हणजे बुवाबाजीवर हल्ला' असे त्याकाळात समीकरण झाले.

१९३३ अखेर किर्लोस्कर मासिकाने विक्रीचा बारा हजाराचा पल्ला गाठला होता. 'स्त्रीने' दहा हजारांची सीमा ओलांडली होती. मराठी नियतकालिकांच्या इतिहासात हा एक विक्रमच होता; पण प्रतिपक्षाने मासिकावर गदा आणण्याचा घाट घातला. कंपनीचे एक भागधारक ग. स. मराठे यांनी असा मुद्दा काढला की, 'कारखाना हा शेतीची औते करण्यासाठी काढला आहे. छापखाना काढणे, मासिके काढणे हे मूळ हेतूशी विसंगत म्हणून आक्षेप घेण्याजोगे आहे.' त्यावेळी कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन रावबहादूर काळे हे प्रागतिक पक्षाचे नेते होते. भागीदारांच्या सभेत मराठ्यांची हरकत पुढे मांडल्यावर काळे यांनी आपला अभिप्राय पुढील शब्दांत मांडला. ''वास्तविक पाहता साहित्य हा औद्योगिक क्षेत्रापासून दूरचा विषय आहे असे वाटेल, तथापि आजकाल साहित्य, प्रकाशन हे लोकमत अनुकूल करून घेण्याचे व प्रसिद्धीचे बलाढ्य साधन आहे. एवढ्यांसाठीच युरोप अमेरिकेतील कारखानदार आपापल्या मालकीची नियतकालिकेही काढतात. तीच गोष्ट आपल्या मासिकांची आहे. गरीब, श्रीमंत, स्त्रिया, पुरुष, शहरवासी, ग्रामीण महाराष्ट्राचे-महाराष्ट्राबाहेरचे अशा सर्वांकडे ही मासिके जातात. त्यांनी फार मोठी लोकप्रियता मिळविली आहे. त्यामुळे कारखान्याच्या प्रसिद्धीचे काम होऊन, असंख्य व्यक्तींचा किर्लोस्करवाडीबरोबर स्नेह जोडण्याचा कार्यभाग ही मासिके पार पाडीत आहेत. तसेच महाराष्ट्रातील विद्वानाचा, विचारवंतांचा संबंध जुळवून त्यांच्या सहानुभूतीचा लाभ ही मासिके आपल्या कंपनीस मिळवून देत आहेत. इतके करूनही ती आतबट्ट्यात चालली आहेत असेही नाही. सारांश, कोणत्याही दृष्टीने पाहता ही मासिके आपल्या कंपनीस उपयुक्त व फायदेशीर अशीच एक बाब आहे.''

''समाजाचे अंतिम कल्याण हे एकच ध्येय ठेवून मासिके चालवण्याचे आमचे धोरण आहे व त्याचा केव्हाही चुकीचा उपयोग केला जाणार नाही असे मी

आपल्याला आश्वासन देतो.''

रावबहादूर काळे यांचे हे मतप्रदर्शन ऐकल्यावर संचालक सभेने मासिकांना मंजुरी दिली आणि मासिकातल्या लोकांचा हुरूप खूप वाढला. त्या काळात 'रत्नाकर', 'चित्रमयजगत्', 'प्रतिभा,' 'यशवंत' अशी अनेक मासिके निघत. चांगल्या गोष्टी, कविता, साहित्यचर्चा करणारी किंवा बहुविध माहिती देणारी अशी त्यामध्ये विभागणी होती.

'किर्लोस्कर' मासिकांच्या संपादकीय धोरणात करमणूक व माहिती या दोन्हीची सांगड घालूनही आधुनिकता आणि प्रगती यांच्या दिशेने जाण्याची प्रेरणा होती, त्यामुळे सुजाण वाचकवर्ग त्यांच्याकडे वेगाने आकृष्ट होत होता. सुशिक्षित तरुणवर्गास काही सांगावयाचे तर 'किर्लोस्कर' हे आवश्यक माध्यम ठरले होते.

पण समाजात अशी काही माणसे असतात की, त्यांना समाजकारण, तात्त्विक विचार अशा गंभीर गोष्टीचा कंटाळा असतो. काहीतरी हलके-फुलके वाचायला हवे असते, ही गरज लक्षात घेऊन १९३४ च्या मार्च महिन्यात 'मनोहर' मासिक सुरू करण्यात आले. विनोदवृत्तीची जोपासना व करमणूक करणारे साहित्य देण्याचे धोरण 'मनोहरने' ठेवले होते. त्यामध्ये तरुणांना व कुमारांना लेख पाठविण्याचे आवाहन केले होते. त्याच अंकात 'संसार टॉकीज' ही क्रमशः येणारी कथामाला सुरू झाली. गोष्टी लिहिणारामध्ये फडके, खांडेकर, सावरकर, माधवराव बागल, भा. रा. भागवत, द. पां. खांबेटे, म. ना. अदवंत अशी जुनी-नवी दोन्ही पिढ्यांची नावे होती. कॉलेजमधल्या गमती जशा तरुणांना आवडल्या तसेच दा. वै. आठल्ये यांचा 'श्रीकृष्णाचा संदेश' ही गीतेतील प्रवृत्तिपर कर्मयोगाचे विवेचन करणारी लेखमालाही त्यांना आवडली. सप्टेंबर ३४ मध्ये वा. वि. शिरवाडकर यांचा 'भ्रष्ट झालेले धर्म' हा लेख आहे. रेडिओ ही त्याकाळात नवलाची गोष्ट होती. त्यासाठी 'मनोहरची आकाशवाणी' या शीर्षकाखाली ना. सी. फडके यांनी जेम्स हिल्टनची ''वुई आर नॉट अलोन'', अप्टन सिंक्लेअरची ''नो पॅसॉंरा'', नुनी फ्रॅन्कची ''क्लोज्ड फ्रांटिअर्स'', व्हिकीबामची ''सिक्रेट सेंटेन्स'' अशा जागतिक कीर्तीच्या नवनव्या इंग्लिश कादंबऱ्यांचा परिचय मनोहरमधून रोडिओवर भाषण करण्याच्या शैलीने सादर केला.

'किर्लोस्कर' मासिकाच्या आकर्षणामध्ये महत्त्वाचे स्थान सचित्रतेचे होते. शंकरभाऊ स्वतः चित्रकार असल्यामुळे प्रारंभीच्या कितीतरी मुखपृष्ठांवर त्यांनी ठसठशीत व्यक्तिमत्वाच्या स्त्रियांची सुंदर चित्रे काढली. त्याचबरोबर माणसांचा आळस, अविचार, दुर्लक्ष, जुने विचार यांची थट्टा करणारी व्यंगचित्रे प्रत्येक अंकाच्या सुरुवातीस काढण्याची प्रथा ठेवली. मार्मिक विषय आणि जोमदार रेषा

यामुळे ती व्यंगचित्रे प्रभावी होत. अंकातील गोष्टी किंवा कवितेसाठीही ते चित्रे काढीत. ३३-३४ च्या सुमारास या एकपात्री परिश्रमाने उच्चांक गाठलेला दिसतो. नंतर पुढे इंगळहळ्ळीकर, पाटील, घाग अशा होतकरू चित्रकारांची मदत घेण्यात आली. कधी बाबुराव पेंटर यांची सुंदर व्यक्तिचित्रेही मुखपृष्ठावर येऊ लागली.

प्रेसमध्ये आलेल्या नवशिक्या तरुणांतून शं. तु. माळी, गोलिवडेकर, बसवंत, ग. ना. जाधव हे पुढे नाव मिळवू लागले. मुंबईच्या 'टाईम्स' या वृत्तपत्रामधले प्र. ग. सिरूर यांची ओळख झाल्यावर त्यांची चित्रे सातत्याने किर्लोस्कर व 'स्त्री'च्या मुखपृष्ठावर येऊ लागली. कधी नदीच्या काठी, कधी डोंगरावर, घर सजवताना, बागेत हिंडताना, अशी तरुण युगुले त्यांनी जिवंत शैलीत रंगवली. त्याबद्दल एका चिकित्सक संपादकाने पुढे म्हटले की, ''स्त्रियांच्या वावरास माजघराची मर्यादा पडलेल्या समाजात, जीवनाच्या आनंदाच्या अनेक संधींची ओळख तरुणपिढीला किर्लोस्कर-स्त्रीच्या मुखपृष्ठांनी करून दिली.''

चित्रकलेविषयी शंकरभाऊंचे विचार पुढील भाषणातून आणखी स्पष्ट होतात

## अखिल महाराष्ट्र चित्रकार स्नेहसंमेलन १० वे अधिवेशन
## (श्री. शंकरराव किर्लोस्कर यांचे अध्यक्षीय भाषण १९५१)

चित्रकार बंधु भगिनींनो,

चित्रकलेचे माहेरघर गणल्या जाणाऱ्या कोल्हापूर शहरात आपल्या अखिल महाराष्ट्र चित्रकार परिषदेचे १० वे अधिवेशन भरत आहे हा योग अपूर्व आहे. कै. आबालाल, रा. ब. धुरंधर, आनंदराव मिस्त्री इत्यादी नामवंत चित्रकार या शहरातून निर्माण झाले व त्यांचीच उज्वल परंपरा चालविणारे वरच्या दर्जाचे चित्रकार आजही येथे आढळून येतात. चित्रकलेचे प्रेम हा कोल्हापूरकरांचा एक जन्मसिद्ध गुणच म्हणता येईल. पण तसे न करता माझ्यासारख्या चार रेघोट्यांची चित्रे काढण्यापलिकडे ज्याची मजल गेली नाही, अशा एका सामान्य माणसाला आपण ते पद दिले, याला आपली मित्र भावना कारण असेल, पण परस्पेक्टिव्हच्या दृष्टीने त्यात एक चूक राहून गेली असे आपल्यालाही कबूल करावे लागेल. आपण करीत असलेल्या सन्मानाबद्दल अर्थात मी आपला अत्यंत आभारी आहे.

मी स्वत: मोठासा चित्रकार नसलो तरी चित्रकलेबद्दल मला फार प्रेम आहे व त्याच्याही पेक्षा विशेष म्हणजे चित्रकलेला मनुष्याच्या आयुष्यात फार महत्त्वाचे स्थान आहे असे मला फार वाटते. नुसत्या आनंदप्राप्तीचा विचार केला तरी सौंदर्यदर्शनासाठी प्रत्येकजण हपापलेला असतो ही गोष्ट स्वयंसिद्ध आहे. मग ते सौंदर्य एखाद्या देखाव्यात, वस्तूत, शरीर सौष्ठवात अथवा अशा नमुन्यावरून काढलेल्या चित्रात

साठविलेले असो. मनुष्य सौंदर्याचा इतका भोक्ता का असतो याचे कारणदेखील उघड आहे. आपले सुख अथवा दु:ख आपल्या पंचेंद्रियांच्या द्वारे मिळते. पण कान, नाक, जीभ, त्वचा व डोळा यापैकी सर्वात जागृत व तीक्ष्ण असं कोणतं इंद्रिय असेल तर ते डोळा आणि म्हणूनच डोळो नसलेला आंधळा आयुष्यातील सतत मिळणाऱ्या एका उच्च आनंदाला पारखा झालेला असतो. म्हणून त्याच्याबद्दल आपण जास्तीत जास्त सहानुभूती दाखवितो.

तथापि डोळ्यांच्याद्वारे आपल्यास मिळणाऱ्या आनंदाचा लाभ तात्पुरता अथवा क्षणभंगूर असतो असं म्हणता येईल काय? कोणीस म्हटलं आहे की 'A thing of Beauty is a joy forever' सुंदर वस्तूपासून मिळणारा आल्हाद अवीट असतो. एवढचं नव्हे तर ती वस्तू डोळ्यापुढे नसली तरी आपले कल्पनाचक्षु ती आपल्या डोळ्यांपुढे उभी करू शकतात व आनंदाचा प्रत्यय आणून देतात. 'मेघदूतात' कालिदासाने वर्णन केलेला यक्ष त्याच्या प्रियेपासून अनेक योजने दूर राहात होता पण त्या प्रियेचे चित्र मूर्तिमंत त्याच्या अंत:करणात उभे होते व त्याला व्यथित करीत होते. पण याबाबतीत कालिदासाच्या यक्षाचं आपल्याला कशाला उदाहरण हवं? माहेरी गेलेल्या बायकोमुळे त्या यक्षासारखी कोणत्या नवऱ्याची स्थिती होत नाही?

हे झाले गमतीचे उदाहरण! पण यापेक्षा आणखी कितीतरी उदात्त, उत्कट व टिकाऊ संस्कारही आपल्या दृष्टीच्या द्वारेच आपल्या मनावर घडत असतात व अशा संस्कारामुळे आपल्या जीवनाचा साचा हळूहळू घडत जात असतो ही गोष्ट आपल्याला नाकारता येण्यासारखी नाही. पंढरीच्या विठोबाच्या दर्शनामुळे भक्ताचे देहभान उडते, तर शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापुढे अथवा चित्र ही एक निर्जिव वस्तू असली तरी प्रेक्षकाला चैतन्य अथवा नवी दृष्टी देण्याचे केवढे तरी सामर्थ्य त्या निर्जीव वाटणाऱ्या चित्रात असते हे आपण ओळखले पाहिजे.

सुरुवातीलाच हे थोडेसे रुक्ष वाटण्याजोगे विवेचन करावे लागले तरी ते जरूर होते. कारण चित्रकाराची नवी भूमिका त्याशिवाय समजावून देणे मला कठीण होईल.

चित्रकलेचे महत्त्व इतके थोर असताना अनेक चित्रकारांची अशी तक्रार असते की समाज त्यांच्या गुणांचे चीज करत नाही, त्यांची उपेक्षा केली जाते. पण मला नम्रपणे अशी पृच्छा करावीशी वाटते की, आपल्या चित्रकार मित्रांनी अगोदर समाजात कशा प्रकारच्या कलेची आवश्यकता आहे, आपले चित्राचे विषय अथवा ती चित्रे काढण्याचे तंत्र किंवा या कलेच्या प्रसारासाठी उघडी असलेली नवी क्षेत्रे यांचा कितीसा विचार केला आहे? काहीजण करीत असतील. पण पुष्कळ कलावंताकडे पाहिल्यास 'येरे माझ्या मागल्या' या धर्तीचेच त्यांचे काम चालू

असलेले दिसते.

आजच्या झपाट्याने बदलत्या जगात जुन्या कल्पनांची जागा नव्या कल्पना घेत आहेत. जुनी मूल्ये जाऊन नवी मूल्ये येत आहेत. चित्रकारांनी आपापल्या दृष्टीकोनातून फरक केला नाही तर त्याचे कार्य त्याला नीट पार पाडता येणार नाही.

कारण आपला दारिद्याने आणि, जुन्या कल्पनांनी पछाडलेला, अज्ञानात गुरफटलेला व सर्व बाजूंनी निःसत्व बनलेल्या देशाला सुंदर, संपन्न, सामर्थ्यशाली व सुसंस्कृत बनविणे हे यापुढील आपलं काम आहे. त्या प्रयत्नात केवढी तरी मोलाची कामगिरी बजावण्याची चित्रकार वर्गा पुढे आज संधी उभी आहे.

'किर्लोस्कर' मासिकात राजकीय स्वरूपाचे लेख फारसे येत नसत. यासंबंधी एका वाचकाने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना शंकरभाऊंनी संपादकीयात लिहिले, ''आपल्या आदरणीय पुढाऱ्यांच्या प्रयत्नांना यश येऊन आपला देश आज ना उद्या स्वतंत्र होणारच आहे. नंतर आपल्या स्वतंत्र देशाची जबाबदारी पेलून त्याची भरभराट करण्यासाठी जी कर्तृत्ववान माणसे उद्या हवीत, त्यांची उमेद आणि प्रयत्नावरील विश्वास वाढविण्याचे काम हे आम्ही देशप्रेमाचे काम समजूनच करीत आहोत.''

१९३०-४० चा काळ मासिकांच्या चढत्या भरभराटीचा होता. मासिकांची मागणी वाढली तशी येणाऱ्या साहित्याचीही संख्या वाढली, म्हणून सहसंपादकांच्या कामात मदतनिसांची गरज वाढली. मुंबईच्या 'खेळगडी' या मुलांच्या मासिकाचे संपादक का. रा. पालवणकर यांचे एक नातलग म. ना. पालवणकर यांची भेट घेतल्यावर, किर्लोस्करवाडीस जाण्यास थोरल्या पालवणकरांनी संमती दिली. त्याच सुमारास पुण्याहून बी. ए.ची परीक्षा उत्तीर्ण झालेले मो. प्र. फडकेही संपादकीय कामास लागले. त्यामुळे काम सोईचे झाले.

याच सुमारास बुद्धिवान व पुरोगामी विचाराचे लेखक ह. रा. महाजनी यांची 'माणसांचे चार वर्ण समजणे कसे चुकीचे आहे' हे सांगणारी 'चार्वाकाचे आत्मवृत्त' ही लेखमाला किर्लोस्कर मासिकातून प्रसिद्ध झाली व त्यामुळे वाचकांत फार खळबळ उडाली. हिंदीतील प्रसिद्ध लेखक प्रेमचंद यांच्या अध्यक्षतेखाली प्रोग्रेसिव्ह रायटर्स असोसिएशनने लखनौ येथे अधिवेशन घेतले होते. त्याचे निमंत्रण शंकरभाऊंना मिळाले आणि ह. रा. महाजनी यांच्यासमवेत ते लखनौस गेले. तेथे अनंत काणेकर यांची भेट झाली. पुढे काणेकरांची 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' ही रशियाच्या प्रवासाची लेखमाला किर्लोस्करमधून प्रसिद्ध झाली आणि प्रवासवर्णनाच्या वेगळ्या शैलीने ती विशेष गाजली.

१९३० पासून पुढचा काळ भारतात जागरणाचा होता. यापूर्वीच्या काळात कित्येक शतके मध्ययुगीन अज्ञानाच्या अंधारात राहिल्यामुळे माणसांच्या विचारांचे

जग विहिरीतल्या बेडकाप्रमाणे फार संकुचित झाले होते. भारतामध्ये ब्रिटिशांनी आपला अंमल बसविल्यामुळे भारतीयांना परदेश, विलायत म्हणजे फक्त इंग्लंड असे वाटत असे.

१९१४ ते १९१८ या काळात पहिल्या महायुद्धाच्या बातम्यांमुळे व सैनिकांच्या अनुभवामुळे जर्मनी, फ्रान्स, स्पेन, हॉलंड, पोर्तुगाल अशी युरोपातील व इतर देशांची नावे ऐकून त्यांच्याविषयी विशेष कुतूहल उत्पन्न झाले. ब्रिटिश साम्रज्यात बंड करणारे आयर्लंडचे टेरेन्स मॅक्स्विनी, लोहाराचा प्रधान झालेला इटलीचा मुसोलिनी, रशियन कामगारांना नेता लेनिन अशा व्यक्तींचे किर्लोस्करमध्ये येणारे परिचय वाचकांना आकर्षक वाटत होते. १९१७ मध्ये झालेली रशियन क्रांती म्हणजे कामगारांच्या स्वातंत्र्याचा विजय! तो कसा टिकणार म्हणत असताना तेथील शासन व समाज बळकट व कार्यक्षम होत चालले. त्यामुळे सोव्हिएत युनियन या वेगळ्या प्रकारच्या समाजव्यवस्थेबद्दल कुतूहल वाढले. रशियन क्रांतीच्या १० व्या वाढदिवसाच्या सोहळ्यात पंडित जवाहरलाल यांनी भाग घेतला. ते भारतात परत आल्यावर तरुणांसाठी समाजवादी विचारसरणीचा प्रसार करणारी अभ्यासमंडळे सुरू झाली. उदारमतवादी लोक जहाल विचारांकडे लक्ष देऊ लागले.

त्याचा परिणाम किर्लोस्कर मासिकांत येणाऱ्या लेखातून वाचकापर्यंत पोचू लागला. १९३२ ते ४२ हा काळ गांधीजींची दांडीयात्रा, मिठाचा सत्याग्रह, संपूर्ण स्वराज्याचा ठराव यामुळे असंतोषाच्या ज्वालांनी धगधगत होता. हजारो बंधु-भगिनी तुरुंगात अपेष्टा भोगत असल्यामुळे त्यावर्षी लोकांनी गणेशोत्सव, दसरा, दिवाळी हे सणही साजरे केले नाहीत.

त्यासंबंधी शंकरभाऊंचा थोडा वेगळा विचार प्रकट झाला.

''असा ऐतिहासिक क्षण आल्यावर स्वातंत्र्याचा विचार केवळ राजकीय क्षेत्रापुरताच मर्यादित राहू शकत नाही. ज्या ज्या प्रकारचे दास्य, जुलूम अथवा अरेरावी समाजात चालू असेल, त्या सर्व प्रकारांना झुगारून देण्याचा विचार समाजाच्या मनांत स्फुरण पावला पाहिजे. ब्रिटिशांचे दिवस संपत आल्यावर शेटजी-भटजी आणि नवरोजी या सर्वांनाच शह लावावा हे योग्यच ठरेल.''

तुर्कस्थानच्या केमाल पाशाचे उदाहरण जगापुढे होते. त्याने नुसते राजकीय दास्य नाहीसे केलं नाही तर, मुल्लामौलवींचे उच्चाटन केले, स्त्रियांच्या बुरख्याला बंदी घातली, स्त्रियांना समान हक्क दिले.

स्त्री-मासिकातही राष्ट्रीय चळवळीतील सत्याग्रही स्त्रियांचे परिचय येऊ लागले. हिंदू कायद्यांत आईला इस्टेटीत हक्क नाही ही स्थिती डोळ्यात भरवणारी बाळूताई खरे यांची पत्ररूप गोष्ट आली. कृष्णाबाई मोटे यांच्या श्रमिक स्त्रियांच्या प्रश्नांची

ओळख करून देणाऱ्या 'दृष्टीआडच्या सृष्टीत' या लेखमालेचा प्रारंभ झाला. ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांनी 'सुशिक्षित स्त्रिया आणि विवाह' व 'आर्थिक स्वातंत्र्य आणि समाजाचे रूपांतर' या लेखात समाजशास्त्रीय विश्लेषण करून समाज जीवनातल्या ज्या उणीवा दाखविल्या, तो विचार फार महत्त्वाचा होता. अशा साहित्यामुळे स्त्री मासिक महाराष्ट्रात थोड्याच काळात लोकप्रिय होत गेले.

१९३७ मध्ये किर्लोस्कर मासिकाचा २०० वा अंक निघाला. त्याच्या मुखपृष्ठावर सायकलवरून जाणारे तरुण तरुणीचे युगुल २०० व्या मैलाचा दगड ओलांडताना हसतमुखाने हात वर करून साथ देत आहे, असा प्रसंग दाखविणारे सिरूरांचे चित्र फार लोकप्रिय झाले. या अंकात ना. सी. फडके यांनी ''४५,००० प्रतीच्या तीन मासिकांचा गुप्त सूत्रधार'' असे आपल्या संपादक मित्राचे-शंकरभाऊंचे वर्णन केले आहे. समाजातील अनेक मान्यवरांनी मासिकांच्या कामगिरीबद्दल आपले अभिप्राय पाठवले होते.

१) **शंकराचार्य कुर्तकोटी** - देशकालपरिस्थितीप्रमाणे धर्मकल्पना बदलल्या पाहिजेत. किर्लोस्कर मासिकाने चालविलेले काम परिणामी समाजाच्या विकासाला हितकर ठरेल यांत शंका नाही.

२) **गुरुवर्य कर्वे** - मासिकाने लोकमताला वळण लावले

३) **क्षात्रजगद्गुरू** - बहुजनसमाजाला कार्यप्रवृत्त करण्याचे महत् कार्य केले.

४) **ज्ञानकोशकार केतकर** - जनतेच्या मनोवृत्तीशी सहृदयता दाखविली

५) **श्रीमती गीताबाई गायकवाड** - अस्पृश्यता निवारण व लोकशिक्षणाचे काम केले.

६) **बालगंधर्व** - महाराष्ट्रात जुन्या विचारावर शस्त्रक्रिया चालविली.

७) **वि. स. खांडेकर** - मतप्रचार व मनोरंजन यांचा सुवर्णमध्य साधला.

८) **वि. पां. दांडेकर** - हे माझे मासिक वाटते.

९) **पोतदार** - आजची तरुणपिढी किर्लोस्करची आहे.

१०) **गंगाधरराव देशपांडे, बेळगाव** - उद्योगधंद्याचे महत्त्व पटविण्याचे कार्य मासिकाने केले.

११) **मीमांसाभूषण पु. बा. साठे** - किर्लोस्कर कार्यालयांतील कौटुंबिक वातावरणाचा अभिमान वाटतो.

१२) रँग्लर परांजपे - विवेकशक्तीला उत्तम चेतना दिली.
१३) भास्करराव जाधव, कोल्हापूर - लोकांची विचारशक्ती जागी केली.
१४) बॅ. सावरकर - अज्ञानयुगातून समाजाला विज्ञानयुगाकडे नेले.
१५) महादेवशास्त्री दिवेकर - शंकरराव, ताम्हनकर, विजापुरे यांच्या एकरूपतेत किर्लोस्करचे वैशिष्ट्य आहे.
१६) बाबुराव पेंटर - व्यावहारिक चित्रकलेचा उपयोग शिकवला.
१७) व्ही. शांताराम - माझ्या मनाला मासिकांच्या वाचनाने अनेकदा स्फूर्ती मिळाली.

बेळगावचे विक्रेते मणूरकर सांगतात, 'माझे एक ग्राहक एक तारखेला 'किर्लोस्कर तारीख' म्हणतात. बॅरिस्टर सावरकर लिहितात 'लेखकाच्या मानधनाबद्दल संपादकाची खळखळ ही सर्वांचा अनुभव आहे; पण किर्लोस्करांची खळखळ अंकापाठोपाठ डाकवाला आणून देतो.'

२०० व्या अंकाच्या प्रकाशनामुळे किर्लोस्कर मासिकांचा बोलबाला इतर वृत्तपत्रांतून पुष्कळ होऊ लागला; त्याबरोबर परंपराप्रिय सनातनी लेखकांची टीका जोरात सुरू झाली. त्यामध्ये 'पुरुषार्थ' व 'केसरी' आघाडीवर होते; पण एक दिवस काशीबाई कानिटकर यांच्या कन्या इचलकरंजीच्या राजस्नुषा अनुताई वहिनीसाहेब घोरपडे या स्त्री मासिकेच्या लेखिकेने 'किर्लोस्कर' मासिकाच्या संपादकांना लिहिलेले अनावृत्त पत्र 'केसरीत' प्रसिद्ध झाले. ''तुम्ही मासिकावर स्त्रियांची चित्रे देता हे गैर आहे. मोबदल्याचे आमिष देऊन तुम्ही समाज अधोगतीस नेत आहात. आपल्या उज्वल संस्कृती व पवित्र हिंदुधर्माबाबत तुम्ही चालविलेला हीन प्रचार थांबवा. अशा मासिकांच्या प्रसाराला पायबंद घातला पाहिजे, इत्यादि,'' आपल्याच लेखक भगिनीशी वाद घालणे शंकरभाऊंना आवडणार नव्हते; पण या ठिकाणी त्या समाजातील सुधारणाविरोधी सनातनी वर्गाच्या प्रतिनिधी होत्या. या भूमिकेतील दोष व लपंडाव उघड केल्यावाचून गप्प बसणे शंकरभाऊंना योग्य वाटत नव्हते.

वहिनीसाहेबांच्या पत्राला शंकरभाऊंनी १६ पानी सचित्र सविस्तर उत्तर दिले. आमच्या मासिकावर आपण केलेल्या आक्षेपांना उत्तर देण्यापूर्वी मी असे विचारतो की, समाजात ज्या नीतिकल्पना परंपरागत चालत आल्या आहेत त्या समाजाला सदैव कल्याणकारक असतात काय? तसे असेल तर १) बालविवाह २) विधवांचे केशवपन ३) हुंड्यांची चाल ४) पतीने केलेला छळ पत्नीने निमूटपणे सहन करणे या गोष्टी इष्ट व नीतिमय आहेत असे आपणास म्हणावे लागेल. याउलट, प्रौढ विवाह, संततिनियमन, स्त्रियांचे अर्थार्जन, घटस्फोट या गोष्टी निषिद्ध व चुकीच्या

मानाव्या लागतील.

हिंदू स्त्रियांची करुणाजनक स्थिती दूर व्हावी म्हणून त्यांच्या दुःखाचे खर चित्र समाजापुढे मांडणे ही त्यांची विटंबना आहे आणि त्यांना सर्वप्रकारे जाचात ठेवणे ही विटंबना नाही, असे आपण म्हणता काय? सर्व स्त्रिया सुंदर दिसण्यासाठी केश-वेशभूषेची काळजी घेतात ना?

मुखपृष्ठावरील स्त्रियांच्या चित्रातून स्त्रीसौदर्य दाखविले तर ती मनाला आनंद देणारी आकर्षक गोष्ट व कलेचा एक महत्त्वाचा विषय आहे. आजपर्यंतच्या लेखकांनी शब्दातून, चित्रकारांनी कागदावर आणि शिल्पकारांनी दगडांत रेखलेल्या स्त्रीच्या कलाकृती निषिद्ध व चुकीच्या म्हणायच्या काय? चित्राबद्दल काहूर उठवणे हे सनातन्यांचे ढोंग आहे. रामाच्या मांडीवर बसलेली सीता, भिल्लिणीच्या मागे लागलेला शंकर आणि गोपींची लुगडी पळवून त्यांना विवस्त्र करून गंमत पाहणारा कृष्ण यांच्या तसबिरी घराघरात असताना मासिकात शेजारी तरुण-तरुणी बसलेली पाहून सनातन्यांचा मस्तकशूळ उठतो हा निव्वल दांभिकपणा आहे. मोबदल्याच्या आमिषाबद्दल आपण लिहिले त्यापूर्वी क्षणभर विचार करायला हवा होता. आपण स्वतःच स्त्री मासिकासाठी लिखाण करता. त्यात आमिष दाखवून सहकार्य मिळविण्याचा आमच्याकडून कधी प्रयत्न झाला हे सांगता का! आम्ही मागासलेल्या धर्मकल्पनांची उत्क्रांती होऊन नवा विचार पुढे आणण्याचा प्रयत्न करतो, तो समाजाच्या विकासासाठीच. समाजाच्या वैचारिक जागृतीचे कार्य करीत असताना मला सनातन्यांच्या रोषाला पात्र व्हावे लागले याला माझा नाईलाज आहे. आज मासिकांच्या निषेधाच्या सभा आपण घेत आहात; पण भविष्यकाळी तेथेच मासिकांच्या गौरवसभा भरण्याचा योग येईल अशी मला खात्री आहे.

या बिनतोड व समतोल उत्तराबद्दल वाचकांनी शंकरभाऊंवर अभिनंदनाचा वर्षाव केला. त्यातील एक नमुना म्हणजे माधवराव बागलांचे पत्र 'शाब्बास शंकररावजी! आपली ओजस्वी लेखणी, करारी बाणा आणि तत्त्वनिष्ठाही, आपण या पत्राने असंख्य वाचकांना पटवून दिली आहे. आपले पत्र म्हणजे साहित्याचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून राहील!'' मराठीतील इतर नियतकालिकांनीही या कामगिरीबद्दल किर्लोस्करचे अभिनंदन केले. 'प्रतिभा' साप्ताहिकात, ''ही तीन मासिके म्हणजे पुराणमतवादाच्या तटाला किर्लोस्करांनी लावलेले तीन सुरुंगच आहेत'' असे म्हटले. अकोला, अमरावती, मुंबई अशा ठिकठिकाणी स्त्रियांनी व साहित्यिकांनी सभा घेऊन त्यामध्ये किर्लोस्कर मासिकास आपला पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे मासिकांचा नावलौकिक समाजात वाढला.

# उत्कर्षाकडे वाटचाल

निरनिराळ्या पुरोगामी लेखकांचे साहित्य हे तरुणांमध्ये आत्मविश्वास वाढवू शकते, महाराष्ट्राला पुढे जायचे असेल, तर थोर विद्वान लेखकांचे विधायक-प्रेरक विचार तरुणांना समजले पाहिजेत' त्या दृष्टीने शंकरभाऊंचे प्रयत्न सुरू झाले. विठ्ठल रामजी शिंदे म्हणाले, ''तरुणपिढीने आपण केवळ हिंदी आहोत हे ध्यानात ठेवावे. एकी करायची ती महाराष्ट्रापुरतीच न करता प्रांतिक भेद व मत्सर यांना थारा देऊ नये. महात्मा गांधीनी विश्वकुटुंबी होण्याचे ध्येय ठेवले आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर असे सटरफटर भेद का लक्षात आणावे? तरुणांनी त्यापासून सावध रहावे.''

**डॉ. धनंजयराव गाडगीळ** आर्थिक स्थितीबद्दल विवेचन करताना म्हणतात, ''ब्राह्मण समाजास मुत्सद्देगिरी आणि लढाई फार आवडे, मराठे आपली मुले शेतावर अथवा लढाईवर पाठवीत, त्यामुळे लोकांचा विचार उद्योगधंद्याकडे गेला नाही. येवल्याला जरतारी धंद्यासाठी गुजराथी कारागीर, जुन्नरच्या कागदासाठी उत्तरेतील मुसलमान, मालेगावची पेठ वसवायला मोमिन आणि सोलापूर-नागपूर हातमाग धंद्याला आंध्रातील कोष्टी मंडळी बोलावली. हाती राज्यसत्ता असूनही औद्योगिक उन्नतीचे बीज राज्यकर्त्यांना महाराष्ट्रात पेरता आले नाही. इंग्रजी आमदानी आली व आम्ही नोकरी व वकिली करीत राहिलो.''

दुसरे अर्थशास्त्रज्ञ **वामनराव काळे** म्हणतात, ''पूर्वीपासून आम्ही व्यापाराकडे अक्षम्य दुर्लक्ष केले, त्याचे परिणाम आम्ही अद्याप भोगत आहोत. आम्हाला द्रव्यासाठी वेळोवेळी परप्रांताकडे पाहावे लागते. हा प्रकार बंद करण्यासाठी, तरुणांनी कंबर बांधली पाहिजे. अनेक शतकांच्या उपेक्षेमुळे व्यापारीदृष्ट्या जे अवगुण आमच्यात शिरले आहेत त्यांचा त्याग करून, आत्मविश्वास, परस्पर सहाय्य, सचोटी वं पद्धतशीरपणा हे गुण संपादिले तर हा हा म्हणता आपला उत्कर्ष होईल.'

विद्वान प्राध्यापक महामहोपाध्याय **दत्तो वामन पोतदार** म्हणाले, 'ज्या महाराष्ट्राची उन्नती करायची म्हणता तो महाराष्ट्रात मुळात आहे कोठे? वरावीण वऱ्हाडी अशी आपली स्थिती आहे. मुंबई इलाख्यातील दहा-बारा जिल्हे म्हणजे

महाराष्ट्र नव्हे. महाराष्ट्राची संस्कृती, भाषा, परंपरा असलेले विदर्भ मराठवाडा इत्यादी भाग आहेत. काही वैशिष्ट्य आहे. आपण त्याकडे ऐक्यात्मक भावनेने बघतो. त्यांची एकी झाली पाहिजे. प्रथम एकी मगच उत्कर्ष!'

**डॉ. वासुदेवराव किर्लोस्कर** हे नामवंत डॉक्टर. जन्मजात इंजिनियर व सुधारणेचे कळकळीचे पुरस्कर्ते. त्यांनी सुधारणावादी इंग्रजी विद्वांनाचा (डार्विन, स्पेन्सर, मिल) तसेच मार्क्सवादावरील ग्रंथांचा अभ्यास केला होता. आपल्याला नवी घडी बसवायची तर, त्याविषयीचे शास्त्रोक्त पृथक्करण करून त्यांनी मुद्देसूद विवेचन केले होते. **'नवे-जुने : एक सामाजिक पृथःकरण'** या लेखांत ते म्हणतात, ''समाजात जे वेगवेगळे थर पडतात ते अर्थोत्पादनाच्या अगर उपजिविकेच्या साधनसाम्यावरून. प्रत्येक समाजात चार वर्ग असतात.

१) संपत्ती उत्पन्न करण्याच्या साधनावर ताबा ठेवून, संपत्ती व सत्तेचा उपभोग घेणारा अर्थजीवी वर्ग,
२) बुद्धीचा उपयोग करून प्रत्यक्षपणे अर्थजीवी वर्गावर अवलंबून असणारा बुद्धिजीवी वर्ग,
३) समाजाच्या अंधश्रद्धेचा फायदा घेऊन, त्याला परमार्थाची भुरळ पाडून जगणारा परमार्थजीवी वर्ग.
४) शरीरश्रमाखेरीज जगण्याचे अन्य साधन नसलेला व केवळ शरीरकष्टावर जगणारा श्रमजीवी वर्ग म्हणजे शेतकरी-कामकरी.

समाजातील सर्व ऐहिक संपत्ती श्रमजीवी वर्ग निर्माण करीत असला, तरी या संपत्तीचा सर्वात मोठा वाटा अर्थजीवी वर्गाच्या पदरात पडतो व त्याच्याकडून तो बुद्धिजीवी व परमार्थजीवी वर्गात वाटला जातो, त्यामुळे अशाप्रकारे नाडलेला श्रमजीवी वर्ग व सुखवस्तू वर्ग या वर्गामध्ये संघर्ष सुरू होतो. जगाचा इतिहास म्हणजे या वर्गातील स्पर्धा व झगडे.

शिवाजी महाराजांचे नाव महाराष्ट्रात नेहमीच आदराने घेतले जाते; पण त्यांचे कार्य पाहता रयतेच्या कल्याणासाठी खोलवर विचार करण्याचे होते. म्हणून रयतेने त्यांना भरपूर पाठबळ दिले. शिवाजीने मुसलमानांचा चढेलपणा उतरवला, तशीच मस्त वतनदार हिंदूंची मस्ती आणि रग जिरवली. गोवधबंदी जरूर केली; पण सर्वांचा प्रतिपाळ केला तसा ब्राह्मणांचाही प्रतिपाळ केला. त्यांची मोहिम जमिनदाराविरोधी क्रांतिकार्याची होती. हे सत्य लालजी पेंडसे यांनी अभ्यासपूर्वक लिहिलेल्या किर्लोस्कर मासिकातील 'शिवाजी धर्मरक्षक का क्रांतीकारक' या लेखमालेने लोकांच्या नजरेस आणले आणि त्यांच्या मनातील संभ्रम नाहीसा केला. त्यामुळे या लेखांचे स्मरण वाचकांच्या मनात दृढ झाले.

असे विचार मासिकांत येऊ लागल्यावर प्रा. फडके यांचे मन साशंक झाले, तेव्हा शंकरभाऊ त्यांना घेऊन सोलापूरला गेले. समाजाच्या विविध थरांत वावरून त्यांचे अंतरंग पाहता येईल तितके पाहण्याची अप्पासाहेबांनाही उत्कंठा होती. सोलापूरमध्ये कम्युनिस्ट कार्यकर्ते तेथील कामगारांचे प्रश्न सोडविण्यात मग्न होते. त्यामध्ये शंकरभाऊंची भाची मीनाक्षी साने हिने बिडी कामगार बायकांच्या प्रश्नाचा अभ्यास करून ते प्रश्न सोडविण्याची खटपट चालवली होती. तिथे या शेकडो विडी कामगार बायकांच्या मागण्या समाजाच्या कानावर घालण्यासाठी काढलेली मिरवणूक मुख्य रस्त्यावरून जाताना त्या स्त्रियांचा आवेश, धैर्य, आत्मविश्वास पाहून अप्पासाहेब प्रभावित झाले. त्यांनी, पाहिलेल्या या कामगार स्त्रियांवर 'आगलावी' ही एकांकिका लिहिली. जाने. १९३८ मध्ये ती 'स्त्री' मासिकात प्रसिद्ध झाल्यावर अनेक ठिकाणी तिचे प्रयोगही झाले.

१९३७ च्या ऑगस्ट महिन्यात किर्लोस्कर मासिकाचा १९ वा वाढदिवस आला. त्यासाठी एखाद्या सभागृहात जमून भाषण करण्यापेक्षा, आपल्या सर्व सहकारी मंडळींना उत्साह व आनंद वाढविणारा कार्यक्रम हवा. म्हणून किर्लोस्करवाडी शेजारच्या पारसनाथाच्या डोंगरावर ऑफिसबॉयपासून संपादकापर्यंत मासिकाच्या कार्यालयातले सर्व लोक खेळीमेळीने एकत्र आले. हुतूतू, लंगडीसारखे खेळ झाले. गाणी-पोवाडे, म्हटले गेले. चहा-फराळाचा आस्वाद घेत गप्पासप्पा रंगू लागल्या. ४ तास निसर्गाच्या सान्निध्यात मोकळ्या वाऱ्यावर कसे गेले ते समजलेही नाही. कोल्हापूरचे शि. आ. स्वामी हे लेखक त्यादिवशी मुद्दाम आले होते. ''किर्लोस्कर मासिकांची संस्था' एक मोठ्या कुटुंबाप्रमाणे आपुलकीने आणि आस्थेने चालविलेली संस्था आहे' असे पाहुण्यांना वाटत होते. अशा कार्यक्रमानंतर सारेजण नव्या उत्साहाने व कार्यक्षमतेने कामे करणारच.

पुढे दरवर्षी ऑगस्टमध्ये डोंगरावर, ओढ्याकाठी, वनराईत अशा जागी हे वाढदिवस अनेक वर्षे होत राहिले. त्यावेळी कोणी लेखक, लेखिकाही मुद्दाम येत असत. वाडीचे पोस्टमास्टर खंडोपंत कुलकर्णी रसिकतेने सामील होत आणि किर्लोस्करवाडी वृत्तांतातून वाढदिवसाची गंमत वाचकांपर्यंत पोहोचविली जाई.

# धामधुमीचा काळ आणि ग्रामराज्याची जबाबदारी

त्या काळात ब्रिटिशांची सत्ता असली तरी पूर्वापार चालत आलेली राजेरजवाड्यांची लहान-मोठी संस्थाने देखील होती. स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाल्यावर संस्थानी प्रजेतही जागृती होऊन औंध संस्थानातील आटपाडीच्या शेतकऱ्यांनी आपल्या मागण्या प्रचंड मोर्चा काढून राजेसाहेबांना सादर केल्या. भारताच्या ब्रिटिश मुलुखात औंध संस्थानचे राजे बाळासाहेब पंत प्रतिनिधी हे उदारमतवादी होते. त्यांचे चिरंजीव अप्पासाहेब पंत हे विलायतेत बॅरिस्टर होऊन आले होते. गांधी, नेहरू यांच्याही भेटी ते घेत व तेथील विचार राजेसाहेबांपर्यंत पोहोचवत. साहजिकच आपल्या संस्थानात जबाबदार राज्यपद्धती सुरू करून प्रजेला स्वराज्याचे अधिकार देणारे ते पहिलेच संस्थानिक झाले असावेत.

महात्मा गांधीच्या कानावर ती वार्ता जाताच त्यांनी औंध संस्थानासाठी दोन पानात मावणारी सुटसुटीत राज्यघटना करून दिली. प्रजेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे एक कायदेमंडळ बनवून, त्यांच्याकडे कायदे तयार करण्याचे व अंदाजपत्रक करण्याचे अधिकार द्यावेत; प्रत्येक तालुक्यातील जमिनीचा सारा त्या तालुका समितीला परत द्यावा व त्या पैशातून तालुका समितीने खेड्यांच्या शिक्षण, आरोग्य, न्यायदान, संरक्षण इत्यादी बाबी ग्रामपंचायतीमार्फत पार पाडाव्या. अशी तरतूद होती. थोडक्यात, 'स्वयंशासित खेडे' हे घटनेचे प्रमुख वैशिष्ट्य होते.

१९३९ च्या एप्रिलमध्ये एक दिवस कारखाना सुटल्यावर शंकरभाऊ घरी येत असताना चौकातील नोटीस बोर्डासमोर गर्दी दिसली. सारेजण निवडणुकीचा जाहिरनामा व वाडीतील मतदारांची यादी पहात होते. निवडणूकीस उभे राहणारांनी कुंडलच्या मामलेदारांकडे अर्ज महिना अखेरपूर्वी करायचे होते. त्याबद्दल बोलायला शंकरभाऊ लक्ष्मणरावांकडे गेले, तेव्हा त्यांनी शंकरभाऊंकडेच ग्रामपंचायत स्थापन करण्याचे, निवडणुकीसाठीचे अर्ज पाठविण्याचे वगैरे सर्व कामे सोपविली. साहजिकच, किर्लोस्करवाडीच्या ग्रामपंचायतीचे शंकरभाऊ सरपंच झाले.

पुढे कुंडल तालुक्यातील खेड्यांच्या ग्रामपंचायतीच्या निवडणुका पार पाडल्या व तालुका समितीचे अध्यक्ष निवडण्याचे बाकी राहिले. तिथे जमलेला तो ग्रामीण प्रतिनिधींचा समाज व त्यांच्यावर येणारी जबाबदारी याची कल्पना मनात येताच समितीत गट राहू नयेत यासाठी सर्वांनी शंकरभाऊंचे नाव अध्यक्ष म्हणून बहुमताने मान्य केले. त्यावेळी भाषणात शंकरभाऊ म्हणाले, ''तालुक्याच्या खऱ्या हिताचा विचार करावयाचा तर सर्वांनी एकोप्याने तालुक्यातील जनतेची सुधारणा करावयाची आहे. आपण त्यासाठी झटू या आणि औंध संस्थानच्या स्वराज्याचे खरे चीज करून दाखवू या.''

आपोआपच तालुका समितीमध्ये खेळीमेळीचे स्नेहाचे वातावरण उत्पन्न झाले. दुसऱ्यादिवशी शंकरभाऊ औंधास जाऊन राजेसाहेब व अप्पासाहेबांना भेटले. त्यांना फार आनंद झाला. ''तुम्ही हे काम पत्करले आहे. ते पार पाडायला जगदंबा तुम्हाला मदत केल्याशिवाय राहणार नाही!'' असे म्हणून राजेसाहेबांनी त्यांना आशिर्वाद दिला.

मासिकातील सहकाऱ्यांनीही नव्या कामासाठी वेळ देण्यास शंकरभाऊंना संमती दिली. पहिले काम, तालुक्यातील सर्व खेडी प्रत्यक्ष पाहण्याचे. एक जुनी मोटरगाडी डागडुजी करून घेतली. खेड्यांतील लोकांना सोयीची वेळ म्हणजे रात्रीची. शेतातील कामे आटोपून गावात आल्यावर शंकरभाऊ येईपर्यंत तिथले जुने पंच लोकांना जमवून त्यांच्याशी गोष्टी करीत. गावचा इतिहास, आजची स्थिती याचे तपशील मिळत. शंकरभाऊ त्यांना प्रथम सांगत की, ''मी तपासणी करणारा सरकारी अंमलदार नाही. गावासाठी काही करावे म्हणून तुम्हाला भेटायला आलो आहे. सगळ्यासारखे ते जमिनीवर पसरलेल्या बसकरावरच बसत. त्यामुळे खेड्यातील मंडळींशी स्नेह जमविणे सोपे झाले. रात्री माणसे जमल्यावर शंकरभाऊ आपल्या भाषणात देशात सुरू असलेल्या स्वातंत्र्य चळवळीची थोडी माहिती देऊन 'औंध संस्थानाला महात्मा गांधींच्या आशीर्वादाने स्वराज्य मिळाले आहे. गावाचा सर्व कारभार आपणच पाहणार आहोत; जमिनसारा आपल्यालाच मिळणार आहे. मात्र आपण एकविचाराने, एकजुटीने वागायला हवे. आपल्याला कोणत्या सुधारणा करायला हव्यात त्याचा विचार करून मी आठ दिवसांनी येईपर्यंत काय हवे ते ठरवून ठेवा.'' असे सांगून परत जात.

अशाप्रकारचा दौरा सर्व गावातून काढल्यावर, प्रत्येक गावाला थोड्या सवडीने २-३ भेटी दिल्या. त्यामुळे तिथल्या खेड्याचे वैशिष्ट्य, त्याची परंपरा, त्यांच्या अडचणी यांची चांगली कल्पना शंकरभाऊंना आली. साऱ्या मंडळींची जानपछान झाली. त्यांची मते व त्यांची वितुष्टे लक्षात येण्यास वेळ लागला नाही. खेड्यांमध्ये

कसली लपवाछपवी चालत नसते. त्यामुळे खरे कार्यकर्ते कोण, रिकामा डौल दाखवणारे कोण, कर्जात बुडालेले, मदिराभक्त, भजनाची आवड असणारे, नियमित पंढरीची वारी करणारे, कुस्त्यांचा शौक असणारे, अशा सर्व माणसांची रूपे समजून येत गेली.

खेड्यात सुधारणा करायची ती गावातल्या लोकांच्या मताप्रमाणे हे तत्त्व स्वीकारले गेले होते. अशी सार्वजनिक कामे पार पाडण्यासाठी खरे भांडवल म्हणजे जनतेची हौस आणि उत्साह हीच होत. चर्चा करून ठरविल्याप्रमाणे कोणाला शाळा, कोणाला विहीर, काहीना रस्ते, कुठे जुन्या देवळाचा जीर्णोद्धार, काहीना तालीमखाना अशा निरनिराळ्या गावांच्या मागण्या होत्या. पैशाची कमतरता गावकऱ्यांची श्रमशक्ती भरून काढीत असे. सारे गाव पडेल ते कष्ट करायला कंबर बांधून उभे राही. मंगलौरी कौले, खिळे, फरशी, सिमेंट अशांना लागेल तेवढाच काय तो रोख खर्च. तो ५००० झाला तरी इमारत पंधरा-सोळा हजारांची उभी राही.

शाळेच्या इमारती बांधून होताच त्या भराभर भरून जाऊ लागल्या. १५-२० मुलांचा वर्ग ज्या खेड्यातच रखडत चाले, तिथे दीड-दोनशे मुले शाळेत नियमित जाऊ लागली. फिरतीवर असताना ज्या खेड्यात शंकरभाऊ जात तेथील कामाचे कौतुक तर करायचेच; पण इतर खेड्यांतून कोणती कामे चालली आहेत हेही सांगून गावकऱ्यांना नव्या कल्पना देत असत. एक वर्षाच्या आत सर्व तेरा खेड्यांत नवे चैतन्य व उत्साह खेळू लागला.

खेड्यांतील बिकट प्रश्न म्हणजे तिथले भांडण-तंटे, जमिनीवरून, विहीरीवरून, पैशाच्या व्यवहारावरून, दत्तक प्रकरणावरून अनेक खेकटी सुरू होतात; पण खेड्यातील न्यायदानाचे अधिकार ग्रामपंचायतीला मिळाले. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय सुकर व कमी खर्चाचा झाला. शक्यतो तडजोडीने प्रकरण मिटविले जाई.

कुंडल पंचायतीचा कारभार अध्यक्ष म्हणून शंकरभाऊंकडे आला. त्यामुळे किर्लोस्करवाडीमधील त्यांचे ऑफिस ही पाटलाची चावडी बनत चालली. निरनिराळ्या खेड्यांतून अर्ज घेऊन बायाबापड्या, म्हातारे-कोतारे, स्पृश्य-अस्पृश्य त्यांच्याकडे दाद मागायला येत. त्यांचे काम म्हणजे बरेचवेळा चार युक्तीच्या गोष्टी सांगून समाधान करण्याचे असे; पण खेड्यातील भांडणे व अडाणीपणा यामधून उभे राहणारे विषय अद्‌भुत असत.

### आळसंदचा दरोडा:

१९४१ फेब्रुवारी, अमावस्येचा दिवस. रात्रीचे जेवण करून शंकरभाऊ बसले तो आळसंद गावाचे दोन रामोशी सरपंचाचे पत्र घेऊन आले. ''आमच्या गावावर

आज दरोडा पडणार आहे. तुम्ही ताबडतोब निघून यावे.'' ते वाचून पूर्वसूचना देऊन दरोडा कसा येईल याचे क्षणभर शंकरभाऊंना हसू आले, तरी गावचे लोक घाबरले असतील म्हणून शंकरभाऊ मोटार काढून रायफल घेऊन लगेच निघाले. चावडीपुढे सारे गाव जमले होते. गेल्या आठवड्यात दरोडेखोरांनी गोफणीने दगड मारून गावाला दोन वेळा दहशत घातली होती. हे ऐकल्यावर त्या गर्दीतील पंचवीस जवानांना बाजूला घेऊन बाकी सर्वांना शंकरभाऊंनी घरोघर जायला सांगितले. त्यांच्या काठ्या-भाले घेऊन गावाभोवती शिस्तीने गस्त घालायला सांगितले. मागे राहिलेल्या जवानांना गावाच्या कुसबावर चार ठिकाणी टेहेळणी करायला पाठविले. रात्रीचे दोन वाजल्यावर कुत्री भुंकायला लागली, त्यामुळे दरोडेखोरांची येण्याची दिशा समजली. बॅटऱ्यांचा उजेड टाकीत ते आले, तेव्हा सर्वांनी एकदम बसून आडव्या ओळीने पुढे जायचे ठरले. अंतर थोडे उरल्यावर शंकरभाऊंनी उभे राहून, बंदुक खांद्याला लावून 'पुढे याल तर मराल' असा दरोडेखोरांना आवाज दिला आणि दुसऱ्याक्षणी तोंड फिरवून दरोडेखोरांनी धूम ठोकली; पण गावच्या जवानांनी दोघांना पकडून झोडपून काढले. हा काहीसा अवघड प्रसंग. त्यातील धैर्य-शौर्याबद्दल शंकरभाऊंना वाढदिवसाच्या दरबारात महाराजांनी सुवर्णपदक देऊन गौरव केला.

एक शेतकरी बंडू बाखटे याची गाय व शेळी पाटलाने जप्त केली व विकायला बाजाराकडे घेऊन चालला. मामलेदारांकडे चौकशी केली, तर त्याने जमिनीचा सारा भरला नाही म्हणाले. बंडूने शंकरभाऊंना साऱ्याच्या पावत्या दाखवल्या होत्या. शंकरभाऊ समक्ष बंडूला घेऊन जाऊन दोघे चौकशी करू लागले तेव्हा समजले, त्याची जमीन तीन भावांच्यात आहे. बंडूच्या दोघा भावांनी सारा भरला नाही. 'किती सारा द्यायचा राहिला विचारला तर, १५ रु. होता. शंकरभाऊंनी मामलेदारांना १५ रु. दिले व गुरे सोडण्याचा हुकूम त्यांच्याकडून घेतला. पाटील बाजारात पोहाचायच्या आधी त्यांना गाठले व हुकूम दाखवला. तेव्हा बंडूची मुले गायीच्या व शेळीच्या गळ्याला मिठी मारून हसू लागली.

शेजारच्या खेड्यातील तरुण कारखान्यात कामाला लागले होते. त्यामध्ये बरेच हरिजनही होते. एक दिवस कामगारातला पुढारी सांगू लागला, ''हरिजनांना कारखान्यातून काढून टाका. ते देशद्रोही आहेत. आम्ही रोज सकाळी प्रभातफेरी काढतो, तर त्यांना बोलावले तरी ते येत नाहीत. हा देशद्रोह नाही का?'' तेव्हां हरिजनातील एकजण उठून म्हणाला, ''तुम्ही आम्हाला शिवत नाही, दूर ठेवता तर आम्ही फेरीत कसं यायचं?'' शंकरभाऊ म्हणाले, ''तुम्ही आता शिवाशिव सोडून देतो असे सांगता का? स्वत: महात्मा गांधीही अस्पृश्यता मानीत नाहीत. तुम्हाला

माहीत नाही का?'' मंडळी न बोलता निघून गेली.

देवाला म्हणून सोडलेली एक गाय पोट फुगून आजारी पडली. त्या गावच्या सरपंचांना शंकरभाऊ तालुका समितीचे अध्यक्ष झाले हे आवडले नव्हते. म्हणूनच त्यांना अडचणीत पकडण्यासाठी रात्री १० वाजता रामोशाबरोबर शंकरभाऊंना चिठ्ठी पाठवली व त्या गाईबद्दल साऱ्या गावाची पूज्य भावना असल्याने तिला वाचविण्याची व्यवस्था करावी अशी तंबीच दिली. शंकरभाऊंनी थोडा विचार केल्यावर तासगांवला एक गुरांचे डॉक्टर फडणीस म्हणून आहेत असे त्यांना आठवले. लगेच मोटार काढून १५ मैलांवरच्या तासगावला फडणीसांना शंकरभाऊंनी शोधून काढलं आणि त्यांना घेऊन परत त्या गावची वाट धरली. ती आजारी गाय उकिरड्याशेजारी पडली होती. डॉक्टरांनी तिला तपासले. एका बाटलीचे तोंड उघडून गायीच्या तोंडात ती खुपसून औषध पाजले आणि तिच्या पोटाला टर्पेटाईन फासून चोळा असे सांगितले. शंकरभाऊंनी अस्तन्या वर करून जोराने गाईचे पोट चोळणे सुरू केले. तिच्या पोटातील वायू हळूहळू कमी होऊन ती हालचाल करू लागल्यावर, पोटाखाली दोन बांबू घालून तिला उभी केली. नंतर ती अडखळत चालू लागली. तेव्हा सकाळी पाहायला गाव गोळा झाले व शंकरभाऊंच्यावर स्तुतीचा वर्षाव झाला. पण ते म्हणाले, ''खरे धन्यवाद डॉ. फडणीसांना द्या.''

शिरसगाव व सोनकिरे ही कुंडल तालुक्यातील दोन खेडी. एका सकाळी राजेसाहेबांनी शंकरभाऊंना तातडीची तार पाठवून, ''त्या दोन गावांचा बखेडा मिटवावा'' असे कळविले. २-२॥ मैल अंतरावर डोंगरमाळावरच्या सपाटीवरची ही गावे. दोन्ही खेड्यांचा कारभार चांगला चालला होता. केव्हाही गेले तरी मोटार थांबताच रामरामच्या फेरी व्हायच्या. शंकरभाऊ सोनकिऱ्याला पोचले, तर शिवेवर कोणीच नाही. काही मंडळी पुढे आली. त्रस्त चेहरा, कपड्यावर डाग, जखमांच्या खुणा त्यावरून मारामारी झाली असावी असे वाटले, तो एक म्हातारी बाहेर रडत ओरडत येऊन लोटांगण घालीत आली. तिच्या मुलाला शिरसगावच्या लोकांनी बेदम मारले म्हणून ती शिव्याची लाखोली घालत होती.

शंकरभाऊ काय झाले आहे हे समजून घेण्यासाठी जोतिबाच्या देवळात आसन घालून बसले. सरपंच एकदम म्हणाले, ''शिरसगावच्या सगळ्या लोकांवर खटला भरायचा आहे!'' ''अगोदर काय झाले आहे ते तर सांगा'' एक बोलणारे म्हणाले, ''नागपंचमीच्या दिवशी जेवण झाल्यावर दोन्ही गावकरी कुत्री घेऊन शिकारीला जाण्याची प्रथा आहे. शिकार झाली की पुढचे वर्ष गावाला चांगले जाते; पण सारा माळ, डोंगर पालथा घातला तरी त्या दिवशी एकही शिकार मिळाली

नाही. टोळकी परतू लागली. तेवढ्यात एक कोल्हा गोंडेदार शेपटी लोंबवीत तीरासारखा आला. मग सारी कुत्री त्याच्या मागे लागली; पण तो धावत सुटला. माणसं मागे पडली. अखेरीस कुत्र्यांनी कोल्ह्यास लोळविले. शिकार झाली, पण सोनकिऱ्याच्या कुत्र्यानी शिकार केली ती पडली शिरसगावच्या हद्दीत. शिकार कोणाची यावर तोंडातोंडीची मारामारी झाली. पाऊस आला म्हणून पानीपत आटोपलं.'' 'या दुर्घटनेला शिरसगावचे लोक जबाबदार आहेत.' शंकरभाऊ म्हणाले, ''सोनकिऱ्याचे १०-१५ गडी जायबंदी झाल्यावर शिरसगावचे लोक सारे निसटले वाटेत!'' ''आम्ही काय बांगड्या भरल्या नाहीत. त्यांचेबी १०-१५ गडी आम्ही लोळवले.'' ''छान! म्हणजे तुमची फिटंफाट झाली तर!'' सरपंच जरा पुढे येऊन म्हणाले, ''सकाळपासून आपण आला, सूर्य वर आला. दूध-केळी काहीतरी घ्या.''

शंकरभाऊ म्हणाले, ''सारा गाव दुःखी कष्टी. एकमेकांचा जीव घ्यायला निघालेला, माझी अट तुमच्या हिताचीच आहे. महात्मा गांधीच्या आशीर्वादाने औंध संस्थानाला स्वराज्य मिळाले. इंग्रज सरकार चळवळीतील लोकांना तुरुंगात टाकतंय. औंधची प्रजा भराभरा सुधारणा करतीय, सुखी होतीय. आज तर तुम्ही भाऊबंदकी करून एकमेकांवर कुऱ्हाडी चालविल्या, तर राजेसाहेबांना काय वाटेल? या गावाला का त्या गावाला शकुनाची कोल्ह्याची शेपटी, यात शौर्य कसलं आणि शहाणपण तरी काय?'' हळूच मागून शिरसगावची लोकं ऐकत होती.

''तुम्ही दोन्ही पंचांनी समेटाच्या कागदावर सह्या केल्या तर मी तोंडात पाणी घेईन.'' शंकरभाऊ म्हणाले. सह्या करून लोक पाया पडू लागले आणि राजेसाहेबांना बखेडा मिटल्याची तार शंकरभाऊंनी पाठवून दिली.

वरच्यासारखे काही भांडण-तंटे मधून मधून झाले, तरी ग्रामपंचायतीचा उपक्रम ठीक चालत होता. ग्रामराज्य स्वयंशासनाने चालविण्याचे ध्येय समोर ठेवून शंकरभाऊंनी एका वेगळ्या पातळीवरच्या कामाची जबाबदारी घेतली होती. याबद्दल औंधाचे युवराज व ग्रामराज्याचे पंतप्रधान अप्पासाहेब पंत लिहितात, ''औंध संस्थानात ग्रामराज्य करण्याचा विचार पुढे आला, तेव्हा शंकरभाऊंनी त्या विचारांचे नेतृत्व केले. दहा वर्षे ग्रामराज्याचा प्रयोग यशस्वी करण्यासाठी त्यांना तोंड द्यायचे होते, ते खेड्यांतील पाताळयंत्री व जबरदस्त गुंडा-पुंडांना; पण अशाही माणसांना शंकरभाऊंनी सहजलीलेने आपल्या कुशीत घेतले. लोकसंग्रहाची त्यांची जी खुबी होती त्यामुळेच हे शक्य झाले.'' आणि शंकरभाऊ म्हणतात, ''१९३९ ते ४६ ही माझी सहा-सात वर्षे मोठ्या गर्दीत गेली. मला या कामात खऱ्या भारताचे

अगदी जवळून दर्शन झाले. ज्ञानात व अनुभवात त्यामुळे फार मोठी भर पडली. शेकडो ग्रामीण बांधवांचा परिचय घडून मला जीवा-भावाचे मित्र मिळाले.''

ती वेळच मोठी विलक्षण होती. १९३९ मध्ये युरोपखंडामध्ये लोकशाही विरुद्ध हुकुमशाही असे युद्ध सुरू झाले होते. जर्मनीचा हुकुमशहा हिटलर हा शस्त्रशक्तीच्या बळावर युरोपांतील लहान राज्ये एक दोन दिवसांत बळकावू लागला होता आणि त्यानंतर इंग्लंड व फ्रान्स या मोठ्या देशांवरही त्याने बॉम्ब वर्षाव सुरू केला होता. या युद्धासाठी भारताने ब्रिटिशांना मदत करावी अशी अपेक्षा होती; परंतु भारताच्या स्वातंत्र्याचे ठोस आश्वासन द्यावे या काँग्रेसच्या मागणीकडे सतत दुर्लक्ष झाले. तेव्हा ८ ऑगस्ट ४२ रोजी गांधीजींनी 'भारत छोडो' 'Quit India' अशी घोषणा केली. सरकारने एका रात्रीत सर्व पुढाऱ्यांना पकडून तुरुंगात टाकले. 'करा किंवा मरा' असा संदेश लोकांना मिळाल्यामुळे देशभरच्या तरुण मंडळींनी कचेरीवर मोर्चे, रेल्वे अडविणे, खजिन्यावर हल्ले करणे अशा रीतीने आंदोलन सुरू केले आणि फरारी होऊन खेड्यांत लपून राहणे सोईचे झाले. एकीकडे पोलिसपार्ट्या फिरू लागल्या, तर दुसरीकडे दहशतवादी पत्री सरकारच्या कचाट्यांत सापडून खेड्यांची दुर्दशा झाली. शेवटी १९४८ मध्ये औंध संस्थान भारतीय शासनात विलीन होऊन सातारा कलेक्टरनी संस्थानचा ताबा घेतला.

४२ ची चळवळ देशभर पसरली. साऱ्या काँग्रेस पुढाऱ्यांना स्थानबद्ध केल्यामुळे सर्वत्र असंतोषाची लाट पसरली होती. किर्लोस्कर कारखान्यातील कामगारांना या देशव्यापी चळवळीपासून अलिप्त ठेवणे शक्य नव्हते. त्यांनीही तासगावच्या तालुका कचेरीवर मोर्चा नेला.

१६ मार्च १९४३. सकाळी नेहमीप्रमाणे कारखान्यात कामाला सुरुवात झाली तोच शस्त्रधारी पोलिसांनी भरलेले ट्रक किर्लोस्करवाडीत घुसताना दिसले. ट्रक थांबताच त्यातून पोलिस व ऑफिसर भराभर बाहेर आले. त्यांनी वाडीला व कारखान्याला गराडा देऊन सगळीकडे नाकेबंदी केली. सर्वांच्या कंबरेला पिस्तुले लटकलेली. शंकरभाऊ ऑफिसमधून बाहेर आले. तो डी. एस.पी. दिसले, शंकरभाऊंनी पुढे होऊन विचारले, ''तुम्ही हे काय चालवलं आहे?'' एरवी शंकरभाऊंशी मिठ्ठास बोलणारा व कारखान्याची वाखाणणी करणारा येट्स तिरसटपणे म्हणाला, ''ते आम्हाला माहीत आहे, तुम्ही लुडबुड करू नका.'' तरी शंकरभाऊ त्याला म्हणाले, ''तुम्हाला काय हवे ते मला सांगितलेत तर दोघांनाही सोयीचे नाही का होणार?'' ''आम्हाला काही माणसं हवी आहेत, कारखान्याची झडती घ्यायची आहे.'' ''एवढेच ना? खुशाल घ्या झडती!'' ''तुम्ही नावे कळवाल तर मीच त्या माणसांना तुमच्यापुढे उभे करीन.'' ''मग घ्या ही

यादी'' असे म्हणताच शंकरभाऊंनी पाहिले तर ती सर्व नाव मोल्डिग शेडच्या कामगारांची होती, तेव्हा सर्वांनी मोल्डिग शेडकडे मोर्चा वळविला. त्या खात्यात २००-२५० कामगार होते. पोलिसांनी शेडला वेढा घातला; पण शंकरभाऊंनी सर्व कामगारांना एकत्र करून खाली बसवले. कोणी थोडीशीही गडबड केली, तर सर्वांवर भयंकर प्रसंग ओढवेल याची कल्पना दिली. सर्वजण स्वस्थ बसले. ज्याचे नाव पुकारले तो उठून एका बाजूस आला की त्याला पोलिस ताब्यात घेत. कामगारांच्या पेट्या खोलल्या, तर ३-४ काँग्रेस बुलेटीन एक लहान सुरा एवढेच निघाले. मग एक इन्स्पेक्टर दारांतील वाळूच्या पिंपाकडे जाऊन त्यातील वाळू उपसू लागला. मग त्याने त्यातून एक गाठोडे काढले, तेव्हा त्यातून एक गावठी पिस्तुल निघाले. हा कोणाचा तरी चावटपणा असावा हे ओळखूनही समारंभाने त्या पिस्तुलाचा पंचनामा झाला. त्याकडे एक गंमत म्हणूनच सारे पाहत होते.

ते उरकल्यावर लक्ष्मणरावांच्या घराची झडती घेतली आणि फौंड्रीचे मुख्य अधिकारी अंतोबा फळणीकर यांच्या घरात सारे सामान अस्ताव्यस्त करून सोवळ्याच्या लोणच्याच्या बरण्या ओतून घेऊन बंदुकीच्या संगिनीने घराचे आंगण उकरून हाती काहीच न लागल्याने पोलिसांनी काम थांबवले.

शंकरभाऊ घरी गेले तो थोड्यावेळाने फळणीकरांचा मोठा मुलगा बाळकृष्ण त्यांच्याजवळ येऊन म्हणाला, ''सकाळी मी दारात उभा होतो. एक मुलगा सायकलवरून येऊन बरोबर आणलेले पुडके माझ्या हातात देऊन घरात ठेवण्यास सांगू लागला व निघून गेला. मी संशयाने पुडके उघडले तर ते एक गावठी पिस्तुल होते.'' ते घेऊन तो वडिलांच्या ऑफिसात गेला. तेथे ते नव्हते म्हणून शंकरभाऊंच्या ऑफिसात गेला. तिथे शंकरभाऊ नव्हते म्हणून ते पुडके त्यांच्या ड्रॉवरमध्ये ठेवून दिले असे बाळकृष्णाने सांगितले. शंकरभाऊंनी रात्रीच ऑफिसमध्ये जाऊन ड्रॉवर उघडला तर जप्त केलेल्या पिस्तुलासारखेच दुसरे पिस्तुल होते. किर्लोस्कर कारखान्यात बेकायदेशीर पिस्तुले, हत्यारे करतात असे सिद्ध करण्यासाठी रचलेल्या या नाटकाचा प्लॅन लक्षात आला. त्यांनी दुसऱ्या दिवशी पिस्तुलासह औंधास जाऊन राजेसाहेबांना हकीकत सांगितली. पुढे कोर्टात काहीही सिद्ध झाले नाही व येट्स मात्र बडतर्फ झाला.

☆

# दख्खनची दौलत

अशा परिस्थितीत भारतामधून इंग्रजांनी चंबूगबाळे उचलले ते ठीकच झाले; पण ब्रिटिश जाताच त्यांच्या आधारावर ज्यांचे अस्तित्व टिकले होते त्या संस्थानातील कारखानदारांची मोठी विचित्र परिस्थिती झाली. त्यांचा मुख्य आधारच गेला. या संकटाचा विचार करण्यासाठी भोरपासून कोल्हापूरपर्यंतच्या संस्थानातील नातू, दिवेकर, कूपर, मराठे या त्यांच्या उद्योजक मित्रांना शंकरभाऊंनी बुधगावला येण्याचे निमंत्रण दिले; सर्वांच्या ओळखी झाल्या. त्यांच्या अडचणीचे प्रश्न ऐकून घेतल्यावर शंकरभाऊंनी त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी अनेक सूचना केल्या. ''संकट आले म्हणून आपले गाव सोडून दुसरीकडे जाण्याऐवजी, आपल्याजागी पुन्हा पाय रोवून उभे राहण्यासाठी आपली सर्वांची एकजूट झाली पाहिजे. जितके हात एकत्र येतील तेवढा आपला आत्मविश्वास वाढेल. नव्या प्रयत्नांना उभारी येईल.'' असे विचार ऐकल्यावर सर्वांची चर्चा होऊन, शंकरभाऊंना अध्यक्ष करून 'डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन' ही संस्था स्थापन झाली. सांगलीचे आबासाहेब खेबुडकर, कोल्हापूरचे रामभाई सामाणी यांनी सेक्रेटरीचे काम स्वीकारले. आपापल्या गावी जाताना शंकरभाऊंचा उत्साह, आणि उद्योगप्रेम यानेच आत्मोन्नती होईल असा विश्वासही कारखानदारानी बरोबर नेला व संघटनेचे काम चांगले सुरू झाले.

दुर्दैवाने गांधीवधानंतर जाळपोळीत दहा दिवसांत दक्षिणेत कोट्यांवधी रुपयांची मालमत्ता नाश पावली, असंख्य कुटुंबे होरपळून निघाली व महाराष्ट्रातील उद्योगाला फार जोराचा तडाखा बसला. शे-दीडशे जुने वाडे नाहीसे झाले. पंधरा-वीस माणसांची हत्या झाली. चाळीस कारखाने भस्मसात झाले. घरे-छप्परे किती जळाली याचा पत्ता नाही. या स्थितीतून डोके वर काढण्यासाठी 'बचेंगे तो और भी लढेंगे' अशा आत्मविश्वासाने सर्व कारखानदार कामास लागले. शंकरभाऊंचा विचार नेहमी व्यापक असे. पुण्यामध्ये 'केसरींचा', जाहिरात विभाग सांभाळणारे आ. रा. भट यांनी व्यापारी, धंदेवाईक, उद्योजक यांची एक मराठा चेंबर नावाची संघटना असावी, असा विचार पुष्कळ दिवस चालविला होता. शंकरभाऊ त्यांना

भेटायला जात आणि ही संघटना पुणे शहर किंवा जाहिरातीपुरती ठेवू नये असे सांगत. यातूनच मराठा चेंबर ही संघटना सुरु झाली. त्यामुळे डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ही संस्था त्यांनी मराठा चेंबरच्या सभासदांत जोडून घेतली आणि इतरही उद्योजक, व्यापारी अशा संस्थांशी संपर्क जोडण्याचे प्रयत्न करण्याकडे लक्ष वेधले. १९४६ मध्ये शंकरभाऊ मराठा चेंबरचे अध्यक्ष झाले, त्याबद्दल आ. रा. भट सांगतात, ''शंकरराव अध्यक्ष झाल्यापासून गेल्या तीन वर्षात त्यांची धडाडी, कल्पकता, आधुनिक धर्तीवर काम करण्याच्या पद्धतीचा चेंबरला फार उपयोग झाला. पहिल्या धडाक्याला चेंबरच्या इमारतीची योजना झाली. आणखी अभिमानाची गोष्ट म्हणजे बँक ऑफ महाराष्ट्राची स्थापना करून महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांना खेळत्या भांडवलाचा पुरवठा होऊ लागला. आगीचा विमा उतरण्यासाठी कॉमनवेल्थ विमा कंपनीस प्रोत्साहन दिले गेले, मराठा चेंबरला सरकारी मान्यता मिळवून सर्व महत्त्वाच्या संस्थांवर चेंबरच्या प्रतिनिधींना जागा मिळाली.

दिल्लीतील संयुक्त व्यापारी संघाच्या अधिवेशनासाठी शंकरभाऊ मराठी प्रतिनिधींबरोबर गेले होते. अधिवेशनातील भाषणांत ते म्हणाले, ''या निमित्ताने आम्ही महाराष्ट्रातील मंडळी आणि दिल्लीतील मराठी मंडळी यांच्या भेटीगाठी होतात. जुन्या ओळखी दृढ होतात. हिंदी व्यापारी संघाच्या अधिवेशनातून आम्हाला एकप्रकारची स्फूर्ती मिळते, म्हणून आम्ही येथे येतो. आपला प्रांत औद्योगिकदृष्ट्या सुधारला पाहिजे असे वाटते; पण व्यापारी संघाची मंडळी आणि महाराष्ट्रातील मंडळी यामध्ये बरेच अंतर आहे.

महाराष्ट्रात पैशाच्या बळावर कारखानदार झाले नसून, उत्पादनाचे कौशल्य, कसब व कष्टामुळे ते कारखानदार झाले आहेत. हिंदी व्यापारी संघाने वडिलकीच्या नात्याने विचार करावा. व्यापार-उद्योगातील सत्ता थोड्या लोकांच्या हाती असते व सर्व अर्थकारणाचा संबंध प्रधानतः त्यांच्यापाशी पोचतो. फाळणीमुळे आलेल्या बिकट प्रश्नांचा विचार करावा. दक्षिण महाराष्ट्रात गांधीवधानंतर दंगलीमध्ये औद्योगिक साधनसामुग्रीचा नाश झाला आहे. या सर्व अडचणीतून आम्ही मार्ग काढीत असतो. पैसा हा सर्वांना हवा असतो. आपण संक्रमणावस्थेतून जात आहोत. अशावेळी आम्हाला आपल्या मार्गदर्शनाची, सहानुभूतीची व उत्तेजनाची आवश्यकता आहे.'' त्यानंतर मुंबईस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर व गृहमंत्री मोरारजी देसाई यांची भेट घेतली आणि दक्षिणेतील कारखान्यांचा पुन्हा जम बसविण्यासाठी मदतीची गरज निकडीची आहे हे सांगितले, आणि थोड्या दिवसांत प्रत्येक कारखान्यास २५००० रुपये ७ ते १० वर्षे. २॥ टक्के व्याजाने देण्याची

व्यवस्था मान्य झाली.

७ एप्रिलला भारताचे उद्योगमंत्री शामाप्रसाद मुखर्जी यांनी भारत सरकारचे औद्योगिक धोरण जाहीर केले. ते समजताच शंकरभाऊंनी महाराष्ट्रातील १५० कारखानदारांना तातडीची निमंत्रणे पाठवून ९ एप्रिलला परिषद बोलावली आणि स्वागताचे भाषण करतानाच, ''आपण आपले कारखाने चालविण्याचा खटाटोप करीत आहोत; पण खाजगी प्रयत्नावर उद्योगधंदे करणारांना काही अवसर राहणार आहे का? सरकार, कामगार आणि आर्थिक परिस्थिती यांचे प्रश्न एकएकट्याने सुटणारे नाहीत. आपण सर्वांनी काही विचार केला पाहिजे. देशामधील साधनसंपत्तीचा उपयोग देशबांधवांना होण्यासाठी आपल्याला उत्पादन करायचे असतेच. हे उत्पादन ज्या कामगारांच्या साहाय्याने आपण करतो त्यांनी अडेल वृत्ती न ठेवता उत्पादन चांगले, वेळेवर व नियमित केले पाहिजे आणि सरकारी नियमांनी उत्पादनाचा देशबांधवांना उपयोग व्हावा अशी काळजी घेतली पाहिजे. यासाठी सरकार, मालक व कामगार या तिघांनीही एकविचारने काम करायला हवे. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाले म्हणजे केवळ युनियन जॅक काढून तिरंगी झेंडा लावणे नव्हे. उद्योगदृष्ट्या आपण स्वावलंबी व स्वयंपूर्ण व्हायला हवे. या देशात सुबत्ता होऊन लोक सुखी व्हायला पाहिजेत, यासाठी आपण पुढच्या अडचणीतून डोके वर काढून, संघटितपणे नवा हुरूप आणि विश्वास धरून, सर्वांनी कंबर बांधू या. सर्व कारखानदार अशा विश्वासाने प्रभावित होऊन कामास लागले पाहिजेत.''

जानेवारी १९४५ मध्ये किर्लोस्कर मासिकाने २५ वर्षे पूर्ण केली शं. वा. कि. यांचे किर्लोस्कर मासिक जन्माला आले त्या काळी सामाजिक जीवनाप्रमाणे वाङ्मयीन जीवनांतही बालमृत्यूचे प्रमाणे मोठे होते. ''किर्लोस्कर''च्या पूर्वीची ''मनोरंजन'', ''उद्यान'', ''नवयुग'', वगैरे मासिके त्याच्या आगेमागे सुरू झालेली ''अरविंद'', ''रत्नाकर'', ''यशवंत'', इत्यादी मासिके कुणी अल्पकाळ, तर कुणी अधिक काळ चमकून अस्तंगत झाली. अल्प आयुष्य हा कर्तबगार व्यक्तीप्रमाणे प्रभावी नियतकालिकाला मिळालेला फार मोठा शाप होऊ शकतो.

आणि म्हणूनच ''किर्लोस्कर'' मासिकाने चाळीशी गाठली. इतकेच नव्हे तर ती त्याच्या प्रवर्तकाच्या जागरूक नेतृत्वाखालीच गाठली. ही मराठी नियतकालिकांच्या इतिहासांतली एक अत्यंत आनंदप्रद गोष्ट होती. तीन तपांपेक्षा अधिक काळ ''किर्लोस्करा''चा अंतरंग व बहिरंग या दोन्ही दृष्टींनी विकास होत गेला. याला कारण त्याच्यामागे उभे असलेले शंकरावांचे कल्पक, डोळस, बहुरंगी व कर्तृत्वशील व्यक्तिमत्व होय. सौम्य पण तत्त्वनिष्ठ, व्यवहारी परंतु ध्येयवादी,

कलावंत असूनही यंत्रप्रेमी अशा तऱ्हेची त्यांच्या व्यक्तिमत्वाची घडण ''किर्लोस्कर'' च्या विकासाला फार उपयोगी पडली.

१९२० नंतरच्या कालखंडातले, विविध क्षेत्रातले चांगले चांगले लेखक निवडून त्यांच्या साहाय्याने वाङ्मयाच्या अभिवृद्धीला ''किर्लोस्करा''ने हातभार लावला. विविध आणि रंजक मजकूर अत्यंत आकर्षक रीतीने सादर करून ''किर्लोस्कर'' ने वाचकवर्गाचे मर्यादित क्षेत्र विस्तृत करण्याच्या कामी मोठी कामगिरी बजावली आहे. किंबहुना १९२०-१९४७ या कालखंडात महाराष्ट्राला निरनिराळ्या क्षेत्रांत नवजीवनाच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्तीत ''किर्लोस्कर''चे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीला अनेक वर्षे होऊन गेली तरी सामाजिक सुधारणांच्या बाबतीत जडता व उदासीनता आजही जाणवत आहे. किंबहुना हा उदासीनतेचा काळोख दिवसेंदिवस अधिकाधिक दाट होत आहे. या पार्श्वभूमीवर ''किर्लोस्कर'' मासिकाने सर्व प्रकारच्या वैचारिक जागृतीच्या बाबतीत सतत घेतलेला पुढाकार आणि बहुविध सामाजिक सुधारणांचा केलेला पुरस्कार डोळ्यांत भरतो. किंबहुना ''किर्लोस्करा''च्या रुपाने मराठी साहित्यातले पूर्वीच्या दोन पिढ्यांत परिपुष्ट होत आलेले तीन भिन्नभिन्न पण प्रभावी प्रवाह एकरूप झाले असे म्हणायला हरकत नाही. त्यातला पहिला प्रवाह 'निबंधमाला', 'विविध ज्ञानविस्तार', 'लोकशिक्षण' वगैरे गंभीर मासिकांच्या मार्गाने आला होता. ज्ञानप्रसार, लोकजागृति, समाजशिक्षण हे या मासिकांचे मुख्य कार्य होते. समाजाचा संपूर्ण कायापालट व्हायचा असेल तर त्याच्या राजकीय जीवनाइतकीच त्यांच्या सामाजिक, आर्थिक, औद्योगिक आणि सांस्कृतिक स्थितीची, समस्यांची व स्वप्नांची सतत मूलगामी चर्चा होत राहिली पाहिजे ही जाणीव ''किर्लोस्करा''ने पहिल्यापासून एखाद्या नंदादीपाप्रमाणे तेवत ठेवली. मात्र, केवळ मूठभर विद्वान किंवा पसाभर सुशिक्षित यांच्यापलीकडे या लेखांचे आवाहन जर गेले नाही, तर अरण्यांतून वाहणाऱ्या नदीसारखी या लेखनाची स्थिति होईल हे जाणून ''किर्लोस्करा''ने सर्व प्रकारच्या वैचारिक लिखाणाला आकर्षक साज चढविण्याचा कसोशीचा प्रयत्न केला. प्रा. फडक्यांच्या ''तरुण स्त्री-पुरुषांपुढील प्रश्न'' या लेखमालेपासून डॉ. किर्लोस्करांच्या ''तरुण महाराष्ट्रापुढील आर्थिक धोरण'' या लेखमालेपर्यंत ''किर्लोस्करां''तील कोणतेही वैचारिक आवाहन करणारे लिखाण पहावे. त्यात प्रचलित परिस्थितीची मूलगामी जाणीव आणि उज्ज्वल भविष्य घडविण्याची शास्त्रशुद्ध प्रेरणा यांचा संगम आढळून येईल. विचारप्रवर्तनांतून सामाजिक जीवनांचे परिवर्तन हे ''किर्लोस्करां''तल्या अशा प्रकारच्या सर्व लिखाणाचे मुख्य सूत्र होते.

वैचारिक लिखाणाच्या जोडीने ''किर्लोस्करा''ने विविध प्रकारचे ललित लिखाण वाचकांना विपुल प्रमाणात दिले. सर्वसामान्य वाचकांचा ललित वाङ्मयाकडे स्वभावतःच ओढा असतो. पण ''किर्लोस्करा''ने केवळ वाचकवर्गाचे रंजन करून त्याला आपल्याकडे आकृष्ट करून घ्यायचे एवढ्या एकाच हेतूने ललित वाङ्मयाचा आदर केला नाही. हे वाङ्मय चांगल्या लेखकांनी लिहिलेले असावे आणि त्याच्यांत कलात्मक गुण असावेत ही दक्षता त्याने घेतलीच. पण त्याचबरोबर ललित वाङ्मय हे लोकजागृतीचे उत्तम साधन होऊ शकते, ललित वाङ्मय.हा एक बाजूने जसा कुंचला आहे तसे दुसऱ्या बाजूने ते शस्त्र आहे, ही जाणीव अखंड कायम ठेवून त्याचा ''किर्लोस्करा''ने कुशलतेने उपयोग केला. १९२०-४७ या कालखंडात ''किर्लोस्करां''त प्रसिद्ध झालेल्या कथा-कादंबऱ्यांवरून हे सहज दिसून येईल.

ताम्हनकरांचा ''दाजी'' हे या जाणिवेचे एक ठळक उदाहरण आहे.

गंभीर व ललित अशा दोन्ही प्रकारच्या नियतकालिकांचा ''किर्लोस्करां''ने नव्या काळाला अनुरूप असा संगम घडवून आणला. त्यामुळे शहरांतल्या सुशिक्षितांपासून खेड्यांतल्या साक्षरांपर्यंत सर्व प्रकारचा वाचकवर्ग त्याच्या कक्षेत आला. साहजिकच लोकरंजनाचे आणि लोकशिक्षणाचे फार मोठे काम ''किर्लोस्कर''ने १९२० नंतरच्या काळांत केले. सर्वसामान्य मासिकांत न आढळणारा एक प्रकारचा जोम, एक प्रकारच्या बंडखोरीचा जोष त्याच्यामध्ये पहिल्यापासूनच होता. ओसाड माळरानावर उद्योगनगरी निर्माण करणाऱ्या लक्ष्मणराव किर्लोस्करांच्या ठिकाणी जी नवी दुर्दम्य प्रेरणा धगधगत होती, तीच किर्लोस्कर मासिकाच्या मागेही उभी होती. लोकरंजन आणि लोकशिक्षण या गोष्टी चांगल्या हे तर खरेच! पण तेवढ्या वरच या मासिकाच्या संस्थापकांचे समाधान होण्याजोगे नव्हते. आपल्या समाजाची स्थिती माळरानासारखीच आहे, तिथे धर्मभोळेपणाचा निवडुंग जिकडेतिकडे माजला आहे आणि रुढींची काटेरी झाडे सर्वत्र पसरली आहेत, ही जाणीव ''किर्लोस्करा''ला जन्मतःच होती. त्या माळरानाचे स्वरुप संपूर्णतः बदलून तिथे सुख, स्वास्थ्य आणि समत्ता यांची बाग उठवायची, तर त्याकरिता तिथली सारी काटेरी झाडे तोडली पाहिजेत, झाडून साऱ्या निवडुंगाचा नायनाट केला पाहिजे, प्रसंगी त्यातून फुसफुसत बाहेर येणाऱ्या सापांना ठेचून टाकले पाहिजे, हे उघड होते. पूर्वी हे कार्य आगरकरांच्या ''सुधारका''ने अविचल निष्ठेने आणि प्रभावी लेखणीने केले होते. पण आगरकरांच्या मृत्यूनंतरच्या पाव शतकांत ती परंपरा खंडित झाली होती. १९२० नंतरच्या दोन तपांत ''किर्लोस्करा''ने ते काम मोठ्या हिरीरीने केले.

बुवाबाजीविरूद्ध ''किर्लोस्करा''ने उचललेले हत्यार व ''अभिसार'' या कथेच्या निमित्ताने झालेले वादळ आणि त्या वादळाला तोंड देतांना ''किर्लोस्करा''ने घेतलेली भूमिका यांची चांगली आठवण अजूनही तत्कालीन वाचकांना असेल केवळ सामाजिक सुधारणेला वाहिलेले होते असे नाही. त्यात सुधारणांचा जो पुरस्कार केला जाई त्याचे स्वरुप मोठे जहाल होते असेही नाही. असे असूनही ''किर्लोस्कर'' मासिकाविरुद्ध सनातनी मंडळींनी जेवढा गिल्ला करायचा तेवढा केलाच याबाबतीत शंकररावांनी आपली भूमिका पुढील शब्दात स्पष्ट केली आहे. ''मी ज्या विचारांचा पुरस्कार करतो, ते उगीच कुणाच्या खोड्या अगर कुचाळक्या करण्यासाठी मुळीच नाही, नव्या कल्पनांना प्रथम लोकांचा विरोध व्हायचाच. आम्ही लोखंडी नांगर केले, त्यालासुद्धा सुरवातीला विरोध झालाच ना? किर्लोस्करवाडीतून अस्पृश्यतेचं उच्चाटन केलं ही तरी जुन्या माणसांना आवडणारी गोष्ट थोडीच होती? म्हणून ही सुधारणा आपण थांबवायची की काय? शिवाय ज्या सुधारणा नव्या वाटतात, त्या दोन दिवसांनी अंगवळणी पडल्या म्हणजे त्याचा कोणीसुद्धा विचार करीत नाही.''

''किर्लोस्कर'' मासिकाने घेतलेली ही सुधारकाची भूमिका कोणत्याही दृष्टीने आत्यंतिक स्वरुपाची नव्हती हे यावरून सहज दिसून येईल. प्रत्येक आठवड्याला जीर्ण धार्मिक आणि सामाजिक मतांवर घणाचे घाव घालणारे आगरकर १८९०-९५ च्या काळांत सनातनी समाजांत अप्रिय झाले याचे कारण आपल्याला सहज कळू शकते. पण त्यानंतर तीन तपांनी ''किर्लोस्करां''ने बुवाबाजी, क्षेत्रबाजी, जातीयवाद, स्त्रियांचे दास्य, दैनंदिन जीवनांतील विसाव्या शतकाला न शोभणारा धर्मभोळेपणा, निराधार विज्ञान-विन्मुखता आणि उथळ तंत्रविरोध यांच्याविरुध्द हत्यार उगारतांच ती आगरकरांची पांचबारी बंदूक नव्हती, साधे पिस्तुल होते तोच विरोध त्याच्या वाट्याला आला! याचे मुख्य कारण एकच आहे. या मधल्या दीर्घ कालांतसुद्धा समाजाचे मन विचारप्रवण झाले नव्हते. काळाच्या ओघांत वाहत जातजात त्याने काही सुधारणांचा स्वीकार केला होता. पण जाणूनबुजून, बुद्धीच्या कसोटीवर घासून आणि भावनेच्या रेशमी वस्त्राने पुसून, नको ते जुने टाकायला व हवे ते नवे घ्यायला जी विवेकनिष्ठा लागते, जो सामाजिक आत्मविश्वास हवा असतो, समाजाच्या सर्वांगीण प्रगतीची सोनेरी स्वप्ने पाहण्याची जी शक्ति सामान्य मनुष्याच्या अंगी यावी लागते, तिला आपला समाज शतकानुशतक मुकला होता.

आपले हे जड सामाजिक मन आणि अत्यंत मंदगति झालेले समाजजीवन लक्षांत घेता, ''किर्लोस्करा''ने सुधारणेचे निशाण हाती घेऊन जे कार्य केले ते मोलाचे होते.

हे कार्य करतांना ''किर्लोस्करा''ची भूमिका केवळ प्रचाराची नव्हती, ती मुख्यत: संस्कारांची होती. तात्विक खंडनमंडनात त्याने स्वत:ला कधीही फारसे गुरफटून घेतले नाही. कारण दैनंदिन जीवन हीच सर्व प्रकारच्या सामाजिक सुधारणेची खरी कसोटी आहे, याची त्याला पूर्ण जाणीव होती. प्रामाणिक मूर्तिपूजक असला हा अंतरंगात मूर्तिपूजक असला पाहिजे. केवळ मूर्तिभंगाच्या क्षणिक आसुरी सुखासाठी तो मूर्तिभंजक होत नाही. सत्याचा तर ''किर्लोस्करा''ला कधीच विसर पडला नाही! त्यामुळे एका बाजूने जीर्ण रुढींवर आणि तत्वशून्य झालेल्या संकेतांवर प्रहार करीत असतांना दुसऱ्या बाजूने नव्या जीवनाची स्वप्ने साकार करण्याचा त्याने मन:पूर्वक प्रयत्न केला. सावरकरांचे किर्लोस्कर मासिकांतील लेखन हे या प्रवृत्तींचे सर्वोत्तम उदाहरण आहे.

''किर्लोस्करा''ची सामाजिक सुधारणेची कल्पनाही मोठी व्यापक होती. जीवन हे अनेकांगी आहे, त्यातल्या कोणत्याही अंगाच्या विकासाची उपेक्षा करणे हे अंती समाजाला घातक ठरते, हे लक्षांत घेऊन व्यक्तिजीवन आणि सामाजिक जीवन यांच्या सर्व पैलूंचा परामर्श घेण्याची प्रथा ''किर्लोस्करा''ने सुरू केली व ती अखंड पाळली. राजकीय सुधारणा, औद्योगिक प्रगति, शैक्षणिक सुधारणा, ग्रामीण जीवनाची पुनर्घटना इत्यादि विषयांचा ''किर्लोस्करा''ने सतत जिव्हाळ्याने विचार केला. याचे कारण ''किर्लोस्करा''च्या मागे उभ्या असलेल्या शंकररावांनी यंत्रयुगाच्या कर्तृत्वाची व सामाजिक सुधारणेची विशाल क्षितिजे एकाचवेळी पाहिली, हेच होय.

नव्या सामाजिक कल्पनांचा आमि जीवनपोषक विचारांचा प्रसार करतांना ''किर्लोस्करा''ने नाना प्रकारच्या रंजक माध्यमांचा आश्रय केला. व्यंगचित्रांपासून प्रवासवर्णनांपर्यंत आणि स्वदेशांतील नामांकित व्यक्तींच्या मुलाखतींपासून परदेशांतील घडामोडींच्या वृत्तांतापर्यंत निरनिराळ्या साधनांनी वाचकांचे रंजन करतांकरतां त्यांचे उद्बोधन करण्याची कला ''किर्लोस्करा''ला साधली याचे कारण त्याच्या मागे असलेली प्रेरक शक्ति ज्याचे सामाजिक मन पूर्णपणे जागृत झाले होते, अशा एका कलावंताची होती, हे होय.

हा कलावंत जसा विविध चित्रे काढण्यांत कुशल होता, तसा दारिद्र्य, अज्ञान आणि धर्मभेळेपणा यांनी ग्रासलेला आपला समाज सुखी, समर्थ आणि संपन्न कसा होईल याची भविष्य काळांतील चित्रे आपल्या मन:चक्षूंपुढे उभी करण्यांतही निपुण होता. कारखान्यातला लोखंडाचा लाल प्रवाही रस पाहतांना जिथे लोखंडासारखी वस्तू विशिष्ट आचीने वितळवितां येते, तिथे समाजांत दृढमूल झालेल्या अपायकारक कल्पनांचे निर्मूलन नव्या विचारांच्या आचीने का करता येऊ नये ही

कल्पना या कलावंताला सुचणे स्वाभाविकच होते. त्या कल्पनेचा शंकररावांनी सतत पाठपुरावा केला आणि बुद्धिवादाच्या बैठकीवरून जीवनाच्या सर्व अंगाचा विचार करण्याची शिकवण महाराष्ट्रांतल्या अगदी सामान्य माणसापर्यंत नेऊन पोचविली. विज्ञानयुगाकडे पाठ फिरवून बसलेल्या आणि अनेक नव्याजुन्या चुकीच्या पण दृढमूल ग्रहांमुळे यंत्रयुगाचे स्वागत करण्याला नाखूष असलेल्या समाजाला त्यांनी विज्ञानसन्मुख केले. शंकरभाऊंनी मासिकाचे संपादकपद सोडले. तेव्हा **वि. स. खांडेकर** यांनी 'संपादन! छे! नांगरणी! पेरणी!' हा लेख ३००व्या अंकात दिला. या ३०० व्या अंकाला आलेली अभिनंदनाची पत्रे प्रातिनिधिक मते व्यक्त करणारी आहेत. **विठोबा मांगाजी खोले,** झडशी (वर्धा) लिहितात- 'उद्यम, साहस व उत्कर्ष या शब्दांनी मी मासिकाकडे आकर्षित झालो. केवळ करमणुकीसाठी नव्हे तर मला खरा मित्र लाभला तो किर्लोस्कर मासिक. त्याने दिलेली दृष्टी स्वीकारून मी प्रेमविवाह केला.' दिल्लीच्या एक वाचक उषा जुमडे लिहितात- 'किर्लोस्कर मासिक हा माझा मार्गदर्शक बंधू आहे. त्याने घरच्या चार भिंतीत गुंतलेल्या माझ्यापुढे साऱ्या जगाचे कपाट मोकळे केले.' प्रसिद्ध विनोदी लेखक **चिं. वि. जोशी** लिहितात- ''वैचारिक क्रांतीस हातभार लावणे हे नियतकालिकांचे मुख्य कर्तव्य किर्लोस्करने उत्तम प्रकारे केले आहे. मराठी मासिकांचा एकांगीपणा किर्लोस्करने घालवला. **बॅ. वि. दा. सावरकर** म्हणतात- 'किर्लोस्कर हे केवळ महाराष्ट्रातील नव्हे, तर भारतातील अव्वल दर्जाचे मासिक झाले आहे, ते तुम्हा सर्व सहकाऱ्यांच्या दीर्घ परिश्रमाने.' कोल्हापूरचे चित्रकार व जहाल पुढारी **माधवराव बागल** लिहितात- 'माझे विचार जनतेपुढे मांडण्याचे मोठे साधन मला किर्लोस्करामुळे मिळाले.' **सत्यशोधक भास्करराव जाधव** लिहितात-''लोकांना अप्रिय, परंतु परिणामी हितकर असे वाङ्मय पुरविण्याचे व्रत पावशतक तुम्ही चालविले आहे व चिकाटीने आपला वाचकवर्ग निर्माण केला आहे.'' विदर्भाचे लोकनायक **मा. श्री. अणे** लिहितात- ''अंधश्रद्धेने गारठलेल्या महाराष्ट्रीय बुद्धीत नवीन उष्मा उत्पन्न होत असल्याचा प्रत्यय नवीन पिढीच्या लेखन-भाषणातून येतो. याचे श्रेय किर्लोस्कर मासिकाचेच आहे. समाजवादी पक्षाचे **युसुफ मेहेरअली** आणि कम्युनिस्ट पक्षाचे **पी. सी. जोशी** यासारख्या परभाषी मंडळीनीही किर्लोस्करच्या कामगिरीबद्दल कृतज्ञता पूर्वक धन्यवाद दिले ही विशेष गोष्ट आहे.

वाचक आणि जनतेच्या समाधानाची ही पत्रे पाहात असतानाच शंकरभाऊ कारखान्याचे जनरल मॅनेजर झाल्याची बातमी आली. किर्लोस्कर प्रेस व मासिकाचे काम मुकुंदराव तीन वर्षे सांभाळत होतेच; पण कारखान्याचा मुख्य अधिकारी

म्हणून सर्व सूत्रे हाती आल्यावर इतरांशी निकट संबंध राखता येणे कठीण झाले. कुठलेही काम असले तरी ते चार माणसांना बरोबर घेऊन खेळाडू वृत्तीने पार पाडायची शंकरभाऊंची पद्धत होती.

एक दिवस मोल्डिंग शेडचे कामगार संप करणार आहेत अशी बातमी आली. असा प्रसंग पूर्वी कधीही आला नव्हता. प्रमुखांची सभा झाली. लक्ष्मणराव, शंतनुराव, शंभो अण्णा, गुर्जर, रेगे या सर्वांनी ती जबाबदारी शंकरभाऊंच्यावर सोपवली. ती स्वीकारताना शंकरभाऊ म्हणाले, ''मी जी तोड काढीन त्याला कोणी हरकत घेता कामा नये.''

गणपती गेटाबाहेर दोनशे कामगार ठाण मांडून बसले होते. शंकरभाऊ एकटेच त्यांच्याकडे गेले. त्यांनी विचारले, ''इथे काय करता आहाता तुम्ही? कारखान्यात चला आणि काय सांगायचे ते सांगा. सारं म्हणणं ऐकल्यावर आम्ही त्याचा सहानुभूतीने विचार करू. आमचा निकाल तुम्हाला नापसंत पडला, तर तुमचा संप खुशाल चालू दे.''

सर्व कामगार गेटातून आत आले. त्यांच्या पुढाऱ्यांची भाषणे झाली. त्यांचा तक्रारीचा निर्णय तिथेच लावण्यास अडचण पडली नाही. कामगारांनी टाळ्या वाजवून निर्णयाचे स्वागत केले. संप मिटला. आजचा दिवस वाया जाणार असे वाटले; पण कामगारांचा उत्साह और. त्यांनी राक्षसासारखे काम करून रोजच्याइतकीच कास्टिंग्ज काढली व दिवस कारणी लावला.

तथापि एकतंत्री कारखाना चालविण्याचे दिवस संपले आहेत, कामगारांच्या सुखसोयी, वेतन, पगारवाढ, प्रॉव्हिडंड फंड या किर्लोस्कर कारखान्यातील व्यवस्था तेव्हा क्वचितच कोठे असतील. तरीही कामगारांत वर्गभावना जागृत झाल्यावर त्यातून होणारा बंडखोरपणा दाबून टाकणे शक्य नव्हते. बदललेला काळ ओळखून बेबनावाचे प्रश्न (वरचेवर निघू नयेत, यासाठी कामगार कौन्सिलची योजना शंकरभाऊंनी पुढे ठेवली. कामगार प्रतिनिधी आणि चालकांचे प्रतिनिधी निवडून कौन्सिल बनवावे. महिन्यातून एकवेळ एकत्र बसून आलेले प्रश्न बैठकीत सोडवावे असे ठरले; पण कामगार- विषयक कायदा आल्यानंतर हे सलोख्याचे वातावरण राहिले नाही. युनियन निघाली. त्यांच्याकडून आलेल्या पहिल्या पत्रात ते लिहितात, ''औंध संस्थानात ट्रेड युनियन कायदा नव्हता. तरी आपण कृपावंत होऊन कामगारांचे हितसंबंध वाढविण्यासाठी व त्यांचे प्रश्न समजुतीने व सहकार्याने सोडविण्यासाठी जी कामगार कौन्सिल स्थापन केली, त्याबद्दल आम्ही मनापासून आभारी आहोत. आपल्या उदार व समंजस धोरणामुळे कौन्सिलला बरेच चांगले कार्य करता आले.'' हे उदाहरण अपूर्व म्हणावे लागेल.

कारखान्यात कामगार कौन्सिल बरखास्त होताच संघर्षाचे दिवस आले. युनियनने संपाची नोटीस दिली. आप्पासाहेब पंतांनी मधे पडून लवाद नेमण्यास मान्यता दिली. लवादानी सुचविलेली पगारवाढीची पद्धत मान्य झाली; परंतु असंतोष कमी होईना.

गांधीवधानंतर दक्षिणेतील कारखाने आणि उद्योगधंद्याच्या जाळपोळीने फार मोठा धक्का बसला; पण त्यामधून डोके वर काढून पुन्हा उद्योग उभारण्याची ईर्षा त्या मंडळीत निर्माण व्हावी म्हणून शंकरभाऊंचे सतत प्रयत्न असत. उद्योग सुरू करायचा म्हणजे पहिला प्रश्न वीज मिळण्याचा असायचा. योग असा, की किर्लोस्कर मासिकाच्या १९४७च्या दिवाळी अंकामध्ये 'कोयनेची देणगी' हा माहितीपूर्ण व त्या विषयातील तज्ज्ञ व्यक्तींनी दिलेल्या आश्वासनाचा लेख प्रसिद्ध झाला. कऱ्हाडजवळ कृष्णा व कोयना यांचा संगम होतो खरा. परंतु तत्पूर्वी सह्याद्रीत उगम पावलेली दक्षिण वाहिनी कोयना हेळवाकजवळ पूर्ववाहिनी होते. सबब हेळवाक हे ठिकाण कोयनेला धरण घालण्यास योग्य आहे असे २५ वर्षांपूर्वी टाटांच्या लोकांनी नमूद केले होते; पण त्यावेळी ते शक्य झाले नाही. शंकरभाऊ दक्षिणी कारखानदार संघाच्या मंडळींना हेळवाकला घेऊन गेले आणि तेथील अनुभवी इंजिनीअर श्री. मनोळीकर यांनी तक्ते, नकाशे यांच्या साह्याने सर्व माहिती सांगून महाराष्ट्रात किती लांबपर्यंत वीजपुरवठा होईल याची खात्री करून दिली. वीज पुरवठ्याची खात्री पटताच सभासद अतिशय उत्साहाने विविध उत्पादनांची निर्मिती करू लागले आणि त्यांच्या उत्पादनांचे ''दखखनची दौलत' या नावाने भव्य प्रदर्शन सर्वांच्या प्रयत्नाने कोल्हापूर येथील खास बाग मैदानावर उभे केले. आत्मारामपंत ओगले या नावाचे कोल्हापूरच्या कलादृष्टीला साजेलसे भव्य प्रवेशद्वार आणि त्याच्या जवळच असलेला औद्योगिक महाराष्ट्राचा उठावदार नकाशाही सर्वांचे लक्ष वेधत होते. त्यातील ७५ स्टॉल्स दक्षिणेतील कारखान्यांचेच होते. याच सुमारास शंकरभाऊंनी महाराष्ट्रातील औद्योगिक क्रांती ही पुस्तिका प्रसिद्ध केली. त्यातील काही मजकूर पुढे देत आहोत.

बाबुराव पेंटर यांनी महात्मा गांधी यांचा २५ फूट उंच पुतळा केला होता. महाराष्ट्राचे राजकीय पुढारी, तसेच डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील लहान-मोठे उद्योजक एकत्र आले होते. त्यांच्यात खेळीमेळीचे संबंध-सर्व भेदभाव विसरून-निर्माण झाले होते. एक लाखापेक्षा जास्त मंडळी प्रदर्शन पाहून गेली.

"१९५० मध्ये प्रदर्शन ज्यासाठी भरवले तो उद्योजकांचा आत्मविश्वास वाढवण्याचा प्रयत्न सफल झाला; पण आता कोयना धरणाची योजना यशस्वी

होईल तरच स्वस्त विजेचा पुरवठा कसा होईल, ही काळजी निर्माण झाली होती. त्यासाठी कोयना योजनेवर महाराष्ट्रांतील सर्व वर्तमानपत्रांतून लेख प्रसिद्ध केले. तेव्हा दक्षिण महाराष्ट्र संघाने पुढाकार घेऊन १६ मार्च १९५२ रोजी हेळंवाक येथे कोयना परिषद घेतली. या आडवळणी ठिकाणी परिषदेला सहाशेच्यावर प्रतिनिधी आले. प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय माणसांची खात्री पटत नाही. भाऊसाहेब हिरे, आचार्य अत्रे, पां. वा. गाडगीळ, आण्णासाहेब खाडिलकर, वसंतराव पाटील, ना. ग. गोरे, इंदिराबाई मायदेव, मामा दाते, भाऊराव पाटील, मीनाक्षी साने, यमूताई किर्लोस्कर, शंकरराव ओगले अशी समाजजागृत मंडळी तेथे आली होती. आचार्य अत्रे म्हणाले, ''आजच्या परिषदेइतकी उपयुक्त परिषद महाराष्ट्रात कधी भरलीच नव्हती. मी कोयनेचे, तिच्या तीरावरील डोंगरांचे चित्र पाहिले आणि मनोळीकरांनी तर माझ्यापुढे धरणाचे चित्र मूर्तिमंत उभे केले.'' ''लक्षावधी लोकांना पाणी मिळेल, प्रकाश मिळेल, व्यवसाय मिळेल अशी ही अलौकिक योजना आहे.'' असे उपमुख्यमंत्री भाऊसाहेब हिरे यांनी सांगितले. त्या काळात मुंबईत द्वैभाषिक राज्य होते. राष्ट्रपती भवनांत प्लॅनिंग कमिशनपुढे कोयनेची बाजू मांडण्याचे काम डॉ. धनंजय राव गाडगिळांनी उत्तम रितीने केले. कोयना योजना मान्य होऊन महाराष्ट्राचे उदिष्ट तडीस गेले. पुढे नोव्हेंबर महिन्यात मुंबईत मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्या हस्ते कोयना धरणाचा पाया घातला गेला. डेक्कन मॅन्यु. असोसिएशनच्या निरनिराळ्या ठिकाणी सभा होत. अनेक लहान-मोठ्या योजना विकासास मदत करण्यासाठी असत. पुणे, मिरज, कोल्हापूर रेल्वेमार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करता आले, त्यामुळे कच्च्या मालाची चढउतार टाळता आली.

औद्योगिक विकासाकडे जसे शंकरभाऊंचे लक्ष असे तसेच आपल्या परिसरातील माणसांच्या जीवनात सदैव उत्साही व चैतन्यशील वातावरण करणे त्यांना छान जमत असे.

आपल्या परिसरातून टेरीटोरिअल आर्मीसाठी रिक्रुट मिळवून देताना शंकरभाऊ नागरिकांना लुटुपुटुची लढाई कशी होते याचं स्वरूप दाखवीत. विविध कलावंत, गायक, वादक, नकलाकार यांचा आदरपूर्वक सन्मान करून, त्यांच्या कलेचा आनंद वाडीतील लोकांना मिळवून देत.

किर्लोस्कर प्रेस १९५९ साली पुण्यात आला. त्यानंतर 'स्त्री'च्या ४०० व्या अंकाचं प्रकाशन त्यांनी केले. 'सकाळ'च्या नानासाहेब परुळेकरांनी 'सकाळ'च्या रौप्यमहोत्सवामध्ये शंकरभाऊंचा 'सन्मान्य संपादक' म्हणून जाहीर सत्कार केला.

लक्ष्मणराव (काका) बेंगलोर येथे मुलाकडे गेलेले आणि किर्लोस्करांचे नवे

कारखाने पुणे-हरिहर, बेंगलोर अशा गावांतून विस्तारित झालेले. त्यामुळे किर्लोस्कर वाडीत शंकरभाऊ व अनंतराव असे दोघेच ज्येष्ठ अधिकारी राहिले. १६ डिसेंबर ४४ ला युनियनने संपाची नोटीस दिली. दादासाहेब मावळंकरांसारखे लवाद मिळून युनियनने तीन वर्ष नवी मागणी करता कामा नये हे मान्य केले.

१९४५ मध्ये पुन्हा युनियनने संप पुकारला. कारखान्याची घरघर थांबली. रस्त्यावरील नागरिकांची ये-जा मंदावली; पण कारखान्याचे रोज येणारे टपाल पाहणे, त्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक होते. मुख्यत: रेल्वे वॅगनमधून रोज येणारा कोळसा, लोखंड वगैरे जड माल उतरवून घ्यावा लागे. त्यासाठी संपात सामील न झालेले ऑफिसर्स, इंजिनिअर्स, कारकून अशा शंभर लोकांनी पुढे होऊन ही कामे निभावली.

८ दिवसांनी वाडीमधील घरांना खेड्यातून येणारे दूध, भाजीपालाही बंद झाला. शंकरभाऊंनी शंकरराव देव यांना परिस्थितीची कल्पना दिली व कामगार नेते र. के. खाडिलकर यांनी वाडीला येऊन सारे अत्याचार पाहिल्यावर ही कामगार चळवळीची तऱ्हा योग्य नाही हे सांगून वाडीबाहेरच्या मळ्यात कामगारांची सभा बोलावली व संप मागे घेण्याचा आदेश दिला.

पण १ ऑगस्ट ४९ला दुपारचे काम सुरू झाल्यावर दोन तास झाले नाहीत तो मशिन शॉपची यंत्रे थांबली. शंकरभाऊंनी तेथे जाऊन पाहिले तो इंजिनीयर एन. के. जोशी यांना तिथल्या १५० कामगारांनी वेढा घातला होता व बेभान होऊन ते ओरडत आणि दंगा करीत होते. शंकरभाऊ रेटारेटीत जोशी यांच्या जवळ जाऊन उभे राहिले आणि 'कामगारांनी बाहेर पडून काय म्हणणे आहे ते सांगावे, ते मी ऐकून घ्यायला तयार आहे' असे सांगितले. मग गर्दी हटून जोशींची सुटका झाली.

पण वातावरण शांत होण्याचे चिन्ह नव्हते. सर्वत्र अत्याचाराची वृत्ती बोकाळत होती.

या साऱ्या धकाधकीतही शंकरभाऊ स्थिरचित्त असत. ते म्हणतात ''मला राग येत नाही कारण, राग येणे म्हणजे दुसऱ्याच्या चुकीबद्दल आपल्याला शिक्षा करून घेणे असते.'' या विवेकी वृत्तीमुळेच अशा कटकटीच्या काळातही त्यांची विधायक कामे होत असत. उदाहरणार्थ विक्रत्यांचे संमेलन घेणे, ४२ च्या लढ्यात जीवदान केलेल्या आपल्या दोन सहकाऱ्यांच्या नावे कीर्तीस्तंभ उभा करणे. उपराष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् दक्षिणेकडील दौरा करून परत जात असल्याचे कळताच किर्लोस्करवाडीच्या स्टेशनावर गाडी थांबवून, कारखान्यातर्फे त्यांचा सत्कार करून त्यांचा संदेश मिळविणे इ. 'स्त्री' मासिकाला २५ वर्षे झाल्यामुळे रौप्यमहोत्सवासाठी सर्व लेखिकाचे संमेलन १७ सप्टेंबर १९५५ ला किर्लोस्करवाडी

येथे मोठ्या उत्साहाने साजरे झाले. मालतीबाई बेडेकर या प्रारंभापासूनच्या प्रतिभावंत लेखिका अध्यक्ष होत्या.

आपले काका लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी १९१० मध्ये किर्लोस्कर कारखाना महाराष्ट्रात काढला. त्यामुळे 'महाराष्ट्राचे हेन्री फोर्ड' असे लोक त्यांना म्हणू लागले. याचा शंकरभाऊंना फार अभिमान वाटे. आपल्या आयुष्यातील अनेक अडचणी ओलांडत, कारखाने उभारीत राहण्याचे जे महान कार्य त्यांनी केले त्याबद्दल वाटणारी कृतज्ञता म्हणून शंकरभाऊंनी त्यांचे जीवनचरित्र-२ वर्षे सतत वेळ काढून- 'यांत्रिकाची यात्रा' या नावाने लिहून पूर्ण केले. हे फार मोठे काम झाले. शंकरभाऊंनी नंतर कारखान्यातून निवृत्त होण्याचे ठरविले.

दिवाळीच्या आधीच्या आठवड्यात ३ नोव्हेंबर १९५८ या दिवशी हा निरोपाचा कार्यक्रम झाला. कारखान्याचे कामगार, वाडीचे नागरिक व पंचक्रोशीतील ग्रामीण जनता त्यांना प्रेमपूर्वक निरोप देणार होती, त्याचे शंकरभाऊंना अगत्य वाटत होते.

## त्यावेळी कारखान्याच्या कामगारांनी दिलेले मानपत्र

प्रिय शंकरभाऊ,

आमच्या किर्लोस्कर कारखान्याची सूत्रे खाली ठेवून आपण आता सेवा निवृत्त होत आहात. या प्रसंगी आम्हा सर्व कामगारांची अंत:करणे जड झाली आहेत. कारखान्याची नौका यशस्वी रीतीने हाकारून, आपले काका श्री लक्ष्मणराव किर्लोस्कर यांची परंपरा अधिक उज्ज्वल करून, कृतार्थ होऊन आपण जात आहात.

आपल्या कारखान्याची जी अनेक वैशिष्ट्ये आहेत त्यात कामगार आणि चालक यांचा सलोखा हे एक स्पृहणीय वैशिष्ट्य आहे. हा सलोखा प्रस्थापित करून तो वाढीला लावण्यात आपला वाटा फार मोटा आहे. आम्ही त्याबद्दल आपले सदैव ऋणी राहू.

किर्लोस्कर कारखान्याच्या आर्थिक व औद्योगिक बाजूला मासिकांच्या उपक्रमाने सांस्कृतिक बाजूची जोड देऊन, आपण एक वैशिष्ट्यपूर्ण कारखानदार असा नावलौकिक मिळविला. किर्लोस्करवाडीतील अनेक सामाजिक संस्था आणि सार्वजनिक उपक्रम यांच्या मुळाशी आपलीच प्रेरणा आहे.

साऱ्या महाराष्ट्राचे, विशेषत: कृष्णा-कोयनेच्या सान्निध्याने पूनीत झालेल्या दक्षिण महाराष्ट्राचे, झपाट्याने औद्योगिकरण व्हावे यासाठी आपण डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ही संस्था स्थापन करून या भागातील कारखानदारांना मार्गदर्शन केले. 'कोयना परिषद' भरवून ही योजना चालू करण्याच्या कामी आपण

जोराचा पुढाकार घेतला. पुण्याच्या मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्षपदही भूषविले. औंध संस्थानच्या लोकहितांच्या योजनाना आपण प्रत्यक्ष हातभार लावला असून त्या संस्थानचे दिवाणपदही आपण भूषविले होते.

आपले वक्तृत्व, लेखन, चित्रकला, क्रिकेटचा खेळ, शिकारीचा नाद, अभिनयाची आवड, संगीताची अभिरुची आणि कोणत्याही बिकट प्रसंगी शांतपणाने पुढे येऊन कौशल्याने त्यातून मार्ग काढण्याचे आपले कसब, यासारखे आपल्या व्यक्तिमत्वाचे अष्टपैलू जनतेला उद्बोधक व कारखान्याच्या वाढीला अत्यंत उपकारक झाले आहेत.

आपण सर्वोच्च अधिकारी असला तरी आपल्यात आणि कामगारात कोणत्याही प्रकारचा दुरावा किंवा अंतर कधीच निर्माण झाले नाही. आपण नेहमीच 'शंकरभाऊ' 'शंकरअण्णा' राहिला आणि खरोखरच आमचे थोरले भाऊ झालात. आजपर्यंत आम्हा कामगारांना आपण मार्गदर्शन केले. यापुढेही आपले मार्गदर्शन आणि आपला आशिर्वाद आम्हाला सतत लाभू दे.

अगत्यशील पत्नी, कर्तबगार मुलगा, सुविद्य कन्या, सून आणि खेळकर नातवंडे यांच्या सहवासात आमचे शंकरभाऊ दीर्घकाळ सुखाने राहोत, अशी आम्ही परमेश्वरापाशी प्रार्थना करतो.

आपले नम्र
किर्लोस्कर कारखान्याचा
नोकरवर्ग

किर्लोस्कर वाडी
ता. ५ नोव्हेंबर १९५८

३ नोव्हेंबरला सांगलीचे राजेसाहेब चिंतामणराव पटवर्धन यांचे अध्यक्षतेखाली शंकरभाऊ व अनंतराव फळणीकर यांचा पत्नीसह सत्कार झाला. त्यांना मानपत्रे व रौप्यकरंडक दिले. गौरवपूर्वक झालेल्या भाषणांची खूपच गर्दी झाली.

## डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिअेशनने शं. वा. किर्लोस्कर यांना दिलेले मानपत्र

माननीय शंकरराव,

जीवनाच्या विविध क्षेत्रांत बहुमोल स्वरुपाचे विधायक कार्य करून आता आपण मोठ्या समाधानी वृत्तीने व उत्साहाने एकसष्टाव्या वर्षात पदार्पण करीत आहात. अशा या शुभप्रसंगी आपले मन:पूर्वक अभिनंदन करताना आम्हा सर्वांना अत्यानंद होत आहे.

यशस्वी संपादक, धडाडीचा कारखानदार, कुशल चित्रकार, कळकळीचा समाजसेवक व पुरोगामी विचारांचा पुरस्कर्ता अशा अनेकविध नात्यांनी आपण महाराष्ट्राची व आपल्या देशाची बहुमोल सेवा केली आहे. किर्लोस्कर नांगर माहीत नाही असा शेतकरी आणि किर्लोस्कर मासिक माहीत नाही असा साक्षर महाराष्ट्रीय मनुष्य मुद्दाम शोधायला गेले तरी सापडणे कठीण, अशी आज जी वस्तुस्थिती आहे; तिचे बरेच श्रेय आपल्या कर्तबगारीलाच आहे.

परंतु केवळ किर्लोस्कर बंधूंच्या कारखान्यापुरतेच आपण आपले क्षेत्र मर्यादित ठेवले नाही. औद्योगिक विकासाशिवाय आपला देश सुखी, स्वावलंबी आणि सामर्थ्यसंपन्न होणार नाही हे बरोबर ओळखून, सरकार व सर्वसामान्य जनता या दोघांनाही या विचाराचे महत्त्व पटवून देण्यासाठी आपण फार परिश्रम केले आहेत. कोयना धरण योजना सरकारने लवकर हाती घ्यावी म्हणून आपण केलेली खटपट, आपल्या नेतृत्त्वाखाली १९५० साली कोल्हापुरात भरलेले 'दख्खनची दौलत' प्रदर्शन हे दोन्ही उद्योग 'कारखानदारीला जोराने चालना मिळाली पाहिजे' या आपल्या इच्छेतूनच निर्माण झाले आणि 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज' व विशेषत: 'डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन' या नामवंत संस्थांचे अध्यक्ष म्हणून आपण केलेले कार्य तर फारच मोठे आहे. आपल्या खटपटीमुळे डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ही संस्था जन्मास आली. आपल्या कुशल मार्गदर्शनाखाली तिची वाढ झाली व होत आहे. संघटित झाल्याने किती मोठे कार्य होते ते या संस्थेने दक्षिणेतील कारखानदारांना दाखवून दिले.

'बुद्धिवादाचा पुरस्कर करून महाराष्ट्रात आपण वैचारिक जागृती घडवून आणलीत. तिचे महत्त्व तर औद्योगिक क्षेत्रातील आपल्या कार्याहूनही कदाचित अधिक श्रेष्ठ ठरेल. अस्पृश्यता, जातिभेद, अंधश्रद्धा, बुवाबाजी वगैरे समाजविघातक गोष्टींवर व जाचक रूढींवर जोराचा प्रहार करून, पुरोगामी विचारांचे लोण लहान सहान खेड्यापर्यंत पोहोचविण्याचे जे अवघड पण अत्यावश्यक कार्य आपण केले, त्याबद्दल आजची व उद्याची तरुण पिढी आपल्यास खचित धन्यवाद देईल.'

कर्तबगार माणसे रुक्ष असतात असा सर्वसाधारण अनुभव आहे; पण आपण मात्र या नियमाला अपवाद आहात. कर्तृत्त्व, कलासक्ती व क्रीडानैपुण्य या गुणांचा मोठा मनोहर त्रिवेणीसंगम आपल्यामध्ये झालेला आहे. औद्योगिक योजनांच्या आखणीप्रमाणेच चित्रकलेची उपासनाही आपण सारख्यात तन्मयतेने करू शकता. यंत्राचा लयबद्ध आवाज ऐकण्यासाठी आपले कान जसे टवकारल्यासारखे असतात, तसेच दिलरुब्यातून बाहेर पडणाऱ्या मधुर स्वरमालिकाही आपल्या

जिवाला विलक्षण मोहिनी घालू शकतात आणि क्रिकेटची बॅट अथवा टेनिसची रॅकेट हातात घेऊन जेव्हा आपण क्रीडांगणाकडे धाव घेता तेव्हा आपल्या चेहऱ्यावर व चालीत जी अधीरता दिसते ती पाहिली म्हणजे तर 'शंकरराव कधीही म्हातारे होणे शक्य नाही' असा विचार मनात येऊन मोठा आनंद होतो.

मोठमोठी कामे यशस्वी रीतीने पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले कितीतरी गुण आपल्याठिकाणी आहेत. आपल्या अंगच्या या गुणसमुच्चयाचा स्वतंत्र भारताच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शक्य तितका अधिक उपयोग व्हावा म्हणून करवीर-निवासिनीने आपणास दीर्घायुरारोग्य द्यावे अशी तिच्या चरणी नम्र प्रार्थना आहे.

**स. गो. पाध्ये**

उपाध्यक्ष, डे. मॅ. असोसिएशन

कोल्हापूर, १० नोव्हेंबर १९५१

निरोप समारंभ पार पडल्यावर किर्लोस्करवाडीकडे बघताना, १९१४ साली कुंडलच्या माळावरील झोपड्यांचे चित्र शंकरभाऊंच्या मनासमोर येत होते. त्यामधून किर्लोस्कर कारखान्यांचा विस्तार होऊन आता नव्या पिढीतील तरुण मंडळी आवश्यक ते तांत्रिक ज्ञान संपादन करून या कारखान्याची धुरा समर्थपणे वाहण्यास पुढे येत होती. पन्नास वर्षांत एक नवी सृष्टीच जणू उभी राहिली होती. आता भविष्यकाळाचे उज्ज्वल स्वप्न त्यांना दिसत होते आणि आपला कार्यभाग आपण प्रामाणिकपणे पार पाडला अशी पावती त्यांचे मन देत होते.

☆

# निवृत्तीतून वानप्रस्थात

किर्लोस्कर मासिकांच्या आणि छापखान्याच्या छपाईकामाच्या वाढीस वाडीचे क्षेत्र अपुरे पडत असल्यामुळे किर्लोस्कर प्रेसचे पुण्यास स्थलांतर करण्याचा निर्णय चालकांनी घेतला होता. मुकुंदरावांना जुनी सर्व मंडळी उत्कृष्ट सहकार्य करीत होती; नवी येऊन मिळत होती. तीन दिवसांत वाडीतून यंत्रे पुण्यास आणून-काम सुरू करून मासिकाच्या अंकाची एक तारीख त्यांनी चुकू दिली नव्हती. आता प्रेसमध्ये नव्या स्वयंचलित यंत्रांची भर पडली होती. निसर्गवेष्टित १३ एकर क्षेत्रावर दोन सुसज्ज इमारतीत प्रेसचा उद्योग मुकुंदरावांच्या नेतृत्त्वाखाली चालू असलेला पाहून शंकरभाऊंना फार संतोष झाला.

किर्लोस्कर प्रेसच्या नव्या वास्तूत झालेला पहिला भव्य समारंभ म्हणजे 'स्त्रीच्या' ४०० व्या अंकाचे प्रकाशन. प्रथमपासूनच्या प्रसिद्ध लेखिका आनंदीबाई शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास शंकरभाऊ पुण्यात उपस्थित होते. त्यामुळे समारंभास लेखक, लेखिका, वाचक, हितचिंतक प्रचंड संख्येने उपस्थित होते.

शंकरभाऊंना भेटण्याची सर्वांना उत्सुकता होती. म्हणून वेगळा अनौपचारिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम योजला होता. ३०-३५ वर्षांच्या संपादकीय कारकिर्दीत ज्या लेखक-लेखिका वगैरेशी निकटचा संबंध आला, महाराष्ट्रातील अशा २०० जणांनी स्वतःच्या अक्षरात शंकरभाऊंच्या आठवणी लिहून पाठविल्या. त्यांचा सुबक स्मृतिग्रंथ करून ना. सी. फडके यांच्या हस्ते शंकरभाऊंना देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

शंकरभाऊ म्हणत, ''जीवनात भरपूर उद्योग करण्यात जसे समाधान आहे, त्याचप्रमाणे उद्योग आटोपल्यावर विश्रांती घेण्यातही विशेष समाधान आहे. हा विचार मनात ठेवून ५८च्या अखेरीस शंकरभाऊ किर्लोस्करवाडी सोडून घटप्रभा येथे आधी बांधून ठेवलेल्या छोट्या बंगल्यात पोचले. तेथील उत्कृष्ट हवा-पाण्याची प्रसिद्धी होती. ४० वर्षांपूर्वी डॉ. कोकटनूर यांनी तेथे सॅनेटोरियम व हॉस्पिटल बांधले होते. खेड्यातील मंडळींना सवलतीने आरोग्यसेवा देण्याचे त्यांचे ध्येय होते.

वैद्यकीय सेवेमुळे हे ठिकाण पंचक्रोशीत मोठे नाव मानले जात होते.

त्या जागेचे वर्णन शंकरभाऊंचे कविमित्र काव्यविहारी यांनी कवितेत हुबेहुब केले आहे.

गर्द तरूच्या छायेखाली सुबक झोपडी एक असावी ।
आणि बैसुनि तिथेच मजला वनशोभा चौफेर दिसावी ॥
मदिय निवाससमोर सुंदर स्वच्छ जलाशय एक असावा ।
बसल्या जागेवरून तयाचा सहज मला विस्तार दिसावा ॥
झोपडीत माझीय सभोती निवडक सुंदर ग्रंथ असावे ।
सेवित असता सुधा तयातिल क्षुधातृष्णेचे भान नुरावे ॥

शंकरभाऊंच्या या वानप्रस्थाश्रमात त्यांना भेटायला सर्व भागातून मंडळी येत; पण ते स्वत: १९५८ मध्ये घटप्रभेस गेल्यापासून क्वचितच परगावी गेले.

१ जानेवारी १९७५ रोजी त्यांनी जगाचा निरोप घटप्रभेतच घेतला.



**शांता किर्लोस्कर**

शांता किर्लोस्कर यांचा जन्म एप्रिल, १९२३ मध्ये बारामती येथे झाला. सन १९४३ साली त्या मुंबई विद्यापीठातून बी.ए. झाल्या. सन १९७७ मध्ये त्यांनी पुणे विद्यापीठातून वृत्तविद्या पदविकाही मिळविली. त्यांच्या आई किर्लोस्करवाडी येथे शिक्षिकेचे काम करीत असत. सुट्टीमध्ये आईकडे गेल्यावर किर्लोस्कर मासिकाचे संपादक शंकरराव किर्लोस्कर यांची मुलगी मालती व तिचा भाऊ मुकुंद यांची ओळख झाली. मुकुंद व शांता यांचे पदवीपर्यंत शिक्षण झाल्यावर १९४३ मध्ये त्यांचा विवाह झाला. पुढे संसार सांभाळत किर्लोस्कर प्रेसच्या कार्यालयात जाऊन तेथील कामाचा थोडाफार संपादकीय अनुभव घेतला. १९५८ मध्ये किर्लोस्कर प्रेस पुण्यात आल्यामुळे कार्यक्षेत्र व्यापक झाले. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झाल्यावर तेव्हा निजामी राजवटीमुळे मागे पडलेल्या मराठवाडा विभागाची माहिती काढून तेथील शिक्षण, साहित्य, कला, स्त्रीजीवन व सांस्कृतिक वैशिष्ट्ये यांची टिपणे करून तेथील लेखकांच्या सहकार्याने स्त्री मासिकाचा मराठवाडा अंक काढला. तो वाचल्यावर ''या अंकाने आपण मराठवाड्याला आपल्या कुटुंबात आणून सोडले आहे.'' असा प्रतिसाद आला. भाषावार प्रांत रचना मान्य झाल्यावर भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेला चालना देण्याच्या दृष्टीने दरवर्षी एकेका प्रांताचा विशेषांक असे पंजाब, बंगालपासून केरळ, आंध्र प्रदेश, तामिळनाडू अशा १० प्रांतांचे अंक काढण्यात शांताबाईंनी लक्ष घातले.''त्यांनी काही पुस्तकांचे लेखन केले असून विविध पुरस्कारांनी त्या सन्मानीत झाल्या आहेत.''

४